# आधुनिक
# राजकीय विश्लेषण

**(Modern Political Analysis)**

**डॉ. राजशेखर सोलापुरे**
(एम.ए.(राज्यशास्त्र / इतिहास), बी.एड., बी.जे.,
एम.फिल., पीएच.डी.(राज्यशास्त्र)

**अरुणा प्रकाशन, लातूर**

**Aadhunik Rajkiya Vishleshan**
**Dr. Rajshekhar Solapure**
**आधुनिक राजकीय विश्लेषण**
**डॉ.राजशेखर सोलापुरे**

**ISBN 978-93-5240-195-6**

**अरुणा प्रकाशन**
**१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,**
**खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर**
**मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७**

**© सर्व हक्क : जयश्री राजशेखर सोलापुरे**

**: प्रथम आवृत्ती :- ३ जानेवारी २०१९**

**: मुद्रक :** आर्टी ऑफसेट, लातूर

**अक्षर जुळवणी :** हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

**मुखपृष्ठ संकल्पना :-** डॉ. राजशेखर सोलापुरे

**मुखपृष्ठ रेखाटन :-** विरभद्र गुळवे

**मूल्य : १५०.०० रुपये**

**सूचना : 'आधुनिक राजकीय विश्लेषण' या पुस्तकातील कोणताही मजकूर परत प्रकाशित करण्यासाठी लेखकाची व संपादकाची मान्यता घेणे बंधनकारक असेल.**

# मनोगत

राजकीय विश्लेषणाला प्राचीनतम् इतिहास आहे. राज्याच्या निर्मितीपासूनच विश्लेषणास प्रारंभ झाला. प्रारंभी राजकीय विश्लेषणाला राज्य व राज्यकारभार इतकेच मर्यादित ठेवले गेले होते. मात्र राज्याच्या कक्षा ज्याप्रमाणात विस्तारु लागल्या त्याप्रमाणात विश्लेषणाचे व्यासही विस्तारत गेले. राजकीय विश्लेषण शास्त्रीयदृष्ट्या जितके मांडले जाते त्यापेक्षा कितीतरी अधिक सर्वसामान्य लोक आपल्या दैनंदिन जीवनात राजकारणाचे विश्लेषण सहजरित्या बोलण्यातून करत असतात. विश्लेषणाच्या कसोट्या माहीत नसतानाही त्यांनी काढलेले अन्वयार्थ विचारप्रवण करणारे असतात. परंतु राजकीय विश्लेषण मोघम केले जाऊ शकत नाही. त्याची काही परिमाणं आहेत. त्या परिमाणांची मोजपट्टी लावून राजकीय विश्लेषण केल्यास त्यात भविष्यकथनाची शक्ती अंतर्निहीत होते. त्यामुळे राजकीय विश्लेषणाचे हे मापदंड राजकारणाच्या व राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी तपासलेच पाहिजेत. राजकीय विश्लेषणाने विसाव्या शतकाच्या मध्यात पारंपरिकतेचा साचा मोडून आधुनिकतेची वाट धरली. आधुनिक राजकीय विश्लेषणाने मानवी वर्तन, व्यवस्थावादी अभ्यास, वस्तुनिष्ठ व तथ्याधारीत विश्लेषणास प्राधान्य दिल्याने राजकीय प्रक्रियेचे यथोचित विश्लेषण होणे शक्य झाले.

राजकारणाला आज प्रचंड गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. राजकीय प्रक्रिया, संरचना व राजकीय व्यवस्था यांच्या क्रियांची व्याप्ती विस्तारत जात आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय विश्लेषण हे नेमकेपणाने होणे आवश्यक झाले आहे. राजकीय विश्लेषण करताना सजगता व सत्यान्वेषण जितके आवश्यक आहे तितकीच सहजताही महत्त्वाची आहे. या दोन्हींचा समन्वय साधून राजकीय विश्लेषण केले गेले पाहिजे तरच सिद्धांताची समर्पक मांडणी शक्य होते. या सर्व पैलूंचा विचार करून विद्यापीठीय पातळीवर राज्यशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिशादर्शक ठरावे असे 'आधुनिक राजकीय विश्लेषण' या पुस्तकाचे लेखन केले गेले आहे.

राज्यशास्त्राच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उपयोगी ठरावे या दृष्टीने

'आधुनिक राजकीय विश्लेषण' या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. आधुनिक राजकीय विश्लेषणाची संकल्पना समजावी यासाठी विस्तारपूर्वक मांडणी करतानाच विश्लेषणाचे विभिन्न पैलू समजावून देण्याचा प्रयत्न सदरील पुस्तकात करण्यात आला आहे. तसेच आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासाचे दृष्टिकोन सहजतेने समजावेत यासाठी हे पुस्तक निश्चितच मदत करते. राजकीय नेतृत्त्व व राजकीय पक्ष या दोन प्रकरणात या दोन्ही संकल्पना व त्यासंबंधीचे राजकीय विश्लेषण याचा विस्ताराने आढावा घेण्यात आला आहे. लोकशाही शासनव्यवस्थेसाठी ही दोन्ही प्रकरणे पुरक आहेत. राजकीय सामाजिकीकरण व राजकीय सहभागाच्या वृद्धीसाठीही या प्रकरणाची मदत होणार आहे. केवळ राजकीय अभ्यास करणाऱ्या अभ्यासक व विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर राजकीय नेते, कार्यकर्ते व सर्वसामान्य वाचक यांच्यासाठीही हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, याची शाश्वती वाटते.

माझ्या या पुस्तक निर्मितीसाठी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य करणारे डॉ.महादेव गव्हाणे, प्राचार्य डॉ.आशा मुंडे, डॉ.हरिश्चंद्र चौधरी, डॉ.ओंकार चिंचोले, प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा.प्रियदर्शनी देशमुख आदींचे मनापासून आभार मानतो.

सदरील पुस्तकाचे प्रकाशन करण्याची जबाबदारी अरुणा प्रकाशनचे प्रकाशक प्रा.राजकुमार बिरादार, संजीवकुमार बिरादार यांनी घेतली याबद्दल त्यांचे आभार. पुस्तकासाठी मुखपृष्ठ आणि टंकलेखन करणारे श्री विरभद्र गुळवे यांचेही आभार. याशिवाय माझ्या कुटुंबातील सर्वांच्या सहकार्याने हा ग्रंथ पूर्णत्त्वाला जावू शकला याबद्दल मी त्यांच्या सदैव ऋणाईत राहीन. आधुनिक राजकीय विश्लेषण हे पुस्तक विद्यार्थी आणि अभ्यासकांना नक्कीच आवडेल, या अपेक्षेसह !

**- डॉ.राजशेखर सोलापुरे**
संत ज्ञानेश्वर नगर, राजीव गांधी
चौकाजवळ, रिंग रोड, लातूर.
मो. 9423345822
E-mail: rajshekhar.solapure@gmail.com

# ।। अनुक्रमणिका ।।


१. आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय ....... ०९

२. आधुनिक राजकीय विश्लेषणाचे अध्ययन दृष्टिकोन ....... ३८

३. राजकीय नेतृत्व ....... ७६

४. राजकीय पक्ष ....... १०१

संदर्भ सूची ....... १२५

# १ आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय

मानवाची समुह भावना ही सामाजिक संस्थांच्या निर्मितीला प्रामुख्याने कारणीभूत ठरली. समाज, अर्थ, शिक्षण, धर्म, विवाह, कुटुंब, जाती या संस्थांची निर्मिती मानवाने आपल्या अनेकविध भावनांच्या परिणामस्वरूप केली. आत्मसंरक्षण व सामाजिक सुव्यवस्थेसाठी त्याने राज्यसंस्थेचे निर्माण केले. राज्य ही एक अशी सामाजिक संस्था आहे जी इतर संस्थांचे नियमन करते. मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवते. प्रारंभीच्या काळी राज्याचे कार्य मर्यादित स्वरूपात होते; मात्र कालौघात राज्यसंस्थेच्या कार्याची व्याप्ती वाढत गेली. मानवाच्या राजकीय गरजांमध्ये वृद्धी झाली. राज्याची भूमिका कालपरत्त्वे बदलत गेली आहे. या भूमिकेची चिकित्सा ही कालानुरूप वेगवेगळ्या स्वरूपात करणे क्रमप्राप्तच ठरते. राज्याच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यासाठी जे शास्त्र विकसित झाले ते म्हणजे, राज्यशास्त्र. राज्यशास्त्र राज्याच्या भूमिकेचे प्रारंभी जे विश्लेषण करायचे ते ऐतिहासिक, आदर्शात्मक व संस्थात्मक दृष्टिकोनातून होत असे. मात्र एकोणिसाव्या व विसाव्या शतकात राज्याचे स्वरूप, भूमिका यात आमूलाग्र परिवर्तन झाले. त्यामुळे जुन्या पद्धतीने विश्लेषण करायला मर्यादा येऊ लागल्या. नव्या पद्धतीचा अवलंब करून राजकीय विश्लेषण करण्यासाठी वर्तनवादी, व्यवस्थात्मक, संरचनावादी कार्यात्मक,

आंतरशास्त्रीय दृष्टिकोनांची निमिर्ती झाली. दोन भागात राज्यशास्त्राचे म्हणजेच राजकीय विश्लेषणाचे वर्गीकरण करण्यात आले. त्यालाच पारंपरिक राज्यशास्त्र किंवा पारंपरिक राजकीय विश्लेषण आणि आधुनिक राज्यशास्त्र किंवा आधुनिक राजकीय विश्लेषण असे संबोधले जाते.

**राज्यशास्त्राची वाटचाल : पारंपरिक ते आधुनिक**

मानवाने जेव्हा संघटित जीवन जगणे सुरू केले तेव्हापासून राज्यशास्त्राच्या विकासाचा प्रारंभ झाला. प्राचीन काळापासून राज्यशास्त्राचा सुरू झालेला विकास आजपर्यंत अव्याहतपणे चालूच आहे. राज्यशास्त्र हे लोकाभिमुख शास्त्र आहे. त्यातील कल्पना व सिध्दांतावर कोणीही सहजपणे आपले मत व्यक्त करतो. परंतु असे मत सैध्दांतिकदृष्ट्या बरोबरच असेल, असे मात्र नाही. म्हणून तर जे. एच. प्राइस हा विचारवंत म्हणतो की, "दुर्दैवाने राज्यशास्त्र एक असा विषय आहे ज्यावर प्रत्येक व्यक्ती स्वतः विशेषज्ञ म्हणून भाष्य करतो, भले त्याने त्याचे क्रमबध्द अध्ययन केलेही नसेल." राज्यशास्त्राबद्दल मोघम भाष्य करणाऱ्यांची संख्या प्रचंड असली तरी अशी भाष्ये सिध्दांत असू शकत नाहीत. व्यवहार व सिध्दांत यांचा योग्य समन्वय प्रस्थापित करूनच राज्यशास्त्राचे यथायोग्य अध्ययन शक्य आहे. राज्यशास्त्राला एक विस्तीर्ण असा इतिहास आहे. तो समजून घेऊनच खऱ्या अर्थाने राजकीय विश्लेषणाचा बोध होऊ शकतो.

इ. स. पूर्व ५०० ते ४०० वर्षापूर्वी ग्रीक नगरराज्यात राज्यशास्त्राचा अभ्यास सुरू झाला. अथेन्स नगरराज्यातील प्रोटेगोरस व गार्गियस हे राज्यशास्त्राचे आद्य प्रणेते आहेत. त्यांच्या नंतर सॉक्रेटीस व प्लेटो या गुरू शिष्यांनी आदर्शवादी राजकीय विचारांची मांडणी केली. तद्नंतर प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल यांनी प्रथमच राज्यशास्त्राला नीतिशास्त्रापासून मुक्त करत राजकीय विचारांची मांडणी केली. 'पॉलिटिक्स' नावाचा ग्रंथ ॲरिस्टॉटलने १५८ नगरराज्यांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून लिहिला. या ग्रंथातच त्याने राज्यशास्त्राला 'प्रधानशास्त्र' (Politics is a Master science) असे संबोधले. पध्दतशीरपणे, अनुभववादी पध्दतीने राज्यशास्त्राचा अभ्यास करण्यास

ॲरिस्टॉटलने प्राधान्य दिले. त्यामुळे राज्यशास्त्रात राजकीय विचारांची मांडणी करताना शास्त्रीय पध्दतीला महत्त्व दिले जावू लागले. राज्यशास्त्राला शास्त्र म्हणून नावलौकीकास आणणाऱ्या ॲरिस्टॉटलला त्यामुळेच 'राज्यशास्त्राचा जनक' म्हटले जाते.

ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटलने 'Politics' असे नाव आपल्या ग्रंथाला दिले. 'पॉलिटिक्स' हा शब्द राज्यकारभाराचे शास्त्र या अर्थाने योजिलेला आहे. या शब्दातूनच राज्यशास्त्र या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. ती म्हणजे, ग्रीक भाषेतील मूळ Polis (पोलिस - नगरराज्य) या शब्दापासून Politics हा शब्द तयार झाला. प्राचीन नगरराज्यांची जागा कालानुक्रमे राज्य, राष्ट्र-राज्य व विश्वराज्य यांनी घेतल्यामुळे Politics चा विस्तार होत Political-science हा शब्द प्रचलित झाला. थोडक्यात नगरराज्यापासून विश्वराज्यापर्यंत राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा प्रवास झालेला आहे.

राज्यशास्त्राचा अभ्यास प्राचीन काळी जसा ग्रीक करत होते, तसाच तो भारतातही केला जात होता. प्राचीन भारतीय साहित्यात 'राजधर्म', 'राजनीति', 'अर्थशास्त्रम्' या नावाने राज्यशास्त्रासंबंधीचे लेखन केलेले विपुल प्रमाणात आढळते. महाभारतातील शांतीपर्व, कौटिल्याचे 'अर्थशास्त्र', शुक्रनीती, कृष्णनीती, चंडेश्वराचे 'राजनीती रत्नाकर', याज्ञवल्क्य स्मृती अशा कितीतरी ग्रंथ व नीतीतून राजकीय विचारांचे समर्थपणे प्रतिपादन केले गेलेले आहे. डॉ. आशीर्वादन् म्हणतात त्याप्रमाणे, "चीनचा कन्फ्युशिअस व भारतातील कौटिल्य यांच्या लेखनातून शासन करण्याची कला व राज्याचे सिध्दांत स्पष्टपणे मांडले गेले आहेत."

मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम विचारवंतांनी धर्माच्या चौकटीत राजकीय विचारांची मांडणी केली. त्यांच्यावर ग्रीक राजकीय विचारांचा प्रभावही पडलेला होता. याशिवाय सेंट ऑगस्टीन यांनी 'सिटी ऑफ गॉड' हा ग्रंथ लिहून धर्म राज्यापेक्षा श्रेष्ठ आहे असे विवेचन केले. या विचाराला छेद देणारा ग्रंथ मॅकेव्हली यांनी 'द प्रिन्स' नावाने लिहून धर्माच्या वर्चस्वाखालील राज्य संपुष्टात आणले. दोन तलवारी, म्हणजे धर्मसत्ता आणि राजसत्ता यातील संघर्ष मॅकेव्हलीच्या लेखनाने संपुष्टात येऊन राज्यशास्त्र आधुनिकतेकडे वाटचाल करायला लागले. मध्ययुगीन कालखंडात राज्यशास्त्र पारंपरिक

स्वरुपाचेच होते. त्यादृष्टीनेच महात्मा बसवेश्वर, जँ बोदँ, हॉब्ज, लॉक, रुसो, स्पिनोझा, बेंथम, जे. एस. मिल व कार्ल मार्क्स आदि विचारवंतांनी आपले विचार मांडलेले आहेत. प्लेटोपासून कार्ल मार्क्सपर्यंत जे काही राज्यशास्त्रासंबंधी विवेचन झाले ते पारंपरिक या स्वरुपाचेच मानले जाते.

राज्यशास्त्र हे नैसर्गिक शास्त्र नसले तरी ते एक सामाजिक शास्त्र आहे. शास्त्र (विज्ञान) म्हटले की, त्याची कांही प्रमुख लक्षणे असतात. सिजविक यांनी म्हटल्याप्रमाणे, "वैज्ञानिक संशोधनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये मुख्य शब्दांची शुध्द, स्पष्ट व सुनिश्चित परिभाषा (व्याख्या) करणे एक महत्त्वपूर्ण कार्य असते." यादृष्टीने राज्यशास्त्र या शब्दाच्या व्याख्येवरून पारंपरिक व आधुनिक असे दोन प्रमुख दृष्टिकोन आहेत. यातील पारंपरिक दृष्टिकोनाचे समर्थक राज्यशास्त्राची व्याख्या करताना प्रामुख्याने संस्थात्मक अभ्यास, ऐतिहासिक दृष्टिकोन, मूल्यप्रधानता याला महत्त्व देतात. अशा कांही व्याख्यांपैकी एक म्हणजे, गेटेलची व्याख्या. **गेटेल**च्या मते, "भूतकाळात राज्य कसे होते, वर्तमानकाळात राज्य कसे आहे आणि भविष्यकाळात नैतिकदृष्ट्या राज्य कसे असावे यासंबंधीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय." तर **गार्नर** म्हणतो, "राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा आरंभ व अंत राज्यातच होतो." **लॉर्ड ॲक्टन**च्या मते "राज्यशास्त्र राज्य तथा त्याच्या विकासाच्या पैलूंशी संबंधित आहे." थोडक्यात राज्यापर्यंतच राजकीय विश्लेषण सीमित आहे, असे पारंपरिक राज्यशास्त्राचे समर्थक मानतात.

राज्यशास्त्राचे पारंपरिक स्वरुप १९ व्या शतकाच्या मध्यापासून बदलायला सुरूवात झाली. राज्यशास्त्राच्या विकास प्रक्रियेतील संक्रमण काळ सुरू झाला. हा कालखंड इ.स. १८५० ते १९५० असा शंभर वर्षाचा होता. कार्ल मार्क्स, ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर या विचारवंतांनी केलेल्या आंतरशास्त्रीय स्वरुपाच्या लेखनातून राज्यशास्त्राचे पारंपरिक स्वरुप बदलायला लागले. यात मोलाची भर टाकली ती ग्रॅहॅम वालास यांच्या 'ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स' या ग्रंथाने व ऑर्थर बेंटले यांच्या 'द प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट' या ग्रंथाने. त्यामुळेच ग्रॅहॅम वालास व ऑर्थर बेंटले यांना आधुनिक

राज्यशास्त्राचे जनक म्हटले जाते. यांच्याप्रमाणेच डेव्हिड ईस्टनने 'राजकीय व्यवस्था', टॉलकॉट पार्सन्सने 'सामाजिक व्यवस्था' हे ग्रंथ लिहून व्यवस्थावादी अभ्यासाला बळकटी दिली. याच काळात कार्ल ड्वाईश, लॉस्वेल, अँथनी डाऊन्स, बुकॅनन, तुलाक यांनी व्यापकपणे शास्त्रीय लेखन करून राज्यशास्त्राचे स्वरुप बदलविण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

मानवाच्या राजकीय वर्तनाचा, राजकीय व्यवहाराचा वास्तववादी अभ्यास करण्यास व वस्तुनिष्ठपणे सिध्दांत निर्मिती करण्याला दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर राज्यशास्त्रात गती मिळाली. त्याचाच परिणाम म्हणून आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय झाला. आधुनिक राज्यशास्त्राच्या व्याख्याही आमूलाग्र स्वरुपात बदलून गेल्या. **कॅटलीन**च्या मते, "राज्यशास्त्र सत्तेचे शास्त्र आहे." **डेव्हिड ईस्टन**च्या मते, "राज्यशास्त्रात मूल्यांच्या सत्तात्मक वितरणाचा अभ्यास केला जातो." **आल्मंड** व **पॉवेल** म्हणतात, "राज्यशास्त्रात संपूर्ण राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला जातो." **हेरॉल्ड लॉस्वेल** आणि **कप्लान** म्हणतात, "एका अनुभववादी शोधाच्या स्वरुपात राज्यशास्त्र सत्तेचे निर्धारण आणि सहभागाचे अध्ययन करते." सारांशतः राज्यशास्त्र राजकीय मनुष्य, राजकीय व्यवस्था, राजकीय वर्तन, राजकीय क्रिया आणि राजकीय आदर्शाचे क्रमबध्द अध्ययन आहे.

पारंपरिक ते आधुनिक असा राज्यशास्त्राच्या विकासाचा प्रवास झालेला आहे. ऐतिहासिक, संस्थात्मक व मूल्यात्मक अध्ययनापासून अनुभववादी, वर्तनवादी, मूल्यनिरपेक्ष, तुलनात्मक, व्यवस्थात्मक व आंतरविद्याशाखीय अभ्यासापर्यंत असा राज्यशास्त्राचा प्रवास आहे. राज्यशास्त्राच्या प्रवासात राजकीय विश्लेषणाचे स्वरुपही सातत्याने बदलत राहिले आहे.

### आधुनिक राजकीय विश्लेषणाचा अर्थ

पारंपरिक राजकीय सिद्धांताने स्पष्ट केलेल्या मार्गापेक्षा राजकीय प्रश्नांचा वास्तविकपणे विचार करण्याची सुरूवात तशी विसाव्या शतकातील. 'काय असावे' याच धाटणीने केलेली मांडणी वास्तवापासून दूर करणारी आहे, याचा

साक्षात्कार प्रामुख्याने अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाला झाला आणि 'काय आहे' यावर व तथ्यांवर (Fact) राजकीय प्रश्नांचे समालोचन करण्याला प्राधान्यक्रम दिले जावू लागले. त्यामुळे राजकीय विश्लेषण हे राज्यशास्त्रज्ञांचे प्रायोगिक (Practical) क्षेत्र मानले गेले. मूल्य आणि पूर्वग्रह यांना तिलांजली देऊनच राजकीय विश्लेषण केले गेले पाहिजे, ही धारणा आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या मुळाशी आहे.

आधुनिक राज्यशास्त्रीय मांडणीला राजकीय विश्लेषण असे संबोधले जाते. चार्लस मेरियम, डेव्हिड ईस्टन, रॉबर्ट डहाल, गॅब्रिएल आल्मंड, पॉवेल, डेव्हिड ॲप्टर, हेरॉल्ड लॉस्वेल, ऑर्थर बेंटले, ग्रॅहॅम वालास या विचारवंतांनी आधुनिक राजकीय विश्लेषणाची पायाभरणी केली. मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन ठेवून शास्त्रीय स्वरूपाच्या राजकीय विवेचनाला महत्त्व देणारी पद्धती म्हणून राजकीय विश्लेषणाकडे पाहता येते. आधुनिक राजकीय विश्लेषणाला बौद्धिक व वैचारिक क्रांती मानली जाते; कारण पारंपरिक राज्यशास्त्राचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकण्याची किमया आधुनिक राजकीय विश्लेषणामुळे शक्य झाली आहे.

**राजकीय विश्लेषणाच्या व्याख्या**

**डेव्हिड ॲप्टर** यांच्या मते,

"रसायनशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे मिश्रणाचे वेगवेगळे घटक किंवा मूलतत्त्वे वेगळे काढून व त्यांची भिन्न प्रकारे पुन्हा जोडणी करून विश्लेषण करतो, त्याप्रमाणे राज्यशास्त्रज्ञही व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाचे खाजगी व सार्वजनिक असे विघटन करतो आणि त्यांची वेगवेगळ्या पद्धतीने जोडणी करून अभ्यासतो यालाच राजकीय विश्लेषण म्हणता येते."

**रॉबर्ट डहाल** यांच्या मते,

"राजकारणाचे विश्लेषण करण्याचे कौशल्य वाढवूनच राजकारणाचे यथार्थ आकलन शक्य होते. आपण ज्या जगात जगतो ते जग समजावून घेण्यास राजकीय विश्लेषणाची मदत होते. व्यक्तीसमोर वेळोवेळी जे पर्याय उभे राहतात

त्यांच्यापासून योग्य त्या पर्यायाची निवड करणे तिला अशा विश्लेषणाद्वारे शक्य होते. राज्यव्यवस्थेमधील परिवर्तन व प्रक्रिया समजून देणे म्हणजेच राजकीय विश्लेषण होय."

**हेरॉल्ड लॉस्वेल** च्या मते,

"राजकारणात कोणाला, काय, केव्हा व कसे मिळते याचे विश्लेषण म्हणजे राजकीय विश्लेषण होय."

**रोलाँ पिनाक व डेव्हिड स्मिथ** यांच्या मते,

"काय आहे आणि काय असावे यामध्ये समन्वय कसा निर्माण करता येईल या दृष्टीने सरकार आणि राजकीय प्रक्रियेच्या व्यवस्थित अभ्यासास राजकीय विश्लेषण म्हणता येईल."

**राजकीय विश्लेषण : शास्त्र की कला**

राजकीय तत्त्वे, घटना, व्यक्ती, समुह, प्रक्रिया, व्यवस्था यांचे विश्लेषण प्रारंभापासूनच केले जाते. ग्रीक विचारवंत या कलेत विशेष प्रवीण होते. मात्र शास्त्रीयतेऐवजी ते स्वमूल्यांना महत्त्व देत असल्यामुळे त्यांचे राजकीय विश्लेषण देश, काळ व स्थल सापेक्षच राहिले. राजकीय विश्लेषण एक अखंड प्रक्रिया आहे. राजकीय वर्तन, प्रक्रिया, संरचना गतीशील असते. तसेच त्यांचा आणि त्यांच्या समकक्ष प्रक्रियांमध्ये एक आंतरसंबंध प्रस्थापित होत असतो व त्यातूनच परस्परात आंतरक्रिया घडून येते. नवीन घटना, तंत्रज्ञान, विकास हे राजकारणावर प्रभाव पाडत असतात. राजकीय नेते व राज्यशास्त्रज्ञ संपूर्ण राजकीय व्यवहाराचे सूक्ष्म आकलन करून घेवून राजकारणाचे व राजकीय व्यवहाराचे विश्लेषण सातत्याने करत असतात.

राजकीय विश्लेषण 'शास्त्र आहे की कला?' या प्रश्नाचे उत्तर म्हणजे, राजकीय विश्लेषण शास्त्र व कला दोन्हीही आहे. राजकीय विश्लेषणाची कला हजारो वर्षापासून विकसित होत आली आहे. परंतु शास्त्राच्या स्वरूपात राजकीय विश्लेषणाचा प्रारंभ ही आधुनिक काळातील घटना आहे. एका कलेच्या स्वरूपात

राजकीय विश्लेषण कुशल व अनुभवी विश्लेषकांच्या निरीक्षणात अवगत केले जाते; परंतु ही कुशलता राजकारणात अंमलात आणण्यासाठी प्राप्त केलेले प्राविण्य मानता येत नाही. कुशल विश्लेषक व अनुभवी राजकीय नेतृत्व हे गुण एखाद्या राजनेत्यामध्ये पहायला मिळू शकते. त्यामुळे राजकीय विश्लेषणाची कला निरीक्षणातून अवगत करता येणारी कला आहे. शास्त्राच्या स्वरूपात राजकीय विश्लेषण हे भिन्न सामान्यीकरण, सिद्धांताद्वारे उपलब्ध संस्थेच्या सूक्ष्म अन्वेषण, वर्गीकरण, मापनाद्वारे चिकित्सेतून केले जाते. अनुशासनात्मक व वस्तुनिष्ठतेतून तथ्यांचा वारंवार पडताळा घेवूनच शास्त्रीय राजकीय विश्लेषण केले जाते; ज्यामुळे वास्तववादी निष्कर्ष पुढे येतात. यामुळे सहज व सत्य भविष्यकथन करता येते.

**राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषणातील भेदरेषा**

राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषण हे दोन्ही शब्द बऱ्याचवेळा एकाच अर्थाने वापरले जातात. मात्र या दोन्ही संकल्पनांमध्ये आमूलाग्र भेद आहे. सिद्धांताचा संबंध प्रामुख्याने तत्त्वज्ञानात्मक व तार्किकतेशी जोडलेला असतो. त्याद्वारेच स्पष्टीकरण, चिकित्सा व पुनःनिर्मिती ही तीन कार्ये राजकीय सिद्धांत करते. अर्नोल्ड ब्रेश्ट म्हणतो त्याप्रमाणे, "एखाद्या विषयावर एखादा विचारवंत आपले संपूर्ण ज्ञान ज्यात तथ्य व त्याचे स्पष्टीकरण, इतिहासाची त्याची संकल्पना, त्याचे मूल्य निर्धारण, नीती व आधारभूत कारणांची मांडणी करतो त्यालाच सिद्धांत म्हणतात. थोडक्यात व्याख्या करणे हेच सिद्धांताचे प्रमुख कार्य आहे." तर राजकीय विश्लेषणाचा विचार केल्यास राजकीय विश्लेषणाचा राजकीय व्यवहाराशी खूप जवळचा संबंध असतो. राजकीय सिद्धांत राजकीय व्यवहाराची उपेक्षाच करत असतो मात्र राजकीय विश्लेषणात राजकीय व्यवहाराच्या राजकीय प्रक्रियांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. राजकीय सिद्धांत आदर्शांची भाषा बोलतात तर राजकीय विश्लेषण तथ्यांना महत्त्व देवून मूल्यनिरपेक्ष विवेचन करते. म्हणूनच रॉबर्ट डहाल म्हणतो त्याप्रमाणे, "सत्ता, अधिसत्ता, शासनक्रिया यांचे विश्लेषण हेच राजकीय विश्लेषणाचे अभ्यासविषय आहेत." विसाव्या

शतकाच्या अगोदर राजकीय सिद्धांतानी राज्यशास्त्राचे क्षेत्र व्यापले होते; मात्र राज्यशास्त्राचा आधुनिक काळ हा राजकीय विश्लेषणाच्याच प्रभावक्षेत्राने व्यापलेला दिसतो.

**पारंपरिक राजकीय विश्लेषणाची ओळख / स्वरूप**

राजकीय विश्लेषणाला खूप मोठा इतिहास व भूगोल राहिलेला आहे. ग्रीक, पाश्चात्त्य, पौर्वात्त्य, इस्लामी प्रदेशात भिन्न स्वरूपात राजकीय विश्लेषणाचा पट विस्तारलेला दिसतो. राज्यकारभाराची संहिता स्पष्ट करण्यासाठीच प्राचीन काळात विश्लेषणाचा वापर करण्यात आला. नीती, आदर्श, उपदेश याद्वारे मांडणी करून प्राचीन व मध्ययुगीन राज्यशास्त्रज्ञांनी मोलाची भर घातली. मात्र हे विश्लेषण एका साचेबद्धतेत अडकून राहिले. संस्था, संविधान, स्वमूल्य व सदाचार या भोवतीच पारंपरिक राजकीय विश्लेषण फिरत राहिले. त्यामुळे उच्चकोटीचे राजकीय तत्त्वज्ञान तर निर्माण झाले मात्र वास्तविक स्थितीकडे हेतु:पुरस्सरपणे दुर्लक्ष केले गेले. प्लेटो ते मार्क्स पर्यंतच्या विश्लेषणाला पारंपरिक राजकीय विश्लेषण संबोधले जाते. या पारंपरिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप नेमके कसे होते यासंबंधी विचार पुढील प्रमाणे करता येतो.

**१) तात्त्विकतेला प्राधान्य व कल्पनावादी विश्लेषण**

पारंपरिक राजकीय विश्लेषणाचा आधार किंवा केंद्रबिंदू हा तत्त्वज्ञानात्मक मांडणी हाच होता. प्लेटोचे आदर्श राज्य, गांधींचे रामराज्य, रुसोची सामुहिक ईहा, मार्क्सचा वर्गविहीन समाज, मिलची स्वातंत्र्याची कल्पना, लॉकची निसर्गावस्था अशी कितीतरी विचारवलये पारंपरिक राज्यशास्त्रात पहायला मिळतात ज्यात कमालीचे तत्त्वज्ञान मांडले गेले आहे. आदर्शाची पिळदार मांडणी करून त्याचे जोरकसपणे समर्थन करण्याला पारंपरिक राजकीय विश्लेषणाने महत्त्व दिले होते. एखाद्या तत्त्वाला प्रमाण मानून त्याभोवती विश्लेषणात्मक मांडणी करण्याची प्रवृत्ती पारंपरिक राज्यशास्त्रात मोठ्या प्रमाणात दिसते. यातून बऱ्याचवेळा कल्पनावादाचा जन्म होत असे. प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेशी सहसंबंध प्रस्थापित न करता विचारांचे

व विश्लेषणाचे उंच मनोरे रचले जात असत. त्यामुळे राजकीय विश्लेषणात स्वप्नरंजकताच अधिक निर्माण झाली. मात्र तरीही या तात्त्विकतेला प्राधान्य देवून केलेल्या राजकीय विश्लेषणामुळे राजकीय तत्त्वज्ञान बलिष्ठ झाले.

**२) मूल्यांना महत्त्व**

पारंपरिक राजकीय विश्लेषणात मूल्यसापेक्षता मोठ्या प्रमाणात होती. राजकीय विचारवंत मूल्याधारित विश्लेषणालाच महत्त्व देत असत. आचारशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा मिलाफ करूनच मांडणी केली जात असे. त्यामुळे या मांडणीच्या शिरोभागी एखादे मूल्य निश्चित स्वरूपात असायचेच. वस्तुस्थितीशी कसलेच तादात्म्य न ठेवता मूल्याधिष्ठीत विश्लेषण करायला पारंपरिक राज्यशास्त्रात महत्त्व होते. म्हणून पारंपरिक राजकीय विश्लेषण स्वातंत्र्य, समता, न्याय, नीतिकेंद्री राजकारण, देशनिष्ठा याभोवती फिरताना दिसते. यामुळे पारंपरिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप आदर्शवादी बनले. याचे समर्थन करताना ड्वाईट वाल्डो म्हणतो की, "मनुष्य समाजशील प्राणी असल्यामुळे सार्वजनिक जीवनात तो मूल्यनिरपेक्ष राहू शकत नाही. त्यामुळे राज्यशास्त्रालाही मूल्य व आदर्शांना महत्त्व देऊनच अभ्यास करावा लागेल."

**३) ऐतिहासिक दृष्टिकोनाचा स्वीकार**

पारंपरिक राजकीय विश्लेषण ऐतिहासिक दृष्टिकोनाचा स्वीकार करते. इतिहास ही राज्यशास्त्राची प्रयोगशाळा आहे, असे पारंपरिक राज्यशास्त्रज्ञ मानत असत. राजकीय संस्था, आदर्श, राजकीय समस्या यांचे मूळ इतिहासाच्या पानातून शोधले जात असे. आजच्या प्रत्येक राजकीय घटितामागे एक इतिहास असतोच, असे गृहितकृत्य मांडून त्या इतिहासाचा मागोवा घेतला जायचा व त्याद्वारे समकाळातील घटनांचे अन्वयार्थ लावून राजकीय विश्लेषण केले जात असे. हॉब्ज, लॉक, रुसो यांनी निसर्गावस्थांची केलेली मांडणी, मार्क्सची आदिम अवस्था याच दृष्टिकोनाचा तर परिणाम आहे. इतिहासाचे उत्खनन हाच पारंपरिक राजकीय विश्लेषणाचा मूलाधार आहे.

### ४) वर्णनात्मक

पारंपरिक राजकीय विश्लेषकांचे मत होते की, राजकीय संस्थांचे वर्णन हेच तिच्या व्याख्येसाठी पुरेसे आहे. म्हणून शासनसंस्थांचे वर्णन करण्यावरच पारंपरिक राजकीय विश्लेषणात भर दिला गेला. शासनपद्धतीमधील साम्य व भेद याचे वर्णनात्मक विश्लेषण तर सर्रास केले गेले. हे वर्णन करताना कसलाच वस्तुनिष्ठ आधार नसे. म्हणून तर प्राचीन काळी लोकशाहीला वाईट शासनप्रकार म्हणून विश्लेषित केले गेले. चिकित्सकपणे वर्णन न करता ते मोघम करण्याला प्राधान्य दिले जात असे.

### ५) वैधानिक व संस्थागत विश्लेषण

कायदा, राज्यघटना, न्यायालयीन निर्णय, आंतरराष्ट्रीय कायदा, न्यायपद्धती या अनुषंगाने विश्लेषण करण्यासही पारंपरिक राजकीय विश्लेषणात महत्त्व होते. या आधारेच डायसी, मन्रो, जॉन ऑस्टीन, ऑग या विचारवंतानी विश्लेषण केले आहे. तर ॲरिस्टॉटल, लिकॉक, मॅरियर हे संस्थात्मक विश्लेषण करताना दिसतात. अशाप्रकारचे विश्लेषण हे औपचारिक स्वरूपाचेच असते.

### ६) निगमन पद्धतीचा अवलंब

एखादे गृहितकृत्य मांडून त्याद्वारे जेव्हा विश्लेषण केले जाते तेव्हा त्याला निगमन पद्धतीने अध्ययन किंवा विश्लेषण म्हणतात. याप्रकारे केलेले विश्लेषण व्यक्तीपरत्त्वे भिन्न असतेच. या संदर्भात सामाजिक करार सिद्धांताचे उदाहरण घेता येईल. हॉब्ज, लॉक, रुसो हे तिघे एकाच गृहितकृत्याचा आधार घेऊन विश्लेषण करतात मात्र तिघांचे निष्कर्ष व परिणाम वेगवेगळे दिसतात. वस्तुस्थितीला नकार देणारी ही पद्धती पारंपरिक राजकीय विश्लेषणात मोठ्या प्रमाणात वापरली गेली.

अशा प्रकारे पारंपरिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप विशद करता येते.

## आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या उदयाची कारणे

दुसऱ्या महायुद्धानंतर आधुनिक राजकीय विश्लेषणाचा प्रारंभ झाला.

डेव्हिड ईस्टन, रॉबर्ट डहाल, कॅटलिन, मिहान, हेरॉल्ड लॉसवेल, आल्मंड यांच्या वैचारिक आंदोलनाचा हा प्रमुख परिणाम होता की, आधुनिक राजकीय विश्लेषण उदय पावले. आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय होण्यासाठी अमेरिकेतील प्रमुख दोन संस्थांचे विशेष योगदान राहिलेले आहे. त्यामध्ये 'अमेरिकन पॉलिटिकल सायन्स असोसिएशन' व 'सोशल सायन्स रिसर्च असोसिएशन' या दोन्ही संस्थांनी राजकीय विश्लेषणाला आधुनिकतेची झालर दिली. आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय किंवा उगम होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्याचे अवलोकन पुढीलप्रमाणे करता येते.

**१) पारंपरिक राजकीय विश्लेषणाबद्दल असंतोष**

२० व्या शतकात मोठ्या प्रमाणात राजकीय आणि सामाजिक संदर्भ बदलू लागले. दोन महायुद्धे, शीतयुद्धाला प्रारंभ, नव्याने स्वतंत्र होणारी राष्ट्रे, नव्या राजकीय व्यवस्थेचे प्रयोग, अणुयुगाची सुरूवात, शस्त्रास्त्र स्पर्धा, राजकीय सामाजिकीकरणाचा वाढता वेग, राजकीय सहभागाचे नवनवे प्रयोग या सर्व पार्श्वभूमीवर पारंपरिक राजकीय विश्लेषण तोकडे पडू लागले. विश्लेषण, अभ्यासाच्या पद्धती यांच्या मर्यादा उघड झाल्या. त्यामुळे पारंपरिक राजकीय विश्लेषणाबद्दल असंतोष व्यक्त केला जावू लागला. या असंतोषातूनच आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय झाला. प्रचलित समस्यांचे वस्तुनिष्ठ व काटेकोर विश्लेषण करता यावे म्हणून आधुनिक दृष्टिकोनाद्वारे विश्लेषण करण्यास महत्त्व दिले गेले.

**२) वास्तविक राजकारणाच्या विश्लेषणाचा हेतू**

आदर्शात्मक स्वरूपातच पारंपरिक राजकीय विश्लेषण केले गेले. ही चौकट मोडून वास्तविक राजकारणाचा साधक-बाधक विचार केला गेला पाहिजे याची निकड निर्माण झाली व त्यातूनच राजकीय व्यवस्था, संरचना आणि संस्थांना वास्तविकतेच्या पातळीवर समजून घेणे आवश्यक मानले जावू लागले. या गरजेतून किंवा हेतूने आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या उदयाला पोषक परिस्थिती

निर्माण झाली. वास्तविकपणे राजकारणाचा व राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करण्यासाठीच अनेक राजकीय विचारवंतांनी आपले विचार मांडले किंवा तसे अभ्यास दृष्टिकोन विकसित केले.

**३) राजकीय व्यवहारातील गुंतागुंतीचे निदान**

नव्या विश्वाच्या नव्या समस्यांचा सामना जुन्या पद्धतीने होईलच असे नाही. बदलत्या विश्वाचे व राष्ट्राचे साक्षेपी अध्ययन करण्यासाठी आणि राजकीय व्यवहारात जी गुंतागुंत तयार झाली होती त्याचे योग्य अन्वयार्थ काढून विश्लेषण करण्याची गरज प्रतिपादित केली जाऊ लागली. राजकीय व्यवहारातील गुंतागुंतीचे यथोचित निदान लावणेही महत्त्वाचे होते, त्याशिवाय राजकीय व्यवस्थेचे व प्रक्रियेचे अंतरंग समजू शकणे कठीण होते. या सर्व गोष्टींचा विचार करून आधुनिक राजकीय विश्लेषणाला आकार दिला गेला.

**४) शास्त्रीय प्रामाण्य**

राजकीय सिद्धांतापेक्षा राजकीय विश्लेषणाचा आधार भिन्न आहे. राजकीय विचार व विचारसरणी यापेक्षाही विश्लेषण हे वेगळ्या धाटणीचे आहे. आदर्श, मूल्य, पोथीनिष्ठता यापेक्षा राजकीय विश्लेषण तथ्य व प्रामाण्याला महत्त्व देते. पुरावे आणि कार्यकारणसंबंधाची मांडणी याला प्राधान्य देवून राजकीय विश्लेषण केले जाते. म्हणून पारंपरिक राज्यशास्त्राने जी तात्त्विक मांडणी केली त्याला नकार देत राज्यशास्त्राला शास्त्रीय पातळीवर सिद्ध करण्याचा आग्रह धरण्यात आला. त्यातून आधुनिक राजकीय विश्लेषणाचा विकास झाला. एक्सटाइनने या संदर्भात म्हटले की, "पुराव्याने जे वैध ठरेल तेवढेच 'शास्त्र' आणि जे वैध ठरवणे अशक्य असते ते तत्त्वज्ञान." राज्यशास्त्राला शास्त्रीय प्रामाण्यता देण्यासाठी आधुनिक राजकीय विश्लेषणाचा मार्ग तयार करण्यात आला.

**५) नव्या राजकीय व्यवस्था**

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया-आफ्रिकन राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले. साम्राज्यवादाचे राजकारण संपुष्टात आले. नवे राजकीय प्रयोग, राजकीय व्यवस्था

अस्तित्वात आल्या. काही राष्ट्रांनी पाश्चात्त्यांच्या राजकीय प्रारूपांचा स्वीकार केला असला तरी त्यात आपल्या इतिहास व संस्कृतीप्रमाणे तसेच राजकीय गरजांप्रमाणे आवश्यक बदलही केले. या व्यवस्थांचा अभ्यास व विश्लेषण करणे आवश्यक होते कारण यांचा परिणाम एकूण जागतिक व्यवस्थेवरही पडत होता तसेच द्विध्रुवीय जगात तिसऱ्या जगाची निर्मिती अलिप्तावादी चळवळीने करून सत्ता समतोल प्रस्थापित केला होता. या सर्वांचे विश्लेषण पारंपरिक धारणेतून करणे शक्य नव्हते. या सर्व पार्श्वभूमीवर आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय होणे स्वाभाविकच होते.

**६) लोकशाहीसाठी आव्हानात्मक काळ**

१९१८ ला पहिले महायुद्ध संपले आणि बहुतांश राष्ट्रांतील लोकशाही व्यवस्थांचा निकाल लागला. जर्मनी व इटाली या राष्ट्रांमध्ये तर हुकुमशाहीचे बीभत्स रूप साकारले गेले. जगात आलेली पहिली आर्थिक महामंदी, लोकशाही मूल्यांची पिछेहाट, "लोकशाही म्हणजे भणंगाचा बाजार," ही टीका लोकशाहीसाठी आव्हानात्मक स्थिती निर्माण करणारी होती. जगापुढे नवे प्रश्न उभे करणारा हा काळ होता. याचीच परिणती म्हणून हुकुमशाही विरूद्ध लोकशाही असा संघर्ष द्वितीय विश्वयुद्धाच्या माध्यमातून पहायला मिळाला. त्यानंतरही अनेक नव्या राष्ट्रांनी स्विकारलेली लोकशाही व्यवस्था अल्पजीवी ठरली. या सर्व घटना आणि काळ विश्लेषणकारांना नवे भान देणारा होता. त्यामुळेच आधुनिक राजकीय विश्लेषण करण्यासाठी चालना मिळाली.

**७) साम्यवादी व्यवस्थांचे वेगळेपण**

सोव्हिएत रशियामध्ये पहिल्या महायुद्धाच्या काळात साम्यवादी क्रांती घडून आली आणि जगाचे नवे मानचित्र तयार व्हायला सुरूवात झाली. पुढे चीन, क्युबा, व्हिएतनाम इतकेच नव्हे तर जगातील एक तृतीयांश राष्ट्रात साम्यवादी शासनपद्धतीने बाळसे धरले. तेथील नियोजनबद्ध विकास आणि समताधिष्ठीत व्यवस्था ही अचंबित करणारी होती. त्यासोबतच सत्तावादी धोरणाने साम्यवादी

राष्ट्रांकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले. साम्यवादी व्यवस्थेने स्वातंत्र्यावर आणलेले संकट हे ही गांभीर्याने पाहण्याची गरज होती. तसेच लोकशाही विरोधी विचारसरणी म्हणून त्याची केली जाणारी हेटाळणी याचाही विचार होणे आवश्यक होते. अशा सर्व पैलूने नवे राजकीय विश्लेषण होण्याची निकड निर्माण होऊन आधुनिक राजकीय विश्लेषणाचा जन्म झाला.

आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय होण्यासाठी या सर्व कारणांचा समूह कारणीभूत आहे. बदलत्या राजकीय स्थितीचे योग्य मूल्यमापन करणारी मापनपद्धतीच आधुनिक राजकीय विश्लेषणाद्वारे निर्माण झाली.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप**

द्वितीय विश्वयुद्धाच्या समाप्तीनंतर आधुनिक राजकीय विश्लेषणाचे युग सुरू झाले. तथ्य संकलन करून राजकीय प्रक्रिया व राजकारणासंबंधीचे यथार्थ विधान करण्याला आधुनिक राजकीय विश्लेषण असे संबोधले जाते. आधुनिक राजकीय विश्लेषण करण्यासाठी संशोधन तंत्रांचा व पद्धतीचा वापर केला जातो. निरीक्षण, परीक्षण, वर्गीकरण, सामान्यीकरण या पातळ्यांवर जावून एखादे विधान केले जाते. तथ्यांचे संकलन करताना ते शास्त्रीय पद्धतीने करून वस्तुनिष्ठपणे आशय विश्लेषण जेव्हा केले जाते तेव्हा त्यात आधुनिक राजकीय विश्लेषणाचे रुप दिसून येते.

औपचारिक घटकांनाच महत्त्व न देता आधुनिक राजकीय विश्लेषण अनौपचारिक घटकांना आपल्या विश्लेषणात समाविष्ट करून घेते. मानवी घटकाचा खूप मोठा परिणाम राजकीय प्रक्रियेवर होत असतो, याचा आधुनिक राजकीय विश्लेषणाने विचार केला.

आंतरशास्त्रीय स्वरूपाचा स्वीकार केल्याने आधुनिक राजकीय विश्लेषण राजकारणाचे मर्मग्राही विश्लेषण करण्यात यशस्वी ठरले. सर्व सामाजिक शास्त्रांचा व नैसर्गिक शास्त्रांचाही उपयोग राजकीय विश्लेषणासाठी करून विभिन्न पैलूंना निर्देशित करण्यात आधुनिक राजकीय विश्लेषणास यश आले. सामाजिक शास्त्रे

परस्परपुरक आहेत. मानवाचे वर्तन केवळ राजकीय असत नाही तर त्याला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, भौगिलिक व पर्यावरणीय पैलूही निगडीत असतात. त्या सर्व पैलूंचा अभ्यास करून विश्लेषण करण्यास आधुनिक राजकीय विश्लेषणाने चालना दिली.

पारंपरिक राजकीय विश्लेषणापेक्षा आधुनिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप पूर्णतः भिन्न होते. पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या मर्यादांवर मात करून राजकीय विश्लेषणाला अधिक शास्त्रीय बनविण्यात आधुनिक राजकीय विश्लेषणाने प्रयत्न केले. त्यामुळेच राजकीय विश्लेषण मूल्यमुक्त होण्यास मदत झाली.

आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या स्वरूपाला आकार देण्यात अनेक राज्यशास्त्रज्ञांचे योगदान राहिलेले आहे. याची सुरूवात होते कार्ल मार्क्सच्या विश्लेषणापासून. मानवी इतिहासातील प्रत्येक घटनेमागे आर्थिक कारण असून वर्गसंघर्ष हा त्याचा परिणाम आहे, असे विश्लेषण करून त्याने इतिहासाची भौतिक मीमांसा केली. आंतरशास्त्रीय दृष्टिकोन विकसित होण्यासाठी मार्क्सचे हे विश्लेषण उपयोगाचे पडले. तर वॉल्टर बेजहर्ट याने राज्यघटनात्मक अभ्यासाला अनौपचारिक स्पर्श दिला. ऑगस्त कॉम्ट यांनी प्रत्यक्षार्थवादी अभ्यासाला गती दिली तर हर्बर्ट स्पेन्सरने राज्याचा सेंद्रीय सिद्धांत मांडून मानवी शरीर रचनेप्रमाणे राज्याच्या क्रियान्वयनाचे विश्लेषण केले.

ग्रॅहॅम वालास यांनी १९०८ साली Human Nature in Politics हा ग्रंथ लिहून वर्तनवादाचा प्रारंभ केला. मानवाची सहज प्रवृत्तीच राजकारणावर प्रभाव पाडते, असे विश्लेषण करून राज्यशास्त्राला व्यावहारिक पातळीवर आणले. ऑर्थर बेंटले यांनी इ. स. १९०८ ला The Process of Government हा ग्रंथ लिहून राजकारणाच्या अनौपचारिक प्रक्रियेवर जास्त भर देऊन राज्याच्या राजकीय संस्थांना कमी महत्त्व दिले. रॉबर्ट मर्टन व टॉलकॉट पार्सन्स यांनी राजकारणातील सामाजिक वर्ग, सामाजिक संरचना व सामाजिकीकरण या अभ्यासावर भर देऊन राजकीय विश्लेषणाच्या सामाजिक अंगाला संपन्न बनविले. मॅक्स वेबरने शास्त्र

नैतिक बाबतीत तटस्थपणे विश्लेषण करणारे असावे असे सूचविले. तर फ्राईड, मैकडुगल व आयसैक या मानसशास्त्रज्ञांनी आधुनिक राजकीय विश्लेषणासाठी व्यक्तिगत व सामुहिक वर्तनाच्या सहसंबंधांचा विचार करण्याला अग्रक्रम दिला. रेडक्लिफ ब्राऊन व मेलिनोविस्की यांनी ज्ञान, कला, विश्वास, कायदा, रुढी-परंपरा यांची भूमिका राजकीय विश्लेषणासाठी मोलाची असते, असे मत नोंदवले.

हेरॉल्ड लॉस्वेल यांनी सत्ता विश्लेषणावर भर देऊन सत्तेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र, असे विश्लेषण केले. रॉबर्ट डहाल यांनी राजकीय विश्लेषणाला मोलाचे योगदान दिले. आपण ज्या जगात राहतो ते जग समजावून घेण्यासाठी राजकीय विश्लेषणच मदत करते असे स्पष्टपणे सांगितले. राजकारणाचे बरे-वाईट परिणाम प्रत्येक व्यक्तीवर होतच असतात, त्याचे राजकीय विश्लेषण झाले पाहिजे, याचा पुरस्कार केला. डेव्हिड ईस्टनच्या 'द पॉलिटिकल सिस्टिम' ग्रंथाने आधुनिक राजकीय विश्लेषणास व्यावहारिक पातळीवर आणून ठेवले. असेच योगदान आल्मंड, कार्लड्वाईश, ॲप्टर यांनीही दिले. राजकीय विश्लेषणाचे आधुनिक स्वरूप या विचारवंतांची देण आहे.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाची वैशिष्ट्ये**

**१) अनुभववादी विश्लेषण**

अनुभववादी राजकीय सिध्दांताला आधुनिक राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. अनुभववादी स्वरुपाचे समर्थन करणाऱ्यात प्रामुख्याने वर्तनवादी विचारवंत आघाडीवर आहेत. मूल्यविरहीत राजकीय विश्लेषणाची मांडणी करताना तथ्यांना व अनुभवाला महत्त्व द्यावे, असे याचे समर्थक म्हणतात. १९५० नंतर अनुभववादी राजकीय विश्लेषणाचे स्वरुप आविष्कारीत झाले आहे. ग्रॅहॅम वालास, ऑर्थर बेंटले, डेव्हिड ईस्टन, लॉस्वेल, आल्मंड, चार्लस मेरियम या विचारवंतांनी राजकीय विश्लेषणाची मांडणी करताना व्यक्ती व गटाचे राजकीय वर्तन, राजकीय व्यवस्थेचे प्रत्यक्ष संचालन व प्रक्रिया यानुसार राजकीय विश्लेषणाची मांडणी करण्याला प्रारंभ केला; ज्याचा परिणाम आदर्शवादी राजकीय विश्लेषणाचे स्वरुप बदलण्यात व अनुभववादी राजकीय

विश्लेषणाची सुरूवात होण्यात झाला. राजकीय विश्लेषणाच्या अनुभववादी स्वरुपाने व्यक्तीनिष्ठेला नाकारत वस्तुनिष्ठतेचा पुरस्कार केला. पध्दतीशास्त्राला महत्त्व देऊन अनुभवातून प्राप्त होणाऱ्या तथ्यांवर संशोधन करून राजकीय विश्लेषण मांडले जावे असा आग्रह आधुनिक काळात धरला गेला. राजकीय घटना व वस्तुस्थितीचा मूल्यनिरपेक्ष पध्दतीने अभ्यास केला पाहिजे याचे समर्थनही यात केले गेले. आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब, अनौपचारिक अध्ययनावर भर, वास्तवाचा शोध, आकडेवारीच्या आधारे विश्लेषण अशा मुख्य वैशिष्ट्यांवर राजकीय विश्लेषणाचे अनुभववादी स्वरुप अवलंबून आहे. थोडक्यात अनुभववादी राजकीय विश्लेषण 'काय असावे' यावर भर न देता 'काय आहे' याचा अभ्यास करण्याला व त्यावर सिध्दांत निर्मिती करण्याला महत्त्व देते.

### २) शास्त्रीय व शिस्तबद्ध विश्लेषण

राजकीय विश्लेषणाचा तत्त्वज्ञानाशी असणारा अनुबंध आज जवळपास संपुष्टात आला आहे. वैज्ञानिक पध्दतीचा स्वीकार केल्यास तात्त्विक तंत्राची आवश्यकता असणार नाही, या निष्कर्षाप्रत अनेक आधुनिक विचारवंत आलेले आहेत. राजकारणाचा अभ्यास अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्रांच्या संबंधाने केला पाहिजे, यावर अधिक भर दिला जात आहे. शिस्तबध्द राजकीय विश्लेषण करण्यासाठी असा विचार केला गेला. तद्वतच शिस्तबध्द विश्लेषणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी संशोधन प्रणालीचा वापर करण्यास प्राधान्य दिले जात आहे. सर्वेक्षण, निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, तौलनिक अध्ययन यांचा उपयोग करून तथ्य संकलन केले जाते आणि प्राप्त तथ्यांचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करून निष्कर्ष काढले जातात. अशा संशोधनात्मक मांडणी करताना गणिती पध्दतीला महत्त्व दिले जात असल्यामुळे राजकीय विश्लेषण अधिक शास्त्रीय, सुसंबंध स्वरुपाचे बनत आहेत.

### ३) वस्तुनिष्ठ विश्लेषण

राजकीय विश्लेषण हे व्यक्तीनिष्ठेवर अवलंबून नसते. तर तो वस्तुनिष्ठेशी

संबंधित असते. व्यक्ती वर्तनाचे असो की, राजकीय व्यवहाराचे विश्लेषण हे वस्तुनिष्ठ स्वरुपातच केले गेले पाहिजे. म्हणजे प्राप्त होणारे निष्कर्ष किंवा सिध्दांत वास्तवतेचे दर्शन घडविणारे असते. राजकीय विश्लेषणाचे वस्तुनिष्ठ स्वरुप कार्यकारण संबंधाला प्रगट करते. सर्वसमावेशक निष्कर्षाची मांडणी करण्याला वस्तुनिष्ठतेमुळे गती मिळते, ज्यामुळे राजकीय विश्लेषण वैश्विक बनण्यास मदत होते.

**४) मुक्त विश्लेषण**

आधुनिक राजकीय विश्लेषणात अध्ययनाचे क्षेत्र हे मुक्त स्वरुपाचे आहे. फक्त राजकीय घटनांनाच महत्त्व न देता अन्य सामाजिक शास्त्रांची मदत घेऊन विश्लेषण केले जाते. वास्तविक परिस्थितीचे विश्लेषण करायचे असेल तर त्यासंबंधी सर्व पैलूंची चिकित्सा आवश्यक ठरते. आंतरशास्त्रीय दृष्टिकोनातून एखाद्या घटनेचा व मानवी वर्तनाचा अभ्यास केल्यास राजकीय विश्लेषणास सखोलता प्राप्त होते आणि यथार्थ अध्ययनात सहजता साध्य होते. या धारणेतूनच अनेक अध्ययन क्षेत्र राजकीय विश्लेषणाने विकसित केले आहेत. यात राजकीय इतिहास, राजकीय भूगोल, राजकीय अर्थशास्त्र, राजकीय समाजशास्त्र, सामुद्रिक राजकारण, अंतरिक्षातील राजकारण, राजकीय मानसशास्त्र इत्यादींचा समावेश होतो. राजकीय विश्लेषणाने मुक्ततेला महत्त्व देऊन विशिष्टीकरणास विराम व सर्वसमाविष्टीकरणाला चालना दिली आहे.

**५) वर्तनवादी स्वरूप**

पारंपरिक राजकीय विश्लेषणात फक्त संस्थांचा अभ्यास केला जात होता. त्यामुळे तात्त्विक विवेचनास प्रचंड महत्त्व दिले जात असे. परंतु विसाव्या शतकाच्या मध्यानंतर ग्रॅहम वालास, ऑर्थर बेंटले, डेव्हिड ईस्टन यासारख्या विचारवंतांनी राजकीय विश्लेषणात मानवी वर्तनाचे अध्ययन झाले पाहिजे, याचा आग्रह धरला. मनुष्य हा समाजशील व राजकीय प्राणी असल्याने त्याच्या वर्तनाचा फार मोठा परिणाम राजकीय व्यवस्थेवर, संस्थांवर होतो. क्रांती, उत्क्रांती व विकासाची प्रारूपे ही मानवी वर्तनाशी निगडीत असतात. म्हणून मानवी वर्तन अभ्यासूनच विश्लेषण केले पाहिजे; तरच

विश्लेषणाला पूर्णत्त्व मिळते, असा विचार मांडला गेला. फक्त औपचारिक अध्ययनाला महत्त्व न देता अनौपचारिक अभ्यासाला चालना दिली पाहिजे, असे म्हणणारा वर्तनवादी विचारप्रवाह प्रभावी ठरू लागला. राजकीय नेतृत्त्वाचे वर्तन, नागरिकांचे वर्तन, निवडणुकीतील मतदारांचे वर्तन, धर्म-जात-लिंग-भाषा यांचा मानवी वर्तनावरील परिणाम व त्यातून तयार झालेल्या वर्तनाचा राजकारणावरील प्रभाव याचा अभ्यास केल्यानंतरच यथायोग्य राजकीय विश्लेषण होऊ शकते. वर्तनवादी अभ्यासाची एक मोठी लाटच आलेली दिसते, ज्यामुळे राजकीय विश्लेषणाचे पूर्ण स्वरुप वर्तनवादी बनले आहे. अमेरिकन राजकीय विचारवंतांनी वर्तनवादी विश्लेषणाची सुरूवात केली असल्यामुळे राजकीय विश्लेषणावर अमेरिकन राजकीय विचारवंतांच्या लेखनाचा फार मोठा परिणाम झालेला आढळतो.

**६) विश्लेषणाचे तीन आधार**

मिहान च्या मते, विश्लेषणात्मक दृष्टिकोनाचे मानवी समाजासंबंधी तीन प्रमुख सूत्र आहेत. किंबहुना राजकीय विश्लेषणाचे हे तीन सूत्रधार आहेत. त्यातील पहिले सूत्र म्हणजे 'वर्णन' होय. तथ्यांच्या संदर्भाने संकल्पनेच्या साह्याने वर्णन केले जाते. वर्णन हे अनुभवात्मक असेल तरच ते प्रमाण मानले जाते. वर्णनाची एक 'बौध्दिक सीमा' असते, ज्यात ते करावे लागते.

राजकीय विश्लेषणाचे दुसरे सूत्र आहे, ते म्हणजे 'व्याख्या'. याद्वारे तथ्यांमध्ये संबंध प्रस्थापित केला जातो. हा संबंध शाश्वत, संभाव्यतापूर्ण व प्रवृत्तीच्या स्वरुपात असू शकतो, जे सामान्यीकरणाद्वारे अभिव्यक्त केले जाते. सामान्यीकरण अशी गोष्ट आहे जी दोन किंवा दोन पेक्षा अधिक घटनांमध्ये अशाप्रकारे संबंध प्रस्थापित करते की, एका वर्गाचा सदस्य सहजपणे दुसऱ्या वर्गाचा सदस्य बनतो. वर्गीकरणाशिवाय सामान्यीकरण शक्य नाही. एक चांगली वर्गीकरण प्रणाली स्पष्टीकरणास साह्यभूत असते. परंतु ती कोणतीही सूचना करत नाही किंवा आपल्या ज्ञान भांडारात वृध्दी करत नाही.

तृतीय सूत्र म्हणजे 'मूल्यांकन'. हे सूत्र घटनेच्या सार्थकतेला व निरर्थकतेला

स्पष्ट करते. मूल्यांकनाचा संदर्भ स्त्रोत स्वतः व्यक्ती, त्याचे मूल्य व आदर्श असतात. याचा संबंध विश्वास, श्रध्दा आणि आस्था यांच्याशी असतो, परंतु परिणाम आणि तथ्यांच्या दृष्टीनेच मूल्यांकन केले जावू शकते.

राजकीय विश्लेषण या तीन सूत्रांचेच मिश्रण असते. सद्यःस्थितीत राजकीय विश्लेषण या त्रिसूत्राद्वारेच होते.

**७) बहुविध स्वरूप**

कालानुरूप राजकीय विश्लेषणाचे स्वरुप बदलत राहिले आहे. वैचारिक परिवर्तनानुसार राजकीय विश्लेषण कमी-अधिक प्रमाणात बदलत राहते. तरी देखील आदर्शवादी राजकीय विश्लेषणाचा कालखंड हा प्रदीर्घ राहिलेला होता. १९५० नंतर राजकीय विश्लेषणाचे स्वरुप आमूलाग्र बदलले. राजकीय विश्लेषणाला आज गणिती, सांख्यिकी, जीवशास्त्रीय तथा अर्थशास्त्रीय स्वरुप लाभले आहे. राजकीय विश्लेषणाला याच शाखांनी नवा आकारही दिला आहे. भविष्यात माहिती-तंत्रज्ञानात्मक प्रगतीचा परिणाम राजकीय विश्लेषणावर होऊन त्याच्या स्वरुपात अनेक बदल संभवनीय आहेत.

राजकीय विश्लेषणाचे हे परिवर्तनशील स्वरुप बदलत्या विश्वाचे निदर्शक मानावे लागेल. जगातील राजकीय व्यवहार जेवढ्या गतीने बदलतील तितक्या प्रमाणात राजकीय विश्लेषणाचे स्वरुप परिवर्तनशील होणे अपेक्षितच आहे.

**८) तुलनात्मक विश्लेषणास महत्त्व**

आधुनिक राजकीय विश्लेषणाने एकांगी, साचेबद्ध विश्लेषणाला नकारच दिला आहे. १९५० नंतर जगाची रचना आमूलाग्र स्वरूपात बदलली. विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्रे, दक्षिण-उत्तर संघर्ष, नव स्वतंत्र राष्ट्रे, तिसऱ्या जगातील राष्ट्रांची भूमिका या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करणे व त्या आधारे तौलानिक विश्लेषण करण्याला आधुनिक राजकीय विश्लेषणाने महत्त्व दिले. राजकीय व्यवस्था, शासन पद्धती, राजकीय संस्कृती यांचे तुलनात्मक विश्लेषण करून वर्तमान आणि भविष्यकालीन प्रश्नांची मांडणी व त्यांची सोडवणूक

करण्यासंबंधीचे भाष्य आधुनिक राजकीय विश्लेषणातून केले जाते. या तुलनात्मक राजकीय विश्लेषणातूनच तौलानिक राज्यशास्त्राचा विकास घडून आला आहे. आल्मंड व कोलमन यांनी The Politics of Developing Areas या ग्रंथात विकसनशील देशातील राजकीय व्यवस्थांचा तुलनात्मक अभ्यास केला. राजकीय व्यवस्थातील साम्य व भेद या तौलानिक विश्लेषणातून स्पष्ट होण्यास मदत होते.

**९) अमेरिकन विचारवंतांचा प्रभाव**

आधुनिक राजकीय विश्लेषण पद्धतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही विश्लेषण पद्धती अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांच्या बौद्धिक चळवळीचाच परिणाम आहे. त्यामुळे आधुनिक राजकीय विश्लेषण हे अमेरिकन विचारवंतांची देण मानावी लागते. वर्तनवाद, व्यवस्थावादी, संरचनात्मक-कार्यात्मक अशा अभ्यासपद्धती या अमेरिकन विचारवंतांकडूनच विकसित केल्या गेल्या.

आधुनिक राजकीय विश्लेषणाची विशेषता ही आहे की, ते शास्त्रीयदृष्ट्या सुदृढ आहे. आधुनिक विश्वाच्या गरजेप्रमाणे त्याच्यात असणारी परिपक्वता हीच राज्यशास्त्रालाही नवे परिमाण प्राप्त करून देते. आरोग्यशास्त्रातील जैविकांप्रमाणे (अँन्टीबायोटिक) राजकीय विश्लेषणातील शक्ती वाढत राहिली तरच अध्ययनातील सुदृढता टिकून राहू शकते.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाची व्याप्ती / अभ्यासविषय / अध्ययनक्षेत्र**

पारंपरिक राजकीय विश्लेषणाचे अभ्यासविषय प्रामुख्याने राजकीय तत्त्वज्ञान व संस्थावाद इतकेच मर्यादित होते. राज्यशास्त्राच्या इतिहासावर कटाक्ष टाकल्यास दीर्घकाळ या दोन अभ्यासविषयांचाच राजकीय विश्लेषणासाठी वापर केल्याचे ज्ञात होते. मात्र आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या उदयाबरोबर राजकीय विश्लेषणाच्या व्याप्तीत आमूलाग्र बदल झाले. आधुनिक राजकीय विश्लेषणाने नव्या विषयांचा अंतर्भाव आपल्या अध्ययनक्षेत्रात करून राजकीय विश्लेषणाला व्यापक बनविले. पारंपरिक राजकीय विश्लेषणाने दुर्लक्षित केलेल्या किंवा तुच्छतावादाने नाकारलेल्या विषयांनाही प्राधान्यक्रमाने समाविष्ट करत आधुनिक

राजकीय विश्लेषणाने आपले व्यापकत्त्व सिद्ध केले. आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या व्याप्तीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

**१) व्यवस्था विश्लेषण**

डेव्हिड ईस्टनच्या 'पॉलिटिकल सिस्टीम' या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर राजकीय व्यवस्था हा राजकीय विश्लेषणाचा केंद्रबिंदू बनला. राज्य, राष्ट्र, शासन, राज्यघटना याभोवतीच विश्लेषणाचा परीघ न रेखाटता तो एकूण राजकीय व्यवस्थेला कवेत घेणारा असावा याचा विचार आधुनिक राजकीय विश्लेषणात केला जातो. राजकीय व्यवस्था ही व्यापक संकल्पना असल्याने त्या राजकीय व्यवस्थेची प्रक्रिया तथा क्रियान्वयन विश्लेषित करण्याला आधुनिक राजकीय विश्लेषण महत्त्व देते. राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केवळ एकांगी न करता तो तौलानिक पातळीवर करून व्यवस्था-व्यवस्थामधील सारखेपणा व वेगळेपणाचे विश्लेषण आधुनिक राजकीय विश्लेषणात केले जाते.

**२) वर्तनवादी अभ्यास**

व्यक्ती ही राजकीय एकक असते. त्या व्यक्तीच्या राजकीय वर्तनावर लक्ष केंद्रीत करून त्याच्या वर्तनाचे सूत्र काय ? त्या वर्तनामागील हेतू व प्रेरणा काय ? विशिष्ट वर्तनातील नियमितता किती व कशी ? या प्रश्नांचा चिकित्सक वेध घेत त्या वर्तनातून राजकीय प्रक्रिया, निवडणुका, राजकीय पक्ष, निर्णय प्रक्रिया यावर कोणता परिणाम घडून येतो याचा अभ्यास आधुनिक राजकीय विश्लेषण करते. वर्तनवादी क्रांती विसाव्या शतकात झाल्यानंतर राजकीय विश्लेषणासाठी तिचा मोठा उपयोग केला गेला. आधुनिक राजकीय विश्लेषणाने वर्तनवादी अभ्यास केल्यामुळे विश्लेषणाला वस्तुनिष्ठ व शास्त्रीय आयाम प्राप्त होऊ शकला.

**३) अनौपचारिक घटकांचे अध्ययन**

आधुनिक राजकीय विश्लेषण हे अनौपचारिक घटकांच्या अभ्यासास प्राधान्य देते. राजकीय पक्ष, दबावगट, हितसंबंधी गट, निवडणुकातून घडणारी

व्यक्ती मानसिकता अशा अनौपचारिक घटकांचे अध्ययन करून त्यांचा परिणाम राजकारणावर कसा होतो, याचेही अध्ययन आधुनिक राजकीय विश्लेषणातून केले जाते. अनौपचारिक घटकांच्या अभ्यासाला महत्त्व दिल्यामुळे आधुनिक राजकीय विश्लेषणाचा आवाका खूपच वाढला आहे.

**४) बहुसत्तावाद**

समाज अनेक समुहांचा समुच्चय असतो. समाजातील या समुहात सहकार्य आणि स्पर्धात्मक संबंध असतात. यातून एका वर्तनाची व आंतरसंबंधाची निर्मिती होते. हे वर्तन व आंतरसंबंध समाज व राजकीय संरचना यांच्यावर परिणाम घडवित असते. प्रामुख्याने लोकशाही व्यवस्थेत या परिणामांचा विशेष विचार केला जातो. या सर्व गोष्टींचा अभ्यास म्हणजेच बहुसत्तावादी अभ्यास होय. यालाच अनेकसत्तावाद ही म्हणतात. आधुनिक राजकीय विश्लेषणाने आपल्या अध्ययन क्षेत्रात अनेकसत्तावादाचा अंतर्भाव केलेला आहे. समाजातील सर्व समुहांचा किंवा संस्थांचा एकमेकांवर होणारा परिणाम आणि त्यातून आकाराला येणारे राजकारण याचे विश्लेषण करण्याची प्रवृत्ती आधुनिक राजकीय विश्लेषणाची आहे.

**५) विकासवादी अभ्यास**

विकासवादी अभ्यास हा आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या व्याप्तीतील एक महत्त्वाचा घटक आहे. औद्योगीकरण, आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रांना स्वातंत्र्य, जागतिकीकरण  या बाबींचा विचार करून त्यातून निर्माण झालेल्या विकास प्रारूपांचा अभ्यास करणे हा आधुनिक राजकीय विश्लेषणाचा पिंड आहे. याशिवाय नवोदित राष्ट्रांनी जी विकासाची पाश्चिमात्त्य प्रारूपे स्वीकारली ती अयशस्वी ठरली. या अपयशामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्नही आधुनिक राजकीय विश्लेषण करते. विकासाच्या अनुषंगाने होणारा संघर्ष हा ही आधुनिक राजकीय विश्लेषणाचा अभ्यासविषय आहे. विकासाभिमुख अभ्यास व विश्लेषण हे आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासाची मुख्य दिशा आहे.

### ६) राजकीय प्रक्रियेचे निरीक्षण

राजकीय प्रक्रिया ही सातत्याने गतीमान असते. राजकीय पक्ष, दबावगट यात लोक सहभागी होतात. राज्यकारभारात वेगवेगळ्या राजकीय कृतीतून लोक राजकीय सहभाग नोंदवित असतात. मागण्या करतात, राजकीय व्यवस्था त्या मागण्यांना प्रतिसाद देते व निर्णयही घेते. त्याने लोक संतुष्ट किंवा असंतुष्ट होतात व परत राजकीय व्यवस्थेवर प्रभाव पाडण्यासाठी राजकीय कृती करतात. ही राजकीय प्रक्रिया अखंडितपणे चालू असते. राजकीय सहभाग, राजकीय सामाजिकरण, राजकीय भरती व त्यातून विकसित होणारी राजकीय संस्कृती ही राजकीय प्रक्रियेचाच परिणाम असते. त्यामुळे आधुनिक राजकीय विश्लेषण या राजकीय प्रक्रियेचे निरीक्षणात्मक अध्ययन करण्यास प्राधान्य देते.

### ७) नव्या संकल्पनांचे अध्ययन

आधुनिक राजकीय विश्लेषण पारंपरिक अभ्यासविषयांना एकप्रकारे नाकारतेच. सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता, प्रभाव, अभिजन वर्ग, लोकशाहीतील अभिजन, आधुनिकीकरण, राजकीय विकास, राजकीय परिवर्तन, राजकीय संसूचन, लोकमत अशा अनेकविध नवीन संकल्पनांचा अभ्यास आधुनिक राजकीय विश्लेषणात होतो. राजकीय विश्लेषणात या नव्या संकल्पनांना समाविष्ट करून घेण्यासाठी प्रथम त्यांचे योग्य अध्ययन व आकलन आवश्यक ठरते. तसेच या नव्या संकल्पनांना विकसित करण्याचे व त्यांना 'चर' म्हणून वापरण्याचे कार्यही आधुनिक राजकीय विश्लेषण करते.

### ८) लोकमताचा विचार

आधुनिक काळात जगभर राजकीय जागृती वाढीस लागली आहे. लोकमताचे निर्धारण वेगाने होत आहे. जागतिक लोकमताचा रेटा वैश्विक राजकीय प्रक्रिया व निर्णयाला विचारात घेणे क्रमप्राप्त झाले आहे. प्रसारमाध्यमांची भूमिका लोकमताला पोषक ठरलेली आहे. राजकीय व्यवस्थात होणारे बदल असोत की नेतृत्त्वाचे परिवर्तन, शांतता करार असोत की युद्ध, प्रत्येक घटनेवर लोकमताचा

प्रभाव असतोच. या लोकमताची निर्मिती, अभिव्यक्ती व परिणाम यांचा अभ्यास आधुनिक राजकीय विश्लेषणात केला जातो. राजकीय विश्लेषणाला लोकमत प्रभावित करते.

**९) नेतृत्वाचे अध्ययन**

राजकीय नेतृत्व हे प्रत्येक राजकीय व्यवस्थेचे दर्शनी रुप असते. नेतृत्वच राजकीय व्यवस्थेला क्रियान्वित करते. नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्याच्या धोरणाचा परिणाम राजकारणावर व समाजजीवनावर होत असतो. त्यामुळे केवळ राज्यघटनेने पदाला दिलेल्या अधिकारांचा विचार करणेच पुरेसे ठरत नाही तर राजकीय नेतृत्वाच्या एकूण भूमिकेचा अभ्यास करणे गरजेचे असते. राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करून जे राजकीय विश्लेषण केले जाते त्यात अधिक स्पष्टता असते. संवैधानिक पदसोपानाचा केवळ विचार न करता प्रत्यक्ष राजकीय नेतृत्वाचा समग्र अभ्यास करण्यावर आधुनिक राजकीय विश्लेषणाचा भर असतो.

**१०) बदलते राजकारण**

आधुनिक राजकीय विश्लेषणाची प्रयोगशाळा म्हणजे प्रत्यक्ष राजकारण व राजकीय व्यवहार होय. संसूचन क्रांती व जागतिकीकरणाने राजकारणात खूप मोठे बदल घडवून आणले तसेच दैनंदिन जीवनात राजकारणात होणारे बदल हे खूपच गतीशील आहेत. या सर्व बदलत्या राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करणे ही आधुनिक राजकीय विश्लेषणाची प्राथमिक गरज बनली आहे. बदलत्या राजकारणातून निर्माण होणारे पेच, प्रश्न व परिणाम यांचा अभ्यास करूनच त्याचे योग्य अन्वयार्थ लावता येतात. म्हणून बदलते राजकारण आधुनिक राजकीय विश्लेषणाचे अभ्यासक्षेत्र आहे.

अशाप्रकारे आधुनिक राजकीय विश्लेषणाची व्याप्ती स्पष्ट करता येत असली तरी ही व्याप्ती दिवसेन्‌दिवस वाढतच आहे. राजकीय विश्लेषणाला आलेले महत्त्व हे व्याप्तीच्या वाढीतील प्रमुख कारण आहे.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाचे महत्त्व / उपयुक्तता**

**१) राजकारणासंबंधीची नवीन जाणीव**

आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उदय हा राज्यशास्त्र व राजकारणासाठी एक महत्त्वपूर्ण घटना मानावी लागेल. कारण राजकारणासंबंधी नवीन जाणिवा विकसित होण्यासाठी आधुनिक राजकीय विश्लेषणाने महत्त्वाची भूमिका वठविली. प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराकडे तुच्छतावादी दृष्टीने पाहणाऱ्या पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या दृष्टिकोनाला नाकारून राजकारण व एकूण राजकीय प्रक्रियेवर वास्तववादी भाष्य केले पाहिजे आणि त्याद्वारेच राजकीय सिद्धांताची मांडणी किंवा भविष्यकथन केले पाहिजे, असा विचार आधुनिक राजकीय विश्लेषणाने मांडला त्यामुळे राजकारण व प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराबद्दल नव्याने व पूर्वग्रहदुषितपणा न बाळगता विचार होऊ लागला.

**२) शास्त्रीय महत्त्व**

राजकीय विश्लेषणाला शास्त्रीयता प्रदान करण्यासाठी आधुनिक राजकीय विश्लेषणाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. राजकीय वर्तनाचे एक शास्त्र म्हणून राज्यशास्त्राला ओळख देण्याला आधुनिक राजकीय विश्लेषणाने स्वीकारलेले वर्तनवादी, व्यवस्थावादी अभ्यास दृष्टिकोन आणि वस्तुनिष्ठपणे राजकीय व्यवहाराचे केलेले अनुशीलन यातून जे निष्कर्ष मांडले व विश्लेषण केले ते अधिक सत्याधिष्ठीत व यथार्थ सिद्ध झाले. त्यामुळे राज्यशास्त्राला शास्त्रीय व्याख्या प्रस्तुत करण्यात मदत झाली. आधुनिक राजकीय विश्लेषणाचे हे शास्त्रीय महत्त्व मोलाचे मानावे लागते.

**३) नवे दालन खुले**

राज्यशास्त्रज्ञांना व राजकीय विश्लेषकांना आधुनिक राजकीय विश्लेषणाने अभ्यासाचे नवे दालन खुले करून दिले आहे. अभ्यासाची प्रचंड व्याप्ती असलेल्या अनौपचारिक घटकांना विश्लेषणासाठी खुले करून दिल्याने संशोधनासाठी नव्या विषयांची उपलब्धता वाढली आहे. प्राचीन ते मध्ययुगीन या काळात अभ्यासात

तोच तो पणा निर्माण झाला होता. संस्था, संकल्पना व संविधानाच्या बाहेर विचार करायला राज्यशास्त्रज्ञांना संधी नव्हती पण आधुनिक राजकीय विश्लेषणाने राजकीय प्रक्रिया, संरचना, मानवाचे राजकीय वर्तन या क्षेत्रांना राजकीय विश्लेषणासाठी खुले करून ज्ञानाचे नवे दालनच खुले केले.

**४) वास्तवाला समजून घेण्यासाठी महत्त्वाचे**

आधुनिक राजकीय विश्लेषण वास्तवाला समजून घेण्यासाठी सहाय्यक आहे. शास्त्रीय साधनांद्वारे शिस्तबद्ध तथ्यांचा शोध व त्यांचा क्रम लावून त्याद्वारे विश्लेषण करण्यास प्राधान्य देणारे आधुनिक राजकीय विश्लेषण वास्तविकतेचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरते तसेच राजकीय घटनेतील तथ्य व वास्तवतेचे दर्शन घडविण्यासाठी आधुनिक राजकीय विश्लेषणाचा उपयोग झाला आहे. तसेच या विश्लेषणामुळे अनेक भ्रमांना मूठमाती मिळाली आहे.

**५) संतुलनाची प्रस्थापना**

आधुनिक राजकीय विश्लेषण एक संतुलनाचे साधन आहे. राजकीय तथ्ये, घटना, अध्ययन पद्धती, मानवी मूल्ये, राजकारण या सर्वात संतुलन निर्माण करण्यात आधुनिक राजकीय विश्लेषणाला यश आले. या संतुलनामुळे संतुलित व वस्तुनिष्ठ अभ्यासास गती प्राप्त झाली.

**६) शिस्तबद्ध अभ्यासास चालना**

आधुनिक राजकीय विश्लेषणाने राज्यशास्त्रात शिस्तबद्ध अभ्यासास चालना दिली. संशोधन पद्धतीचा अवलंब करत वैज्ञानिकतेस महत्त्व देणाऱ्या शिस्तबद्धतेमुळे कल्पनारम्य मांडणीला विराम मिळाला आणि तथ्यांचे संकलन, वर्गीकरण, परीक्षण, सामान्यीकरण व विश्लेषण याद्वारेच सिद्धांतीकरण करण्याला चालना मिळाली, हे आधुनिक राजकीय विश्लेषणाचे अद्वितीय कार्य आहे.

**७) राजकीय नेतृत्वाला मार्गदर्शक**

राजकारणाचे संचालन करतात ते राजकीय नेते. राजकारणाला नित्य नव्याने समजून घ्यावे लागते. कारण राजकारण परिवर्तनशील असते. लोकमानसिक्तेत

सतत बदल होत असतात. तसेच राजकीय व्यवस्थेकडे लोक मागण्यांद्वारे आपले म्हणणे मांडत असतात. व्यवस्था त्यासंबंधी नेमकी कोणती प्रदान कार्ये करते व त्यातून लोकांची मते कशी निर्धारित होतात या सर्वांचे आकलन करून घेण्यासाठी राजकीय नेतृत्वाला आधुनिक राजकीय विश्लेषणावर अवलंबून रहावे लागते. तसेच निवडणुका, मतदार वर्तन, राजकीय सहभाग व राजकीय सामाजिकीकरण या सर्वांचे केलेले विश्लेषण राजकीय नेत्यांना आपली राजकीय व्यूहनीती ठरवत असताना मार्गदर्शक ठरते.

**८) राजकीय प्रक्रियेसंबंधीच्या ज्ञानासाठी उपयुक्त**

आधुनिक राजकीय विश्लेषण हे राजकीय व्यवस्था, राजकीय प्रक्रिया व राजकीय व्यवस्थेतील घटकासंबंधीचे विश्लेषण करण्यावर भर देत असल्यामुळे सामान्य नागरिक, कार्यकर्ते, राजकीय पक्ष व प्रशासक यांना राजकीय प्रक्रियेचे इत्यंभूत ज्ञान यातून प्राप्त होते; ज्याचा उपयोग राजकीय सहभाग, राजकीय संसूचन व राजकीय शिक्षणासाठी होऊ शकतो. लोकशाही शासनपद्धतीमध्ये तर नागरिकांना राजकीय प्रक्रियेचे ज्ञान होणे आवश्यक मानले जाते. कारण त्याशिवाय राजकीय व्यवस्था ही लोकाभिमुख होणार नाही आणि राजकीय सहभागात वृद्धी होणार नाही. आधुनिक राजकीय विश्लेषणाने राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण करण्यास महत्त्व दिल्याने त्यासंबंधीचे ज्ञान सामान्यास होण्याला मदत होते. ही उपयुक्तता सांगता येते.

आधुनिक राजकीय विश्लेषण राजकीय, मानसशास्त्रीय व वैज्ञानिक पातळीवर कार्य करते. राज्याच्या धोरणापासून नेतृत्वाच्या निर्माणापर्यंत आधुनिक राजकीय विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखितच करावे लागते. आधुनिक राजकारणाची व युगाची राजकीय विश्लेषण गरज आहे.

# २ ‖ आधुनिक राजकीय विश्लेषणाचे अध्ययन दृष्टिकोन

राज्यशास्त्र हे प्राचीनतम शास्त्र आहे. राजकीय घटना, संस्था, मानवी व्यवहार याकडे पाहण्याचे व त्याचे विश्लेषण करण्याचे भिन्न दृष्टिकोन कालपरत्त्वे विकसित झालेले आहेत. राजकीय विश्लेषणाचा मूळ पोत हा दृष्टिकोनाद्वारेच विकसित झालेला आहे. अध्ययनाच्या दिशांना अधिक बळकट करण्यासाठी विशिष्ट दृष्टिकोनाचा आधार घेणे गरजेचे असते. पद्धती व दृष्टिकोन यात मूलभूत बदल आहे. पद्धती ही ज्ञान संपादनाचा मार्ग असते तर दृष्टिकोन विशिष्ट निवडलेल्या भूमिकेचे नाव आहे. तसेच दृष्टिकोन विवेचनाचा हेतू स्पष्ट करत असतो. म्हणून बऱ्याचवेळा दृष्टिकोन हा शब्द सिद्धांत या अर्थाने सुद्धा वापरला जातो. व्हर्नान डाईक या विचारवंताने दृष्टिकोनाची व्याख्या प्रतिपादित करताना म्हटले आहे की, "अभ्यासाकरिता कोणते विषय निवडावेत आणि त्या विषयासंबंधीची माहिती कोणत्या स्वरूपात व कशी एकत्रित करावी याबाबत जे निकष निश्चित केले जातात, त्याला दृष्टिकोन असे म्हणतात."

राजकीय विश्लेषणासाठी विभिन्न दृष्टिकोनाचा उपयोग पारंपरिक राज्यशास्त्रात केला गेलेला आहे. पारंपरिक राज्यशास्त्रात ऐतिहासिक, संस्थात्मक, वैधानिक या दृष्टिकोनांना विशेष महत्त्व देण्यात आलेले दिसते. ज्या विचारदृष्टीने

विषयाचे प्रतिपादन केले गेले त्यावरून त्या दृष्टिकोनाची ओळख होते. ॲरिस्टॉटलने केलेले राजकीय विश्लेषण हे प्रामुख्याने संस्थात्मक व वैधानिक दृष्टिकोनाच्या आधारेच केलेले दिसते. तर 'द पॉलिटिक्स' या ग्रंथात ॲरिस्टॉटलचा व्यवस्थावादी दृष्टिकोनही प्रत्ययास येतो. पारंपरिक राजकीय विश्लेषणात प्रामुख्याने मूल्यप्रधानतेला महत्त्व देण्यात आले होते. संस्थात्मक दृष्टिकोनाने निश्चित स्वरूपात साचेबंदपणा निर्माण केला होता. 'राज्य' या केंद्राभोवती राजकीय विश्लेषणाचे संपूर्ण परीघ फिरत होते. १९५० नंतर राज्यशास्त्रज्ञांनी शास्त्रीय व अनुभवनिष्ठतेला महत्त्व देत विश्लेषणाच्या अभ्यास दृष्टिकोनांना विस्तारित रुप बहाल केले. नवीन दृष्टिकोनाद्वारे राजकीय विश्लेषण करण्यास प्राधान्य दिले. 'राज्यासंबंधीचे शास्त्र' किंवा 'राज्यसंस्थेचे शास्त्र' ही मर्यादित ओळख मोडीत काढून आंतरविद्याशास्त्रीय दृष्टिकोनाची प्रस्थापना करण्यास प्रारंभ झाला. यातूनच आधुनिक राजकीय विश्लेषणाचा आविष्कार झाला. आधुनिक राजकीय विश्लेषणाने 'काय असावे' यापेक्षा 'काय आहे' याला महत्त्व दिले.

आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या अभ्यास दृष्टिकोनांचा विकास होण्यासाठी काही विचारवंतांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. त्यात प्रामुख्याने ग्रॅहम वालास यांचा उल्लेख करावा लागेल. इ. स. १९०८ मध्ये ग्रॅहम वालास यांनी 'Human Nature in Politics' हा ग्रंथ लिहिला. राजकीय विश्लेषणासाठी तथ्यांना प्राधान्य देण्याचा युक्तीवाद त्यांनी केला. अनुभववादी व वर्तनवादी दृष्टिकोनाद्वारे राजकीय विश्लेषण करण्याचा आग्रह त्यांनी धरला. त्यामुळे राज्यशास्त्रात पुढील काळात वर्तनवादी क्रांतीचा जन्म झाला. ऑर्थर बेंटले यांनीही १९०८ मध्येच 'The Process of Government' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाद्वारे राजकीय प्रक्रिया आणि समुह प्रक्रियेच्या अभ्यासाकडे लक्ष वेधले गेले. राज्य व राजकीय संस्थांवर अधिक भाष्य करण्यास काही प्रतिबंध बेंटलेच्या लिखानामुळे आले. राजकीय पक्ष, दबावगट, नेतृत्त्व, निवडणुका, लोकमत यावर अध्ययन करण्यास चालना मिळाली. रॉबर्ट मर्टन, टॉलकॉट

पार्सन्स यांनी राजकीय विश्लेषणासाठी सामाजिक व्यवस्थेच्या अध्ययनाचा पुरस्कार केला. फ्राईड, मॅकडुगल, आयसेंक या मनोविश्लेषकांनी व्यक्तिगत व सामुहिक वर्तनाचा सहसंबंध प्रस्थापित करून विश्लेषण करण्याची संहिता प्रसिद्ध केली. ब्राऊन व मेलिनोविस्की या वैज्ञानिकांनी ज्ञान, कला, विश्वास, परंपरा यातून प्रवाहित होणाऱ्या गोष्टींच्या आकलनाची चिकित्सा करण्यासाठी लिखाण केले. तसेच डेव्हिड ईस्टन, आल्मंड, कार्लड्वाईश, डेव्हिड ॲप्टर यांनीही आधुनिक राजकीय विश्लेषणाचे अभ्यास दृष्टिकोन विकसित करण्याला भरीव योगदान दिले. राजकारणाला प्रभावित करण्याला जे व्यवहार प्रभावित करतात त्यादृष्टीने विश्लेषण करण्याची सुरूवात या विचारवंतांनी केली.

विसाव्या शतकाच्या मध्यानंतर म्हणजे द्वितीय महायुद्धाच्या नंतर राजकीय विश्लेषणाचे आधुनिक दृष्टिकोन विशेषत्त्वाने पुढे आलेले दिसतात. पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या मर्यादा व त्याविरूद्धची एक प्रतिक्रिया म्हणून या दृष्टिकोनांचा उदय झालेला दिसतो. आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या या अभ्यास दृष्टिकोनांचा विचार केल्यासच राजकीय विश्लेषणाची विशिष्ट व वस्तुनिष्ठ दृष्टी प्राप्त होण्यास मदत मिळू शकते.

## वर्तनवादी दृष्टिकोन

पारंपरिक राजकीय विश्लेषणाने मूल्याधारित विश्लेषणास अतिरेकी महत्त्व दिल्यामुळे राज्यशास्त्र वास्तवापासून विलग झाले. शास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण न केल्यामुळे राज्यशास्त्रास कल्पनारम्य स्वरूप आणि साचलेपण प्राप्त होवू लागले. विसाव्या शतकात निर्माण झालेले प्रश्न, द्वितीय महायुद्धानंतर अस्तित्वात आलेले नवे जग, विकसित होणाऱ्या राजकीय व्यवस्था या सर्व पार्श्वभूमीवर राजकीय विश्लेषणाच्या आधुनिक मांडणीची मागणी होऊ लागली आणि त्यातूनच वर्तनवादी दृष्टिकोनाचा उदय झाला. रॉबर्ट डहाल यांनी म्हटल्याप्रमाणे, "वर्तनवादी क्रांती ही परंपरागत राज्यशास्त्राच्या प्राप्तीच्या प्रती

असलेल्या असंतोषाचा परिणाम आहे ज्याचा उद्देश राज्यशास्त्राला अधिक शास्त्रीय बनविण्याचा आहे."

**वर्तनवादी अभ्यासाचा प्रारंभ**

'वर्तनवाद' हा शब्द राज्यशास्त्रात सर्वप्रथम हर्बर्ट टिंगस्टन यांनी वापरात आणला. तत्पूर्वी १९२५ ला चार्लस मेरियम या विचारवंताने New Aspects of Politics या ग्रंथात वर्तनवादाच्या नव्या पद्धतीस क्रमबद्धता बहाल केली होती. त्यानंतर १९२८ मध्ये फ्रँक केंट याने 'पॉलिटिकल बिहेव्हियर' या पुस्तकातून वर्तनवादाचा विचार प्रसूत केला. शास्त्रीय संशोधन करताना जे. बी. वॅटसन हा राज्यशास्त्रज्ञही वर्तनवादाचा उल्लेख करतो. ग्रॅहॅम वालास यांच्या Human Nature in Politics व ऑर्थर बेंटले यांच्या The Process of Government या ग्रंथातून वर्तनवादी दृष्टिकोनाला सैद्धांतिक आधार प्राप्त झाला. वर्तनवादी दृष्टिकोनाचा विचार व विकास करण्यामध्ये अमेरिकन विचारवंतांचे योगदान राहिलेले आहे. शिकागो विद्यापीठातील त्रिमूर्ती - टी. व्ही. स्मिथ, चार्लस मेरियम व हेरॉल्ड लॉस्वेल यांना अभिनव राज्यशास्त्राचे संस्थापक मानले जाते. मेरियमच्या प्रेरणेनेच प्रसिद्ध शिकागो संप्रदाय वर्तनवादाचा बालेकिल्ला बनला. पुढे डेव्हिड ईस्टन यांनी 'The Political System' व 'An Enquiry into the State of Political Science' या ग्रंथातून वर्तनवादाचा बौद्धिक पाया मजबूत केला. याशिवाय व्ही. ओ. की., डेव्हिड ट्रूमन, हर्बर्ट सिमन व गॅब्रिएल आल्मंड या विचारवंतांनीही राजकीय विश्लेषणासाठी वर्तनवादावरच भर दिला. मोस्का, मॅक्स वेबर, टॉलकॉट पार्सन्स या समाजशास्त्रज्ञांनी राजकीय वर्तनाचा चिकित्सक अभ्यास केला.

**वर्तनवादाचा अर्थबोध**

प्रत्येक सजीवाच्या बाबतीत 'उत्तेजना' व 'प्रतिसाद' या दोन बाबी समांतर आहेत. माणूस हा देखील याला अपवाद नाही. विशिष्ट परिस्थितीत व्यक्तीचे होणारे वर्तन हे उत्तेजन व प्रतिसाद या दोन बिंदूवरच अवलंबून असते.

त्या दोन बिंदूना जोडून जेव्हा मानवी वर्तनाचा राजकीय अन्वयार्थ काढला जातो व त्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले जाते, त्याला वर्तनवादी अध्ययन असे म्हणतात. माणसाच्या राजकीय व्यवहाराचे मापन करणे शक्य आहे, हे वर्तनवादाने सिद्ध केले आहे. वर्तनवादाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी काही विचारवंतांच्या मतांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**अल्फ्रेड ग्राजिया** यांच्या मते,

"वर्तनवादी राजकीय विश्लेषण हे स्वयंच एक विषय, एक आंतरशास्त्रीय शास्त्र, परिमाणीकरण, नव्या पद्धतीच्या आविष्काराचा प्रयत्न नाही. हे आदर्शवादाच्या विरूद्ध वास्तववाद, निगमन पद्धतीच्या विरूद्ध अनुभववादही नाही. तर ते राज्यशास्त्राचे खरे रुप आहे."

**डेव्हिड ईस्टन** यांच्या मते,

"वर्तनवाद शास्त्रीय मनोदशेचे प्रतिबिंब आहे."

**कीर्क पैट्रिक** यांच्या मते,

"वर्तनवादाचे तात्पर्य निश्चित आहे. राजकीय जीवनाच्या अभ्यासामध्ये संकल्पना, कृती, तंत्रज्ञान व लक्षणे यांचा अंतर्भाव होतो. अंतिमतः वर्तनवादाला समजण्यासाठी सर्व पैलूने अध्ययन केले पाहिजे."

**रॉबर्ट डहाल** यांच्या मते,

"वर्तनवाद हे एक विरोधी आंदोलन आहे, ते पारंपरिक राजकीय विश्लेषणाविरूद्धची प्रतिक्रिया आहे. राज्यशास्त्राला वस्तुनिष्ठ बनविण्यासाठी व अनुभवात्मक तत्त्वांना शास्त्रशुद्धता प्रदान करण्यासाठी मनुष्याच्या व्यवहाराचे परीक्षण करून राजकीय जीवनाला अधिक अनुभविक व शास्त्रीय करण्यासाठीचा वर्तनवाद एक दृष्टिकोन आहे."

उपरोक्त मतांचा विचार करता हे अधिक स्पष्ट होते की, वर्तनवादी दृष्टिकोन हा मानवी वर्तनाचा राजकीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास करण्याला महत्त्व देतो. तसेच वर्तनवादी दृष्टिकोन व्यक्तीच्या राजकीय भूमिकांचे वास्तविक

अनुशीलन करण्यास चालना देते. मनुष्य हा समाजशील व राजकीय प्राणी असेल तर त्याच्या प्रत्येक व्यवहारामागील राजकीय हेतू तपासले पाहिजेत, यावर वर्तनवाद भर देतो.

**वर्तनवादी दृष्टिकोनाचे उद्देश**

१) राजकीय घटनांचा अन्वयार्थ लावून भविष्यकथन करणे.

२) व्यापक तुलना करून विश्लेषण करणे.

३) तथ्य संकलन करून त्या आधारेच राजकीय विश्लेषण करणे.

४) व्यक्ती हा अध्ययनाचा केंद्रबिंदू मानणे.

५) मानवी वर्तनाचे मापन करून विश्लेषण करण्यासाठी तंत्राचा वापर करणे.

**वर्तनवादाची मूलतत्त्वे / स्वरूप / लक्षणे**

वर्तनवादाने राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासाचा नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. वर्तनवादी दृष्टिकोन ज्या मूलतत्त्वांवर आधारलेला आहे त्याचा आढावा घेणे गरजेचे ठरते.

**(१) एकक**

वर्तनवादी दृष्टिकोन अध्ययनासाठी खूप लहान एकक निवडण्याचा पुरस्कार करतो. लहान-लहान विषयांचे गंभीर अध्ययन व विश्लेषण करण्यास ते प्राधान्य देते. एकक (Unit) जितके सूक्ष्म तितका अभ्यास सखोल असतो, ही धारणा वर्तनवादी दृष्टिकोनाची आहे.

**(२) व्यक्ती वर्तन व समूह वर्तनाचा अभ्यास**

राजकीय विश्लेषणाला प्रभावी करण्यासाठी व्यक्ती व समुहाच्या वर्तनाचा अभ्यास अत्यावश्यक ठरतो. केवळ संस्थात्मक अभ्यास हा अपर्याप्त आहे. कोणत्याही राजकीय संस्था व घटनेच्या मागे मानवी वर्तन हेच कारणीभूत असते. त्यासाठी राजकीय अभ्यासकांनी व्यक्ती व समुहाच्या व्यवहाराचे निरीक्षण व चिकित्सक अभ्यास करणे वर्तनवाद मूलभूत मानतो. राजकीय नेतृत्व, नागरिक मतदार, नोकरशाही, दबावगट याद्वारे जी भूमिका वठविली जाते,

त्यातूनच राजकीय व्यवस्था क्रियान्वित होत असते. म्हणून या भूमिकामागील वर्तनाचे अध्ययन आवश्यक असते.

**(३) अध्ययनातून सिद्धांत निर्मिती**

अभ्यासाचा मूळ हेतू सिद्धांताची निर्मिती करणे हा असला पाहिजे. सिद्धांताची निर्मिती ही समग्र व सामान्यीकरणाच्या स्वरूपात असली पाहिजे, ज्यामध्ये कार्यकारण संबंध स्थापित केले जावू शकतील. वर्तनवादाची सर्वात मोठी विशेषता हीच आहे की, सिद्धांताला प्रयोगाच्या पातळीवर यामध्ये आणले जाते. वर्तनवाद तथ्यांचा शोध आणि त्याची व्याख्या एकाच सिद्धांताच्या अंतर्गत करतो.

**(४) आंतरशास्त्रीय दृष्टिकोन**

मानवी वर्तन हे एकाच क्षेत्राचा परिणाम नसतो. तर त्यासाठी भिन्न पैलू जबाबदार असतात. व्यक्ती एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य होतो तेव्हा तो कोणत्या पक्षाचा कार्यकर्ता झाला हे तपासायचे असेल तर त्याचे शिक्षण, सामाजिक दर्जा, आर्थिक स्थिती या सर्व गोष्टींचे परीक्षण करावे लागते. तरच त्याच्या राजकीय वर्तनाचा योग्य अन्वयार्थ काढला जातो. वर्तनवाद व्यक्ती वर्तनाच्या अध्ययनासाठी आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा आग्रह धरतो. मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र या शास्त्रांचा अभ्यास करूनच केले गेलेले राजकीय विश्लेषण वास्तविक व योग्य असते.

**(५) मूल्यविहीनता**

वर्तनवाद राजकीय विश्लेषणात मूल्यांना निरर्थक मानतो. राजकीय विश्लेषणात मूल्य व नैतिकतेच्या प्रश्नांना स्थान असता कामा नये. वस्तुनिष्ठ स्वरूपातच अभ्यासकाने राजकारणाचा विचार केला पाहिजे. राज्यशास्त्राला अशास्त्रीय बनविणारी मूल्ये ही राजकीय विश्लेषणातून हद्दपार झाली पाहिजे, असे म्हणणारा वर्तनवाद मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरतो.

### (६) नव्या पद्धतींना महत्त्व

वर्तनवादाने अभ्यासाच्या व विश्लेषणाच्या नव्या पद्धतींना महत्त्व दिले; किंबहुना त्या पद्धतीची निर्मिती केली. निरीक्षण, परीक्षण, तक्ते, आलेख, गणितीय प्रारूपे, संख्यात्मक मापन पद्धती याचा वापर करायला चालना दिली. तसेच फक्त ग्रंथाधारित संशोधनाऐवजी क्षेत्रिय अध्ययनावर भर देण्याचा पुरस्कार वर्तनवाद करतो. विश्लेषणासाठी सूक्ष्मातिसूक्ष्म संकल्पनात्मक निरूपण केले पाहिजे. इंद्रियानुभव अध्ययन पद्धतीला महत्त्व देण्यासाठी हा दृष्टिकोन मोलाचा ठरतो.

### (७) प्रतिक्रियावादी दृष्टिकोन

पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या विरोधातील प्रतिक्रिया म्हणून वर्तनवादी दृष्टिकोनाचा उदय झाला. प्रतिक्रियात्मक स्वरूपातच वर्तनवादाचा विकास झालेला आहे. राजकारणातील सर्व घडामोडींचा मानवी व समूह वर्तनाशी असलेला अनुबंध जोडण्यासाठी पारंपरिक राज्यशास्त्रातील मूल्य मांडणीला छेद देत असताना दैनंदिन व्यवहारातील प्रश्नांचा वेध घेण्याला महत्त्व देणारा हा अभ्यास दृष्टिकोन राजकीय विश्लेषणासाठी आमूलाग्र बदल घडविणारा ठरला.

राजकीय क्रिया-प्रक्रियांना मानवी वर्तनाशी जोडून त्यांचा निश्चित बोध करून घेण्याला प्राधान्य देणाऱ्या वर्तनवादी दृष्टिकोनाने राजकीय विश्लेषणात आणि पर्यायाने राज्यशास्त्रात क्रांतीकारक बदल घडवून आणले. वर्तनवादी विश्लेषण हे केवळ बाह्य कार्याशी निगडीत नसून ते भावनात्मक, ज्ञानात्मक व मूल्यांकनात्मक प्रक्रियांशीही संबंधित आहे. त्यामुळे राजकीय विश्लेषणाला नाविन्यतेची झालर प्राप्त झाली.

### डेव्हिड ईस्टन प्रणित वर्तनवादाची तत्त्वे किंवा वैशिष्ट्ये

डेव्हिड ईस्टन याने 'वर्तनवादाचा वर्तमान अर्थ' (The Current Meaning of Behaviouralism) या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्यात ईस्टन वर्तनवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करतो.

**(१) वर्तनातील नियमितता**

राजकीय वर्तनाचा शोध घेतल्यास निश्चित स्वरूपात एक नियमितपणा व समानता सापडते. या नियमिततेचे नीट आकलन करून घेतल्यास त्याचा व्याख्या व पूर्वकथनासाठी तसेच सिद्धांतासाठी वापर होतो. हवामानशास्त्रात ज्या पद्धतीने निष्कर्ष काढले जातात त्याच पद्धतीने मानवी वर्तनाचा अभ्यास करूनही निष्कर्ष काढता येतात. इंदिरा गांधींनी दिलेल्या 'गरिबी हटाव' सारखा एक नारा मतदारांचे वर्तन बदलण्यासाठी कारणीभूत ठरला. पुढे याचीच प्रचिती 'अच्छे दिन' याद्वारे आली. वर्तनातील नियमितता शोधून त्यावर राजकीय विश्लेषण केल्यास ते अधिक यथार्थ होते. कामगार हे साम्यवादी पक्षांकडेच आकर्षित होतात हे गृहितक जगातील सर्व कामगारांच्या वर्तनातील नियमितता तपासल्यास आपोआपच सत्य ठरते. म्हणून व्यक्तीच्या राजकीय वर्तनातील नियमितता सूक्ष्म स्वरूपात अभ्यासण्याला वर्तनवादात प्राधान्य दिले जाते.

**(२) सत्यापन**

राजकीय वर्तनातील नियमिततेचा शोध सामान्य वर्तनाच्या संदर्भाने झाला पाहिजे. नियमिततेच्या आधारे काढलेले सामान्य निष्कर्ष हे परीक्षण करता आले पाहिजेत म्हणजेच त्याचा पडताळा घेता आला पाहिजे. पडताळा घेऊन जे निष्कर्ष सत्याच्या कसोटीवर उतरतात तेच योग्य मानता येतात. नैसर्गिक शास्त्रांमध्ये पडताळा किंवा सत्यापन करण्यासाठी निश्चित प्रयोगशाळा उपलब्ध असते. मात्र सामाजिक शास्त्रांमध्ये पडताळा घेणे इतके सोपे नसते. मात्र तरीही वर्तनवाद सत्यापन म्हणजेच पडताळा घेण्याचे सांगते. याचा अर्थ असा की, एखाद्या विश्लेषकाने किंवा संशोधकाने राजकीय वर्तनाची नियमितता पाहून काढलेले निष्कर्ष दुसऱ्याला पडताळा घेऊन सिद्ध-असिद्ध करता आले पाहिजेत. सर्वेक्षणातून असा पडताळा शक्य आहे.

**(३) अध्ययनाची तंत्रे**

राज्यशास्त्रात अगोदर समग्राच्या अनुषंगाने अभ्यास करून निष्कर्ष

काढले जात होते. त्यासाठी ऐतिहासिक, तुलनात्मक अशा पद्धतीचा वापर केला जात असे. मात्र वर्तनवाद अनुभविक तंत्र व पद्धतीचा वापर करून समग्रातील सूक्ष्माचा अभ्यास करण्याचा पुरस्कार करतो. थोडक्यात पद्धतीशास्त्राचा वापर करून संशोधन व विश्लेषण केले पाहिजे, असे मत ईस्टनचे आहे. तथ्य संकलन व आशय विश्लेषण करण्यासाठी तंत्राचा व संशोधन प्रणालीचा वापर योग्यपणे केला पाहिजे. समस्यासूत्रण, नमुना निवड, सर्वेक्षण, प्रश्नावली, अनुसूची, मुलाखती याद्वारे तथ्यांचे संकलन करून त्यातून तथ्यांचे निर्वचन करून वर्गीकरण, सामान्यीकरण व अंतिमतः सिद्धांतीकरण करून आशय विश्लेषण केल्यास विश्लेषणात वस्तुनिष्ठता येते. म्हणून राजकीय विश्लेषणासाठी अभ्यासकांनी वर्तनवादातील या अध्ययन तंत्राचा वापर केला पाहिजे.

**(४) परिमापन**

वर्तनवादी अभ्यासासाठी उपलब्ध साधनसामग्रीस तथा तथ्यांना सूत्रबद्ध करणे आवश्यक असते; त्यालाच परिमापन असे म्हणतात. संख्याशास्त्रीय स्वरूपात मूल्यांचे किंवा माहितीचे मोजमाप करणे यात अपेक्षित आहे. उदाहरणाच्या स्वरूपात विचार करायचा तर लोकशाहीसंबंधी किंवा राज्यघटनेसंबंधी किती लोकांना ज्ञान आहे याचे प्रत्यक्ष मोजमाप करता आले पाहिजे. तथ्यांना (Fact) प्रामाणिक बनविण्यासाठी आणि त्यांची परस्परतुलना गणितीय पद्धतीनेच त्याचे मापन केले पाहिजे.

**(५) मूल्य मुक्तता**

संशोधन व विश्लेषण हे तटस्थ व वस्तुनिष्ठ असले पाहिजे. मूल्यात्मकता ही व्यक्तीनिष्ठतेचे व आत्मनिष्ठतेचे प्रतीक असतात. प्रत्यक्ष व अनुभवनिष्ठ तथ्यांचा विचार करूनच विश्लेषण केले पाहिजे; त्यात स्व मताग्रह व मूल्यनिष्ठतेला कसलेच स्थान असता कामा नये. मूल्यसापेक्षता ही संशोधन व विश्लेषणाला प्रभावहीन व कलुषित बनविते, असे वर्तनवादाच्या भाष्यकारांचे मत आहे. मूल्यमुक्त विश्लेषणातूनच शास्त्रीय निष्कर्षाची प्राप्ती होवू शकते.

**(६) व्यवस्थितपणा**

अध्ययनात निरीक्षण-तथ्य संकलन-सिद्धांत निर्मिती-पडताळा-भविष्यकथन असा क्रमबद्धपणा असला पाहिजे. कार्यकारणसंबंधाची प्रस्थापना करण्यासाठी व्यवस्थितपणा आवश्यक ठरतो. संशोधनाच्या प्रारंभी मांडण्यात आलेल्या गृहितकृत्यांचा पडताळा घ्यायचा असेल तर तो पद्धतशीरपणेच घ्यावा लागतो. गणिती पद्धतीत जसे टप्पे असतात तसेच ते राज्यशास्त्रीय अध्ययनातही असायला पाहिजेत, किंबहुना ते असतात, असे वर्तनवाद्यांचे म्हणणे आहे. प्रमेयांच्या स्वरूपातील व्यवस्थितपणा राजकीय सिद्धांतामध्ये असायला पाहिजे.

**(७) विशुद्धशास्त्र**

ज्ञानाचा बोध व वापर हे एकमेकाच्या खूप जवळ असतात. ज्ञानाचा उपयोग हा शास्त्रशुद्ध ज्ञानामुळेच होऊ शकतो. म्हणून विशुद्धशास्त्रात त्रिकालाबाधीत जे सिद्धांत मांडले जातात ते मूलभूत असतात. वर्तनवादी विशुद्धशास्त्र दृष्टिकोनातूनच संशोधनाची मांडणी करतात. राजकीय विश्लेषण हे सामाजिक-राजकीय समस्या संपुष्टात आणण्यासाठी उपयोगात आणायचे तर ते शास्त्रशुद्ध स्वरूपातच असले पाहिजे यावर वर्तनवादी दृष्टिकोनाने भर दिला आहे.

**(८) एकीकरण**

राज्यशास्त्रासहित सर्व सामाजिक शास्त्रे समस्त मानव परिस्थितीशी संबंधित आहेत. त्यामुळे राज्यशास्त्रास अन्य सर्व विषयांशी संबंध ठेवला पाहिजे. समरुपता व एकीकरणाद्वारे जी आंतरविद्याशास्त्रीय देवाण-घेवाण होते त्यातून राजकीय संशोधन व विश्लेषण ठोस व परिपूर्ण होण्यास मदत होते. मानवाच्या केवळ राजकीय वर्तनाचा अभ्यास करून सखोल संदर्भ प्राप्त होऊ शकत नाहीत. इतर वर्तनाशी जसे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, पर्यावरणीय अशा सर्व घटनांशी संबंध जोडूनच राजकीय वर्तनाचा उचित अन्वयार्थ काढता येतो. म्हणून आंतरविद्याशास्त्रीय एकीकरण करणे वर्तनवादी दृष्टिकोनास अपेक्षित आहे.

**वर्तनवादाचे दोष / मर्यादा / टीका**

राज्यशास्त्राला परिपूर्ण शास्त्र बनविण्यासाठी अभ्यासपद्धती व तंत्राची नव्याने मांडणी करणारा वर्तनवादी दृष्टिकोन खूप काळ आपला प्रभाव टिकवू शकला नाही. अभ्यासविषयाला अधिक शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करणाऱ्या वर्तनवाद्यांनी गुंतागुंत, संख्यात्मक माहितीचे ढिगारेच निर्माण केले. त्यामुळे ते टीकेस पात्र ठरले. वर्तनवादी दृष्टिकोनावर अल्पावधीतच ज्या टीका झाल्या किंवा त्याचे दोष पुढे आले, त्यातून त्याच्या मर्यादांचीच यादी तयार होते. त्यावर पुढीलप्रमाणे प्रकाश टाकता येतो.

**(१) शास्त्रीयीकरणाचा भ्रम**

नैसर्गिक शास्त्राप्रमाणे राज्यशास्त्राला विशुद्धशास्त्र हा दर्जा मिळवून देण्याची खटाटोप वर्तनवादी दृष्टिकोनाने केली. परंतु नैसर्गिक शास्त्रातील अभ्यास वस्तु प्रमाणे (उदा. वनस्पती, बेडूक, उंदीर, द्रव्ये) मानवी वर्तनाचा स्थिर व तटस्थपणे अभ्यास शक्यच नसतो. नियंत्रित अवस्थेत प्रयोग व प्रयोगोत्तर निष्कर्ष काढण्याचे निकष मानवी वर्तनासाठी लागू होवू शकत नाहीत. संशोधकाला मानवी वर्तनावर निश्चित नियंत्रण ठेवता येत नसल्यामुळे केले जाणारे निरीक्षण व त्यातून मांडलेले निष्कर्ष सदोष असण्याचीच शक्यता जास्त असते. म्हणून वर्तनवादी दृष्टिकोनाने राजकीय विश्लेषणाला वस्तुनिष्ठ करण्यासाठी व राज्यशास्त्राला विशुद्धशास्त्र करण्यासाठी केलेली धडपड ही उद्देशहीनच मानावी लागते. तसेच राज्यशास्त्रासाठी शास्त्रीयीकरणाचे त्यांनी केलेले प्रयत्न हे केवळ भ्रमच ठरतात. वास्तवात राज्यशास्त्राला वर्तनवादी दृष्टिकोन शास्त्रशुद्धता देण्यास असमर्थच ठरला, हे सत्य आहे.

**(२) विरोधाभास**

वर्तनवादी दृष्टिकोनाच्या कथनात अनेक विरोधाभास आहेत. एकीकडे ते आपल्या निष्कर्ष, मान्यतांना सापेक्ष मानतात तर दुसरीकडे इतर अध्ययन पद्धतीला महत्त्व द्यायला तयार नाहीत. स्वतःला मूल्यनिरपेक्ष मानणाऱ्या वर्तनवाद्यांनी

आपलीच नवी मूल्यव्यवस्था निर्माण केली. वर्तनवादी दृष्टिकोनाने स्थायित्त्वाला आपले सर्वोच्च सामाजिक ध्येय बनविल्यामुळे ते पुराणमतवादी बनले. एकीकडे मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरणाऱ्या वर्तनवाद्यांनी दुसरीकडे उदारमतवादी मूल्यांना मान्यता दिली हा दुटप्पीपणा आहे असे टीकाकार म्हणतात.

**(३) मूल्यनिरपेक्षता अशक्य**

राज्यशास्त्र व राजकीय विश्लेषणाला मूल्यमुक्त करणे हे अशक्यप्रायच आहे. राजकारणात मूल्यांना स्थान असतेच. भारतासारख्या देशात तर मूल्यांचा आग्रह राजकारणात धरला जातो. अशावेळी मानवाचे वर्तन हे मूल्ययुक्तच असणार, यात वाद नाही. तसेच जगामध्ये विचारसरणीवर संघर्ष व शीतयुद्ध झाले. विचारसरणी या विशिष्ट मूल्यांचाच आग्रह धरत असतात. या पार्श्वभूमीवर मूल्यनिरपेक्ष संशोधन ही अशक्य बाब आहे. कोणताही व्यक्ती आपले आयुष्य निश्चित मूल्यांच्या आधारेच जगत असतो. त्यामुळे त्याचे वर्तनही त्या मूल्यांचाच परिणाम असतो. संशोधक व विश्लेषकही याला अपवाद नसतो. 'राष्ट्रीयत्व' हे मूल्य मानले तर त्या - त्या राष्ट्राचा अभ्यासक राजकीय विश्लेषण करताना आपल्या राष्ट्राचा प्रथम विचार करणारच. केवळ वस्तुस्थितीचाच विचार करणे ही कल्पनारम्यता मानावी लागेल, असे टीकाकारांचे मत आहे.

**(४) संशोधकाची तटस्थता हे स्वप्नरंजन**

वर्तनवादी दृष्टिकोनाद्वारे संशोधन व राजकीय विश्लेषण वस्तुनिष्ठ, तटस्थ झाले पाहिजे असे सांगितले जाते. अंतिमतः संशोधन करणारा संशोधक हाही एक माणूस आहे. त्याचे काही मते, दृष्टिकोन, मूल्ये निर्धारित झालेली आहेत. जात, धर्म, कौटुंबिक स्थिती, सामाजिक पर्यावरण, वैयक्तिक अनुभव यामुळे व्यक्तीचे काही समज-गैरसमज, पूर्वग्रह पक्के झालेले असतात. ते संशोधन करताना नाही म्हटले तरी संशोधन व विश्लेषणात समाविष्ट होतातच, त्यामुळे संशोधकाने निस्पृह व तटस्थपणे संशोधन व विश्लेषण केले पाहिजे, ही अपेक्षा फोल ठरते.

### (५) व्यावहारिक समस्या

क्षेत्रिय अभ्यासास महत्त्व देणाऱ्या वर्तनवादाने व्यावहारिक अडचणींचा कसलाच विचार केला नाही. माहिती किंवा तथ्य संकलित करत असताना कधी-कधी इतकी माहिती गोळा केली जाते की, त्याचे वर्गीकरण करणे अशक्य होते. अमेरिकेत तर वर्तनवादी क्रांतीची लाट आल्यास माहितीचा खच पडला, जो निरर्थक होता. मिळणारी सर्व माहिती निष्कर्ष काढण्यासाठी योग्यच असू शकते, याचीही खात्री असत नाही. मांडलेल्या गृहितकृत्यांना सिद्ध करण्यासाठी आवश्यक तथ्य हाताला लागतीलच याचीही शाश्वती नसते. या सर्व व्यावहारिक समस्यांचा विचार वर्तनवादाच्या पुरस्कर्त्यांनी केला नाही, हा एक दोष आहे.

### (६) अपव्ययी पद्धती

वर्तनवादी अभ्यासाच्या दृष्टिकोनावर हल्ला करताना टीकाकार याला खर्चिक व वेळखाऊ प्रक्रिया मानतात. सर्व्हे करण्यासाठी कोट्यावधी पैसे खर्च केले गेले; परंतु त्यातून निश्चित सिद्धांताची निर्मितीही होवू शकली नाही. तसेच मानवी शक्तीचाही अतिरेकी वापर संख्यात्मक माहिती अर्जित करण्यासाठी झाला. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे वेळ, पैसा व श्रमांची अतोनात हानी झाली.

### (७) मूलभूत प्रश्न दुर्लक्षित

वर्तनवादाने अभ्यास पद्धती व तंत्रावरच खूप भर दिला. संशोधनासाठी जे विषय निवडले ते पूर्णतः दुय्यम असेच होते. मूलभूत सामाजिक-राजकीय प्रश्नावर अभ्यास करण्याकडे वर्तनवाद्यांचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे नीती निर्धारण, राष्ट्रविकास व मानवी विकास याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. या सर्वांचा परिपाक म्हणजे मूलभूत प्रश्न व समस्यांची भयावहता वाढली.

### (८) परंपरावाद्यांचे आक्षेप

पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या विरूद्ध वर्तनवादाने प्रतिक्रिया नोंदविली होती. मात्र वर्तनवादाने दोषयुक्त कार्य केल्याने त्यावर परंपरावाद्यांनी टोकाची

टीका केली. मानवाच्या वर्तनात नियमितता असूच शकत नाही, असे परंपरावाद्यांचे मत आहे. कोऱ्या मुलाखती व प्रश्नावलीतून राजकारणाचे खरे ज्ञान प्राप्त होवू शकत नाही. तथ्य व आकड्यांचा संग्रह करून राजकारणाचे अंतरंग जाणणे शक्य होत नसते. वर्तनवादाने जे परिमाणन सांगितले ते फसवे आहे. ते म्हणजे अमापनीय असलेल्या गोष्टीचे मापन करण्याचा प्रयत्न आहे. देशभक्ती, इमानदारी याचे मापन होवू शकते का? असा प्रश्न परंपरावादी उपस्थित करतात. मूल्यनिरपेक्षता ही शक्यच नाही. तसेच वर्तनवादाच्या व्याख्यात्मकता व पूर्वकथनावर परंपरावादी शंका उपस्थित करतात.

वर्तनवादी दृष्टिकोनाच्या अनेक मर्यादा मांडल्या गेल्या. क्रिश्चयन बे या विचारवंताच्या मते, "शास्त्रीय स्थापनेच्या धुंदीचा परिणाम राजकारणापासून बचाव करण्याच्या स्वरूपात पुढे आला."

**राजकीय विश्लेषणास वर्तनवादी दृष्टिकोनाचे योगदान**

राज्यशास्त्राला अधिक शास्त्रीय बनविण्यात वर्तनवादी दृष्टिकोनाचे मोलाचे योगदान आहे. आधुनिक राजकीय विश्लेषणाची निर्मितीच वर्तनवादाचा परिणाम आहे. अभ्यासाच्या नव्या पद्धती व तंत्रे विकसित करून तथ्यसंकलन, क्रमबद्ध ज्ञानार्जन, प्रश्नावली, आलेख, सांख्यिकीय माहितीचा यथोचित विश्लेषणासाठी वापर यामुळे राजकीय विश्लेषणाचे आधुनिक रूप निर्माण होवू शकले. सूक्ष्म अध्ययनाची व विश्लेषणाची सुरूवात देखील वर्तनवादी दृष्टिकोनामुळेच होवू शकली. राजकीय विश्लेषणाच्या कक्षा विस्तारण्यात व विश्लेषणाला मूल्य व आदर्शाच्या साचातून मुक्त करण्यात वर्तनवादाचा वाटा मोठा आहे. राजकीय प्रक्रिया, राजकीय प्रश्न व व्यवस्थेतील मानवी वर्तनाचा वाटा यावर वेगळ्या पद्धतीने विश्लेषण करण्यास वर्तनवादाने चालना दिली. शास्त्रीय पद्धतीने राजकीय विश्लेषण करणे शक्य असल्याचा प्रत्यय वर्तनवादी दृष्टिकोनानेच प्रथम दिला. राजकीय विश्लेषणास अनुभवाच्या पातळीवर आणण्याचे श्रेयही वर्तनवादी दृष्टिकोनासच द्यावे लागेल.

## व्यवस्था दृष्टिकोन

आधुनिक दृष्टिकोनांमध्ये व्यवस्था दृष्टिकोन हा प्रमुख मानला जातो. व्यवस्था विश्लेषण किंवा प्रणाली विश्लेषण म्हणून याचे महत्त्व अधोरेखित केले जाते. 'व्यवस्था' (System) ही मूळात जीवशास्त्रीय संकल्पना आहे. या संकल्पनेला लुडविग वॉन बर्टलैन्फी नामक जीवशास्त्रज्ञाने प्रथम १९२० च्या दशकात प्रकाशित त्याच्या ग्रंथात प्रयोगात आणले. तेव्हापासून ही संकल्पना अन्य शास्त्रात वापरली जावू लागली. सामाजिक शास्त्रात ही संकल्पना दुसऱ्या विश्वयुद्धानंतर वापरण्यास सुरूवात झाली. १९५३ मध्ये डेव्हिड ईस्टन यांनी 'Political System - An enquiry into the state of political science' या ग्रंथातून सर्वप्रथम राज्यशास्त्रात या संकल्पनेची मांडणी केली. १९५६ मध्ये अमेरिकेमध्ये सामान्य व्यवस्थामूलक संशोधनाच्या प्रगतीसाठी एक संस्था स्थापन करण्यात आली. पुढील काळात गॅब्रियल आल्मंड, कार्ल ड्वाईश, ॲप्टर या विचारवंतांनी व्यवस्था सिद्धांताला पुढे चालविले.

### व्यवस्था : एक अन्वयार्थ

व्यवस्था ही अनेक घटकांचा एक संच असते. या संचातील प्रत्येक घटक परस्पराशी संबंधित असतात. तसेच या घटकांतर्गत एक आंतरक्रिया सुरू असते. यासंबंधी व्यवस्था थोडक्यात सेंद्रीय स्वरूपातच क्रियान्वित असते. सेंद्रीय म्हणजे आपले शरीर एक व्यवस्था आहे, त्यातील प्रत्येक अवयव एकमेकांशी निगडीत आहे. एका अवयवातील बिघाड हा सर्व शारीरिक व्यवस्थेला त्रस्त करू शकतो. व्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे कार्य निश्चित असून त्यांच्यात संसूचनाची क्रिया-प्रक्रिया अस्तित्त्वात असते. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार, "व्यवस्था एक मिश्रित संकलन आहे. संबंधित घटकांचा व अंशाचा तो समूह आहे, जो भौतिक व अभौतिक आहे."

### व्यवस्था सिद्धांत आणि व्यवस्था विश्लेषण यात अंतर

व्यवस्था सिद्धांत आणि व्यवस्था विश्लेषण यातील अंतर समजून घेणे

गरजेचे आहे. या दोन्हींमध्ये खूप सूक्ष्म आणि निश्चित अंतर आहे. व्यवस्था सिद्धांत हा राजकीय व्यवस्था, आदान-प्रदान, पर्यावरण आदींनी तयार झाला आहे. जेव्हा व्यवस्था सिद्धांत विशेष परिस्थितीच्या अध्ययनासाठी वापरला जातो तेव्हा तो व्यवस्था विश्लेषणाचे रूप धारण करतो. याप्रकारे व्यवस्था विश्लेषण एखाद्या विशेष स्थितीमध्ये व्यवस्था सिद्धांताचे क्रियात्मक रूप आहे. डेव्हिड ईस्टन सिद्धांत म्हणून व्यवस्था सिद्धांताचा उल्लेख करत नाही पण तरीही तो सिद्धांतच मांडतो.

**व्यवस्था दृष्टिकोन किंवा राजकीय व्यवस्थेच्या उत्पत्तीची कारणमीमांसा**

डेव्हिड ईस्टनने राजकीय व्यवस्थेच्या अनुषंगाने एका नव्या संकल्पनेला जन्म दिला. राजकीय व्यवस्थेच्या उत्पत्तीची आवश्यकता किंवा त्याच्या उदयाची कारणमीमांसा करणे क्रमप्राप्त ठरते.

**(१) परंपरागत विचारांची अनावश्यकता**

दुसऱ्या महायुद्धानंतर राज्य-राष्ट्र, सरकार, संविधान या परंपरागत घटकांद्वारे राजकीय गुंतागुंतीचे अध्ययन करणे अशक्य झाले. मर्यादित व सिमीत स्वरूपातच परंपरागत विचारांचा उपयोग होत होता. त्यामुळे त्या जागी नवीन व्यापक विचार करण्याची आवश्यकता होती. यातून राजकीय व्यवस्था सिद्धांत उदय पावला.

**(२) व्यापक प्रारुपाची गरज**

केवळ राज्य व सरकार यांचा औपचारिक अभ्यास करणे नव्या युगात अप्रस्तुत होते. आज अनौपचारिक संस्थांचाही अभ्यास नव्या परिप्रेक्ष्यात करणे गरजेचे होते. कुटुंब, जाती, वर्ग, धर्म, दबावगट, राजकीय पक्ष यांचा राजकारणावर काय परिणाम होतो याचा विचार करण्यासाठी व्यापक प्रारूपाची गरज होती ज्यामुळे राजकीय व्यवस्थेचा उदय झाला.

**(३) मुक्त दृष्टिकोन**

समकालीन राजकारणात साम्यवाद, भांडवलवाद, समाजवाद, हुकुमशाही,

राजेशाही, लोकशाही यांचा प्रभाव कमी-अधिक दिसतो. राजकीय विश्लेषण करताना विचारधारांच्या प्रभावाखालीच विश्लेषण केले जावू नये तर मुक्त दृष्टिकोन ठेवून समग्र राजकीय व्यवस्थेचे मूल्यांकन केले गेले पाहिजे. यासाठी व्यवस्था सिद्धांताचा उदय झाला.

**(४) वास्तववादी दृष्टिकोन**

परंपरागत राजकीय विश्लेषण हे कल्पना व आदर्शावर अवलंबून होते. आजच्या राजकारणाचे यथार्थ विश्लेषण करायचे असेल तर वास्तववादी दृष्टिकोनानेच ते शक्य आहे, जे तथ्यांचा योग्य अर्थ लावू शकेल. व्यवस्था दृष्टिकोन वास्तविकतेची दृष्टीच स्वीकारतो.

**(५) शास्त्रीय अध्ययन**

शास्त्रीय अभ्यासासाठीच राजकीय व्यवस्था दृष्टिकोनाचा उदय झाला आहे. क्रमबद्ध अभ्यास करण्यासाठी या नवीन दृष्टिकोनाची उत्पत्ती झाली.

**राजकीय व्यवस्था : एक संकल्पना**

'राजकीय' व 'व्यवस्था' अशा दोन शब्दाने राजकीय व्यवस्था शब्द तयार झाला आहे. राजकीय हा शब्द सत्ता, अधिसत्ता, सार्वभौम, राजकीय समूह याचा सूचक आहे तर व्यवस्था घटकांच्या आंतरक्रियेचा परिणाम. व्यवस्थेत एकता, नियमितता, संपूर्णता, संघटन, संयुक्तता या गोष्टी अंतर्भूत असतात. याआधारे विचार केल्यास राजकीय व्यवस्था म्हणजे त्या परस्पर संबंधित घटकांचा समूह आहे ज्याचे संचालन सत्ता व अधिसत्ता करते.

**राजकीय व्यवस्थेच्या व्याख्या**

**डेव्हिड ईस्टन च्या मते,**

"राजकीय व्यवस्था अशा आंतरक्रियांचा समूह आहे, ज्याला सामाजिक व्यवहाराच्या समग्रातून निवडले गेले आहे. तसेच ज्याद्वारे समाजासाठी सत्तात्मक व अधिकारिक मूल्यांची निर्मिती केली जाते."

**आल्मंड च्या मते,**

"राजकीय व्यवस्था म्हणजे दंडशक्तीचा अधिमान्य वापर करून आणि त्याची भीती दाखवून समाजात ऐक्य निर्माण करणाऱ्या आंतरक्रियांचा संच होय."

**रॉबर्ट डहाल च्या मते,**

"राजकीय व्यवस्था ही मानवी संबंधाची अशी स्थायी व अर्थपूर्ण व्यवस्था की, ज्या अंतर्गत सत्ता, शासन आणि अधिसत्ता अंतर्भूत असतात."

**बीयर आणि उल्म च्या मते,**

"राजकीय व्यवस्था एक संरचना आहे जी समाजासाठी एक निश्चित कार्य करते. हे कार्य धोरण निश्चितीची निर्मिती होय."

उपरोक्त व्याख्यांचा विचार केल्यास हे स्पष्ट होते की, राजकीय व्यवस्था ही संरचना आहे की, ज्यातील प्रत्येक भागामध्ये सूसूत्रता असते. राजकीय व्यवस्था स्वतःमध्येच एक परिपूर्ण सत्ता आहे जी विशिष्ट स्थितीमध्येच सक्रीय होते. आंतरक्रियाच्या माध्यमातून ती सामाजिक संचालन करते.

## राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये / लक्षणे

### (१) सार्वत्रिक स्वरूप

राजकीय व्यवस्था प्राचीन किंवा अर्वाचीन, अविकसित किंवा विकसित अशा सर्व प्रकारच्या समाजामध्ये पहायला मिळते. सर्व समाजांमध्ये अंतर्गत व बाह्य व्यवस्था कायम ठेवण्यासाठी राजकीय व्यवस्थेचाच वापर केला जातो. भिन्न-भिन्न समाजात भिन्न राजकीय व्यवस्था दिसतात, ज्यांचे अध्ययन तुलनात्मक राजकारणात केले जाते. सर्व राजकीय व्यवस्थांची एक राजकीय संरचना असतेच. विभिन्न साधनांद्वारे अनेकविध कार्य करणे हे राजकीय व्यवस्थेची विशिष्टता असते. राजकीय व्यवस्थांचे हे सार्वत्रिक दर्शन सर्वच ठिकाणी दिसून येते.

**(२) राजकीय संरचनेची सार्वत्रिकता**

सर्व राजकीय व्यवस्थांमध्ये काही अशा संरचना असतात ज्या सार्वत्रिक आणि व्यापक असतात. समाजात संसूचन, संघटन इत्यादी कार्य नातेसंबंध किंवा वंशत्व याद्वारेच केले जाते. राजकीय व्यवस्थेचे विश्लेषण करण्याने या कार्यांना प्राप्त केले जाते. उदाहरण सांगायचे तर राजकीय निवडणुका या राजकीय संरचनेचाच एक भाग आहे ज्या प्रत्येक राजकीय व्यवस्थेत घेतल्याच जातात. नेतृत्वाची निवड ही वेगवेगळ्या प्रकारे होत असली तरी नेतृत्व हे संरचनेच्या स्वरूपात सार्वत्रिकच ठरते.

**(३) राजकीय कार्यांची संमिश्रता**

राजकीय संरचनेचे कार्य सर्व ठिकाणी एकसारखेच असते. कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळाच्या कार्याचे अध्ययन करण्यासाठी त्यांच्या कार्यातील संदेशवहन, प्रतिनिधित्व, वैधता, समर्थन आणि व्याख्या यांचेही अध्ययन केले गेले पाहिजे. राजकीय संस्थांचा अभ्यास केवळ सरकारच्या विभिन्न अंगांचा अभ्यास नाही तर शासनाच्या बाहेर असणारे राजकीय पक्ष, दबावगट यांचेही अध्ययन झाले पाहिजे. लोक राजकीय कार्यात कसा सहभाग घेतात आणि त्यासाठी राजकीय व्यवस्थांचा दृष्टिकोन काय आहे याप्रकारचे कार्यात्मक विश्लेषण झाले पाहिजे. लॉसवेलने कार्यात्मक विश्लेषणासाठी सात कसोट्या सांगितल्या आहेत. त्यात - बुद्धि, स्वीकृती, निदान, आविष्कार, वर्तन, मूल्यांकन व अलिप्तता या कसोट्यांवर सरकारी व गैरसरकारी संस्थांच्या कार्यांचे अध्ययन केले गेले पाहिजे. कायदे तयार करणे, त्यांचे मूल्यमापन करणे ही राजकीय संरचनेतील विविध मंडळांची कार्ये एकमेकांशी निगडीत आहेत. एका मंडळाचे कार्य दुसऱ्या मंडळाच्या कार्यात संम्मिलित झालेले असते. त्यामुळे राजकीय व्यवस्थेतील या सर्व घटकांच्या कार्यात सदैव एक आंतरक्रिया सुरू असतेच.

**(४) बहुकार्यात्मकता**

आल्मंड यांच्या मते, राजकीय संरचना बहुकार्यात्मक असतात.

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, नोकरशाही, राजकीय पक्ष, हितसमूह या सर्वांची कार्ये वरपांगी जरी भिन्न वाटत असली तरी समग्र राजकीय संरचनेचा विचार केल्यास त्यामध्ये एकमेकाशी असलेले अवलंबन दिसते. हीच राजकीय संरचनेची बहुकार्यात्मकता आहे. प्रत्येकाचे कार्य वेगळे असले तरी त्यात असणारे संदेशवहन हे बहुकार्यात्मकतेचेच लक्षण आहे.

**(५) राजकीय व्यवस्थेचे सांस्कृतिक मिश्रण**

सांस्कृतिक संदर्भाने सर्व राजकीय व्यवस्था मिश्रित असतात. ज्या राजकीय व्यवस्थेच्या प्रकाराला प्राचीन मानले जाते ते आधुनिक राजकीय व्यवस्थेतही अस्तित्वात असलेल्या दिसतात. भौगोलिक, सांस्कृतिक किंवा स्थलकालपरत्वे राजकीय व्यवस्थांना विविध वर्गांमध्ये वर्गीकृत करणे शक्य नसते. कोणतीही एक राजकीय व्यवस्था एका वर्गात साचेबंद करता येत नाही. राजकीय व्यवस्थांमध्ये सांस्कृतिक मिश्रण झालेले दिसून येते.

गॅब्रिएल आल्मंडने प्रतिपादित केलेल्या राजकीय व्यवस्थेचा वरील प्रमाणे आढावा घेता येतो.

**डेव्हिड ईस्टन प्रणित राजकीय व्यवस्था दृष्टिकोन**

यंग हा विचारवंत म्हणतो की, "व्यवस्थात्मक दृष्टिकोन हा आदान-प्रदान दृष्टिकोन आहे. याचे वैशिष्ट्य हे आहे की, हा एक राज्यशास्त्राच्या मौल्यवान दृष्टीचा परिणाम आहे जो इतर शास्त्रात अजून आयात केला गेला नाही."

राजकीय व्यवस्था आंतरक्रियांचा असा समूह आहे ज्यात मागणीला प्रदान व्यवस्थेत बदलले जाते. या प्रकारे डेव्हिड ईस्टनने व्यवस्था दृष्टिकोनाला आदान-प्रदान प्रारूपात राज्यशास्त्रात मांडले आहे. विभिन्न पैलूचे राजकीय विश्लेषण करण्यासाठी ईस्टन या दृष्टिकोनाचा उपयोग करतो.

**ईस्टनने सांगितलेली व्यवस्था दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये**

(१) राजकीय व्यवस्था सामाजिक व्यवस्थाचेच एक अंग आहे. याद्वारे समाजासाठी

मूल्यांचे निर्धारण केले जाते.

(२) राजकीय व्यवस्था प्रतिसाद आणि स्वयंचलित पद्धती निहीत असते ज्यामुळे ती आपल्या संरचनेत व प्रक्रियेत परिवर्तन करण्यासाठी समर्थ असते.

(३) राजकीय व्यवस्था अंतर्गत व बाह्य दोन्ही पर्यावरणाने अच्छादित असते.

(४) राजकीय व्यवस्थेत आदान आणि प्रदान यात योग्य समतोल राहिल्यासच राजकीय व्यवस्था स्थिर अवस्थेत राहते.

(५) राजकीय व्यवस्था खुली व्यवस्था असते ज्यामुळे पर्यावरणाच्या कारणांचा प्रभाव पडतोच.

(६) राजकीय व्यवस्था ही गतीशील असते.

**व्यवस्था दृष्टिकोनाचे प्रमुख आधार**

डेव्हिड ईस्टनने १९५३ मध्ये The Political System या ग्रंथात व्यवस्था दृष्टिकोनाची संकल्पना विशद केली. मात्र ईस्टनने १९६५ मध्ये आपल्या दोन पुस्तकात A Framework for Political Analysis आणि A Systems Analysis of Political Life मध्ये व्यवस्था दृष्टिकोनाचा विस्ताराने विचार मांडला आहे. राजकीय विश्लेषणासाठी त्याने आदान-प्रदान दृष्टिकोनाचा विकास केला. राज्यशास्त्रात जो व्यवस्थात्मक दृष्टिकोन ईस्टनने आविष्कारीत केला त्याचे मुख्य आधार खालील प्रमाणे आहेत.

**(१) राजकीय व्यवस्था**

डेव्हिड ईस्टन राजकारणाचा अभ्यास एका व्यवस्थेच्या स्वरूपात करतो. या व्यवस्थेची निर्मिती व्यक्तीकडून होते जी धोरण निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी करते. राजकीय व्यवस्था सामाजिक व्यवस्थेचे एक अंग आहे. ईस्टनच्या मते, राजकीय पद्धती आणि पर्यावरण यामध्ये विनिमय व देवाण-घेवाणीचे कार्य सतत चालत असते. ही देवाण-घेवाण म्हणजेच आदान-प्रदान प्रक्रिया होय. राजकीय व्यवस्थेला सीमा आहेत पण त्याचे पर्यावरण असिमीत आहे. पर्यावरण व अन्य सामाजिक उपव्यवस्थांपासून राजकीय व्यवस्था स्वतंत्र

अस्तित्व ठेवत नाही.

**(२) पर्यावरण**

प्रत्येक राजकीय व्यवस्था पर्यावरणाने प्रभावित होत असते. पर्यावरणाच्या प्रती राजकीय व्यवस्थेने संवादाची क्रिया करणे आवश्यक असते. समस्यांचा सामना करणे व परिस्थितीशी अनुकूल होणे ही क्षमता राजकीय व्यवस्थेने निर्माण केली पाहिजे.

पर्यावरणाचे दोन प्रकार आहेत.

**अ) समाजातील पर्यावरण :** या प्रकारच्या पर्यावरणात सामाजिक संरचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, लोकसंख्यात्मक व्यवस्था आणि व्यक्तिपरक यांचा समावेश होतो; जे समाजातील कार्यकारी घटक मानले जातात.

**ब) समाजबाह्य पर्यावरण :** या पर्यावरणात आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्था, आंतरराष्ट्रीय संघटना (संयुक्त राष्ट्रसंघ), आंतरराष्ट्रीय संस्कृती यांचा समावेश होतो.

राजकीय व्यवस्थेच्या बाहेर दोन्ही पर्यावरणात अस्तित्वात असणाऱ्या विविध व्यवस्था मिळून एक संपूर्ण पर्यावरण तयार होते. या पर्यावरणात निर्माण होणाऱ्या अडचणी, समस्या आणि परिवर्तन यासाठी प्रकार्यात्मक किंवा विकार्यात्मक कारणे असू शकतात. ईस्टनने यासाठी राजकीय व्यवस्थेत क्षमता वृद्धी करण्यावर भर दिला आहे.

**(३) आदान (Input)**

राजकीय व्यवस्था अशा वातावरणात किंवा पर्यावरणात कार्य करते की, त्या राजकीय व्यवस्थेवर अनेक प्रकारचे प्रभाव पडतात. हे प्रभाव सामाजिक, जातीय, राष्ट्रीय, धार्मिक, आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय अशा प्रकारचे असू शकतात. या प्रभावातून काही मागण्यांचा जन्म होतो. या मागण्यांना 'आदान' असे म्हणतात. मागण्यांची संख्या जितकी जास्त तितका राजकीय व्यवस्थेवर ताण जास्त वाढत जातो. आदानाचे दोन मुख्य प्रकार आहेत.

**क) मागणी :** वातावरणातील त्या प्रभावाला मागणी म्हटले जाते ज्याचा काहीतरी दबाव राजकीय व्यवस्थेवर पडतो. मागणी दोन प्रकारची असते.

**i) विशिष्ट मागणी :** विशिष्ट मागणीचा संबंध हा निश्चित क्षेत्र, उद्देश आणि विषयाशी असतो. उदा. एखाद्या आपत्तीचे परिमार्जन करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाची केलेली मागणी विशिष्ट असते. पूरनियंत्रणासाठी बांध बांधणे.

**ii) सामान्य मागणी :** या मागणी अंतर्गत अनेक मागण्या केल्या जातात. या मागण्यांचा उद्देश समाजामध्ये आमूलाग्र परिवर्तन करणे हा असतो.

**ख) समर्थन :** राजकीय व्यवस्थेकडून केलेल्या कार्यांना जनतेकडून समर्थन मिळणे आवश्यक असते. जनतेच्या समर्थनाशिवाय मागण्यांना अर्थच नसतो. समर्थन असेल तर त्याचा प्रचंड प्रभाव राजकीय व्यवस्थेवर पडतो. या क्रियेला गुंतवणूक म्हणतात. डेव्हिड ईस्टन यांनी समर्थनाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "राजकीय विकासाला उन्नत किंवा रोखणारी जी ऊर्जा असते त्यास समर्थन म्हणतात."

समर्थनामुळे अधिकाऱ्यांचे मागण्यांवर लक्ष आकर्षिले जाते. समर्थन हे राजकीय व्यवस्थेला पर्यावरणाशी जोडते. समर्थनानेच शासनाला स्थैर्य येते आणि सामाजिक एकता निर्माण होते.

**(४) प्रदान (Output)**

लोकांच्या मागण्या आणि समर्थनाच्या आधारावर सरकारकडून जे निर्णय घेतले जातात त्यांना प्रदान किंवा निर्गत म्हणतात. या प्रदान प्रक्रियेमुळेच कोणतीही राजकीय व्यवस्था प्रभावित होत असते. हे निर्णय कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्यायमंडळ किंवा शासकीय आयोगांकडून घेतले जातात. प्रदानाचे दोन प्रकार आहेत.


१) अधिकारीक प्रदान

२) संबंधित प्रदान

अधिकारीक प्रदान हे उत्तरदायी असते तर संबंधित प्रदानाची जबाबदारी नसते.

**(५) प्रत्यादान (Feedback process)**

शासन व्यवस्थेकडून घेतलेल्या निर्णयांवर म्हणजे प्रदान प्रक्रियेवर लोकांकडून एक प्रतिक्रिया व्यक्त होत असते. या प्रतिक्रियेचा एकूण व्यवस्थेच्या वातावरणावर प्रभाव पडत असतो. यालाच 'प्रत्यादान' म्हटले जाते. आदान - प्रदान - प्रत्यादान ही एक अखंडित प्रक्रिया असते. या प्रत्यादानात पाठिंबा व विरोध अशा दोन क्रिया होत असतात. या प्रत्यादानातून परत काही मागण्या जन्माला येतात; याच 'आदान' होतात. थोडक्यात हे चक्र अविरत फिरत राहते. या संदर्भात दिलेल्या आकृतीतून हे अधिक स्पष्ट होते.




अशा प्रकारे व्यवस्थात्मक दृष्टिकोनाचे विश्लेषण करता येते.

**व्यवस्था दृष्टिकोनाचे दोष / टीका / मर्यादा**

**(१) यांत्रिकी दृष्टिकोन**

डेव्हिड ईस्टनने जो व्यवस्था दृष्टिकोन विवेचित केला त्यात आदान-प्रदान प्रत्यादानाची यांत्रिकी व्यवस्था विशद केली त्याप्रमाणे माणूस कार्य करू शकत नाही. त्यामुळे हा दृष्टिकोन मर्यादित आहे.

**(२) स्थितीवादी**

एका निश्चित व्यवस्थेलाच महत्त्व देणारा हा दृष्टिकोन क्रांतिकारी आणि व्यापक परिवर्तनाकडे दुर्लक्ष करतो. मागणी व समर्थनाभोवतीच आपले लक्ष केंद्रीत केल्याने या दृष्टिकोनाला टीकाकार स्थितीवादी मानतात.

**(३) राजकीय तत्त्वांची उपेक्षा**

ईस्टनने राजकीय व्यवस्थेची व्यापक कल्पना केली आहे. परंतु वास्तवात राजकीय तत्त्वांना म्हणावे तितके स्थान दिले गेलेले दिसत नाही. ईस्टनच्या आदान-प्रदान प्रक्रियेला राजकीय मूल्य मानणे कठीण आहे. म्हणून एकूण व्यवस्थेतल्या राजकीय तत्त्वांची उपेक्षाच या दृष्टिकोनातून होते.

**(४) अमूर्त संकल्पना**

ईस्टनने मांडलेली संकल्पना जगाच्या कोणत्याच भागात मूर्त स्वरूपात दिसत नाही. व्यवस्थेचे कार्य जे आदान-प्रदान व प्रत्यादानाच्या स्वरूपात चालल्याचे ईस्टन म्हणतो ते तितके काटेकोर कोठेच दिसत नाही. व्यावहारिकदृष्ट्या ही संकल्पना अप्रस्तुत ठरते.

**(५) विकासाकडे दुर्लक्ष**

व्यवस्था दृष्टिकोन केवळ मागणीच्या भोवतीच फिरणारा दृष्टिकोन आहे. राजकीय व्यवस्थेतून जो विकास साधला गेला पाहिजे त्याचे कसलेच प्रारूप हा दृष्टिकोन मांडत नाही. केवळ मागणीच्या भोवती फिरणारे प्रतिमान व्यवस्थावाद्यांनी मांडले.

**(६) वास्तविक मागण्यांची अपूर्तता**

राजकीय व्यवस्थेमध्ये कधी - कधी वास्तविक व महत्त्वाच्या मागण्यांची पूर्तता होतच नाही. प्रशासनाकडून योग्य मागण्यांकडे हेतु:पुरस्सरपणे दुर्लक्षच केले जाते. भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाईमुळे आदान-प्रदान ही प्रक्रिया नावापुरतीच शिल्लक राहते, असे टीकाकार मानतात.

**(७) विचारवंतांची टीका**

१. पॉल एफ क्रीस म्हणतो की, "डेव्हिड ईस्टनचा सिद्धांत राजकीय सारहीनतेचे दर्शन आहे."

२. लिप्सनच्या मते, "व्यवस्था सिद्धांत ही केवळ यांत्रिक व्याख्या आहे."

३. ओ. आर. यंग म्हणतो, "व्यवस्था दृष्टिकोन कोरा दृष्टिकोन आहे."

अशा टीका जरी व्यवस्था दृष्टिकोनावर केल्या जात असल्या तरी राजकीय व्यवस्थेचे तुलनात्मक अध्ययन करण्यासाठी व राजकीय व्यवस्था व पर्यावरणाचा सहसंबंध जोडण्यासाठी हा दृष्टिकोन महत्त्वपूर्णच ठरतो.

## संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन
## (Structural Functional Approch)

मानवशास्त्र व समाजशास्त्रज्ञांनी समकाळात संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाचा विकास घडवून आणला. लुडविग वॉन बर्टलेन्फी या अनुषंगाने म्हणतो की, "व्यवस्था विश्लेषणाप्रमाणेच संरचनात्मक कार्यात्मक विश्लेषणही राज्यशास्त्रात समाजशास्त्राच्या मार्गाने आले आहे."

राजकीय व्यवस्थेच्या अनुषंगाने ईस्टनने जो दृष्टिकोन मांडला त्याला आदान-प्रदान दृष्टिकोन म्हटले जाते तर आल्मंड आणि पॉवेल यांनी जो दृष्टिकोन मांडला त्याला संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन म्हणतात. व्यवस्था दृष्टिकोनाचेच विकसित रूप म्हणजे संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन होय. संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाची सर्वप्रथम व्याख्या गॅब्रिएल आल्मंड यांनी केली. गॅब्रिएल आल्मंडने आपल्या The Politics of Developing Areas आणि Comparative Politcs : A Development Approch या दोन ग्रंथातून संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनावर लेखन केले आहे.

डेव्हिड ईस्टनने मांडलेला व्यवस्थात्मक दृष्टिकोन राज्यशास्त्रात सामान्य सिद्धांत मांडण्यासाठी अपुरा पडला. ईस्टनने व्यवस्था दृष्टिकोनामध्ये संपूर्ण

राष्ट्रीय व्यवस्थेवर लक्ष केंद्रीत केले होते. परंतु व्यवस्थेची संरचना व तिच्याशी संबंधित प्रक्रियांचा संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला नव्हता. संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनामुळे राजकीय व्यवस्था, व्यवस्थेची संरचना व त्यात होणारी प्रकार्ये यांच्यामध्ये होणारे परिवर्तन व विकास यांचा अभ्यास करणे सुलभ झाले.

**संरचनेचा अर्थ**

राजकीय व्यवस्थेत कार्यांना करणाऱ्या व्यवस्थेस संरचना असे म्हणतात. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत कार्य करण्याची जबाबदारी ज्या संघटनांवर पडते, फक्त त्याच संघटनांना संरचना म्हणता येते. प्रत्येक संघटनेस संरचना म्हणता येत नाही. संसद, कार्यकारी मंडळ हे संरचना ठरतात कारण त्या कायम राजकीय व्यवस्थेत क्रियाशील असतात.

**'कार्य' चा अर्थ**

रॉबर्ट सी बोन म्हणतो की, "कार्यात्मकता किंवा प्रकार्य कोणत्याही व्यवस्थेला कायम ठेवण्यासाठी तसेच विकसित करण्यासाठी केली जाणारी अशी क्रिया किंवा प्रारूप (Model) आहे, जे नियमित स्वरूपात चालू असते."

थोडक्यात व्यवस्थेत ज्या क्रिया घडत असतात त्याला कार्य म्हटले जाते. तीच व्यवस्थेची क्रियात्मकता असते. क्रियात्मकतेमुळेच व्यवस्था विकासाभिमुख बनत असते. कार्याचे दोन प्रकार पडतात. एक प्रगट कार्ये व दुसरे अप्रगट कार्ये.

**संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाच्या व्याख्या**

संरचनात्मक कार्यात्मक विश्लेषण दृष्टिकोन दोन प्रत्ययांवर अवलंबून आहे. एक संरचना व दुसरे कार्य. या दोन्हीचा सहसंबंध प्रस्थापित करून संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन तयार करण्यात आला. या दृष्टिकोनाच्या व्याख्या पुढील प्रमाणे पाहता येतात.

**ऑरेन यंग यांच्या मते,**

"राजकीय व्यवस्थेमध्ये संरचनेइतकेच कार्यालाही महत्त्व असते, हे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनातून स्पष्ट होते."

**डॉ.एम.पी.वर्मा म्हणतात,**

"कोणत्या राजकीय व्यवस्थेमध्ये कोणती आधारभूत कार्ये पूर्ण होतात? ती कार्ये कोणत्या संरचनेद्वारे पूर्ण होतात? आणि ती कार्ये कोणत्या परिस्थितीत पूर्ण होतात? ह्याचाच अभ्यास करणारा दृष्टिकोन म्हणजे कार्यात्मक आणि संरचनात्मक दृष्टिकोन होय."

उपरोक्त व्याख्यांचा विचार करता हे स्पष्ट होते की, संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन संरचनेद्वारे केल्या जाणाऱ्या कार्याचा मागोवा घेणारा दृष्टिकोन आहे. तद्वतच राजकीय व्यवस्थेची क्रियान्वयन प्रक्रिया दर्शविणारा हा दृष्टिकोन आहे.

**संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाची मूलतत्त्वे / वैशिष्ट्ये / लक्षणे**

ॲलन बॉल च्या मते, "व्यवस्था सिद्धांताच्या परिणामस्वरूप किंवा प्रतिक्रियेच्या स्वरूपात संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाचा जन्म झाला." अधिक उन्नत स्वरूपात राजकीय व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन म्हणून याकडे पाहिले जाते. या दृष्टिकोनाची मूलतत्त्वे किंवा वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतात.

**(१) संपूर्ण राजकीय व्यवस्थेवर भर**

डेव्हिड ईस्टन प्रमाणेच आल्मंड राजकीय व्यवस्थेलाच विश्लेषणाचा मुख्य आधार मानतो. परंतु आल्मंड राजकीय व्यवस्थेतील संपूर्ण संरचनेला समजून घेण्याला महत्त्व देतो. याठिकाणी आल्मंड हा ईस्टनच्या एक पाऊल पुढे जावून विचार करतो. डेव्हिड ईस्टन पर्यावरणाच्या सीमेमध्ये राहून राजकीय व्यवस्थेच्या क्रियांचा विचार करतो पण आल्मंड या सीमांच्या बाहेर जाणे मान्य करतो. त्यामुळे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन संपूर्ण राजकीय व्यवस्थेचे अनुशीलन करतो.

**(२) विशिष्ट कार्याच्या अटीचे प्रतिपादन**

विशिष्ट कार्यांना करण्यासाठीच विभिन्न संरचनांची किंवा संघटनांची

निर्मिती केली जाते. या संरचनांकडून अशी अपेक्षा केली जाते की, त्यांनी निर्धारित करून दिलेल्या कार्यांची पूर्तता केली पाहिजे; ज्यामुळे राजकीय व्यवस्थांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहील. आल्मंडने हे स्वीकारले आहे की, विभिन्न राजकीय व्यवस्थांमधील कार्यांमध्ये समानता असतानाही संरचनांमध्ये विभिन्नता दिसून येते. यावरून हे स्पष्ट होते की, सर्व राजकीय व्यवस्थांची संरचना एकसारखी असेलच असे नाही. मात्र सर्व राजकीय व्यवस्थामधील संरचना काही विशिष्ट अनिवार्य कार्य करतातच, असे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन प्रतिपादन करतो.

**(३) विभिन्न संरचनेमध्ये कार्यात्मक निर्भरता**

आल्मंडच्या मते, राजकीय व्यवस्थेमध्ये अस्तित्त्वात असणाऱ्या विभिन्न संरचनांच्या अंतर्गत निर्भरता कार्यात्मक आधारावर आधारित असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर प्रत्येक संघटना ही दुसऱ्या संघटनेच्या द्वारे केलेल्या कार्यावर प्रभाव टाकत असते. संरचनेतील प्रत्येक संघटनेचा उद्देश एकच असतो आणि त्या एकमेकावर अवलंबून असतात. उदाहरण द्यायचे झाले तर, कायदेमंडळ कायदे करते पण ते अंमलात आणण्यासाठी कार्यकारी मंडळ प्रयत्नशील असते. त्या कायद्यांवर राजकीय पक्षांचा प्रभाव असतो. ही कार्याची साखळी संरचनात्मक अवलंबन दर्शविते.

**(४) संरचनात्मक प्रतिस्थापनेस मान्यता**

आल्मंडच्या मते, प्रत्येक व्यवस्थेत सांस्कृतिक भिन्नता असते. यामुळे संरचनांमध्ये वेगळेपण दिसून येते. म्हणजे कार्याच्या प्राप्तीसाठी विभिन्न राजकीय व्यवस्थांमध्ये भिन्न प्रकारच्या संरचनांची निर्मिती केली जाते. या प्रकारच्या संरचनांमध्ये परिवर्तन होत राहते. एक संघटनेच्या जागी दुसऱ्या संघटनेची निर्मिती केली जाते. यंग हा विचारवंत म्हणतो की, "संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य हे आहे की, यात संरचनात्मक प्रतिस्थापनेला मान्यता दिली आहे." थोडक्यात संरचनेत बदल करण्यास हा दृष्टिकोन मान्यता देतो.

### (५) कार्यक्षम व अकार्यक्षम संरचनांना मान्यता

प्रत्येक राजकीय व्यवस्थेमध्ये कार्यक्षम व अकार्यक्षम अशा दोन्ही संरचना अस्तित्त्वात असतात. राजकीय व्यवस्थेअंतर्गत असणाऱ्या संघटनामार्फत कायम केल्या गेलेल्या चांगल्या कार्यामुळे राजकीय व्यवस्था गतीमान राहते. मात्र काही संरचना अशी कार्य करतात ज्याचा वाईट परिणाम राजकीय व्यवस्थेवर पडत असतो. ज्यामुळे राजकीय व्यवस्था कमकुवत होण्याचा धोका असतो. संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन या दोन्ही संरचनांना मान्यता देऊन त्यांच्या अध्ययनास अग्रक्रम देते. द्विमुखी कार्याचे विश्लेषण करणारा हा दृष्टिकोन आहे.

अशा प्रकारे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाची मूलतत्त्वे विशद करता येतात.

### आल्मंड व पॉवेल प्रणित संरचनात्मक - कार्यात्मक दृष्टिकोन

आल्मंड व पॉवेल राजकीय व्यवस्थेचे तीन पैलू सांगतात. ते म्हणजे, राजकीय संरचना, राजकीय संस्कृती व राजकीय अभिजन. प्रत्येक राजकीय व्यवस्था अंतर्गत व बाह्य पर्यावरणाने व्यापलेली असते. राजकीय व्यवस्थेत क्षमता किंवा सामर्थ्य असते म्हणूनच तिच्यात स्थीरत्त्व व परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरू असते. स्थीरत्त्व व परिवर्तनासाठी संरचनांची कार्यात्मकता महत्त्वाची असते. राजकीय व्यवस्थेत चार प्रकारचे सामर्थ्य निहीत असते असे आल्मंड म्हणतो.

### अ) राजकीय व्यवस्थेच्या सामर्थ्याचे प्रकार

**१) नियंत्रणाचे सामर्थ्य :** नियंत्रणाद्वारेच राजकीय व्यवस्था आपल्या राजकीय समुदायास व्यवस्थित ठेवू शकते.

**२) प्राप्तीचे सामर्थ्य :** राजकीय व्यवस्थेची ही क्षमता म्हणजे लोकांकडून कर सेवांची प्राप्ती होय.

**३) वितरण सामर्थ्य :** राजकीय व्यवस्था हे सामर्थ्य वापरून समाजाला

फायदा करून देते. उत्पन्नाच्या साधनांचे वितरण करणे, अधिकारांचे वितरण करणे इत्यादी स्वरूपाच्या गोष्टी राजकीय व्यवस्था करते.

**४) प्रतिसादात्मक सामर्थ्य :** याचा संबंध राजकीय व्यवस्थेच्या त्या प्रदान कार्याशी आहे ज्यात मागणीसाठी आवश्यक संसाधन राजकीय व्यवस्था उपलब्ध करून देते. थोडक्यात मागण्यांना प्रतिसाद देते.

राजकीय व्यवस्थेच्या या सामर्थ्यातूनच जी कार्ये राजकीय संरचनेला करावी लागतात त्यालाच संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनात आल्मंड व पॉवेल अधोरेखित करतात.

**ब) राजकीय व्यवस्थेची चार वैशिष्ट्ये**

आल्मंड व पॉवेल राजकीय व्यवस्थेच्या संरचनात्मक व कार्यात्मक पैलूंना समजण्यासाठी चार वैशिष्ट्यांची मांडणी करतात.

**१) राजकीय संरचना :** राजकीय संरचना दोन प्रकारच्या असतात. एक अनिवार्य व दुसऱ्या ऐच्छिक. या दोन्ही संरचनातून राजकीय व्यवस्थेचे कार्य सुरू असते.

**२) समान कार्य :** सर्व व्यवस्थांमध्ये एकसारखेच कार्य चालत असते. केवळ कार्यशैली म्हणजेच पद्धतीबाबत वेगळेपण असू शकते. त्याचे कारण म्हणजे, सांस्कृतिक विविधता होय.

**३) बहुकार्यात्मकता :** सद्यस्थितीत सर्वच राजकीय व्यवस्था एकाच कार्याशी मर्यादित नसून त्यांच्यात बहुकार्यात्मकता आलेली आहे.

**४) संमिश्र व्यवस्था :** आल्मंड यांनी सर्व राजकीय व्यवस्था मिश्रित स्वरूपाच्या मानल्या आहेत. राजकीय व्यवस्थेत काही गुणधर्म परंपरागत व काही आधुनिक असतात. त्यामुळे शुद्ध स्वरूपात राजकीय व्यवस्था नसते.

**क) राजकीय संरचनेचे कार्यात्मक पैलू / वर्गीकरण**

आल्मंड व पॉवेल यांनी ईस्टन प्रमाणेच राजकीय व्यवस्थेच्या कार्याची तीन वर्गात विभागणी केली आहे. त्याचा विचार पुढील प्रमाणे करता येतो.

**१) राजकीय व्यवस्थेत आदान**

आल्मंड यांनी ईस्टन प्रमाणे मागणी व समर्थन या आदान प्रक्रियेला स्वीकारले आहे.

**मागणी**

आल्मंड मागण्यांना चार भागात विभागतो.

(१) वस्तु आणि सेवांच्या वितरणासंबंधी मागण्या

(२) सार्वजनिक व्यवहारांना नियंत्रित करण्यासंबंधी मागण्या

(३) राजकीय सहभागासंबंधी मागण्या. उदा. मतदान

(४) माहितीची प्राप्ती व्हावी यासाठी केल्या जाणाऱ्या मागण्या

**समर्थन**

मागण्यांना समर्थनाचे परत चार प्रकार आल्मंड विशद करतो.

**(१) भौतिकवादी समर्थन** यामध्ये कर (Tax) देणे याचा समावेश होतो.

**(२) आज्ञापालनाचे समर्थन** यात सरकारकडून दिल्या जाणाऱ्या आदेशांचे पालन करणे निहीत आहे.

**(३) सहभागी समर्थन** हे राजकीय सहभागाशी संबंधित असून मतदान करणे, आंदोलन करणे याचा समावेश या समर्थनात होतो.

**(४) श्रद्धात्मक समर्थन** हे समर्थन राज्यकर्ते - नेते यांच्या प्रती कमालीचा आदर व्यक्त करून दाखविले जाते.

मागणी व समर्थन यातून एक राजकीय संस्कृती तयार होत असते. लोकांच्या अभिवृत्तीशी याचा संबंध असतो. राजकीय सामाजिकीकरणातूनच मागणी व समर्थन या गोष्टी आकाराला येत असतात. राजकीय समाज व्यक्तीचे जितके राजकीय सामाजिकीकरण घडवून आणते तितकाच राजकीय सहभाग व सक्रियता वाढते किंवा कमी होत असते. राजकीय व्यवस्थेबद्दलचे परिपूर्ण ज्ञान होण्यासाठी राजकीय सामाजिकीकरण आवश्यक ठरते व त्यातूनच लोक राजकीय

भरतीकडे वळतात.

### २) रुपांतर प्रक्रिया

आल्मंड व पॉवेल यांनी राजकीय व्यवस्था विश्लेषणाला दिलेली महत्त्वपूर्ण देणगी म्हणून रुपांतर प्रक्रियेचा उल्लेख करावा लागेल. रुपांतर प्रक्रिया दोन प्रकारची असते. एक राजकीय स्तरावर व दुसरी शासकीय स्तरावर.

### अ) राजकीय स्तरावरील रुपांतर प्रक्रिया / प्रदान कार्ये

सदरील प्रक्रिया ही मागण्यांना निर्णययोग्य करण्यासाठी महत्त्वाची मानली जाते. यात केवळ सरकारी संरचनाच सहभागी होत नाही तर गैरसरकारी राजकीय संघटनाही सहभागी होतात. दबावगट, राजकीय पक्ष, हितसंबंधी गट यांचा वाटा या स्तरावर खूप मोठा असतो. सरकार सोबत हे पक्ष व गट आंतरसंबंध प्रस्थापित करून ही प्रक्रिया पूर्ण करतात. याचे तीन टप्पे पडतात.

#### i) हितसंबंधाचे आविष्करण

व्यक्ती व समुहाच्या मागण्यांकडे सरकार व राजकीय व्यवस्थेने लक्ष देण्यासाठी हितसंबंधाचे आविष्करण ही प्रक्रिया आहे. हितसंबंधाची स्पष्ट अभिव्यक्ती यावेळी केली जाते. याकामी राजकीय पक्ष, दबावगट यांचे साह्य घेतले जाते. हितसंबंधाचे अभिव्यक्तीकरण केल्याने राजकीय व्यवस्थेला नेमके प्रश्न व मागण्या याची जाणीव होते.

#### ii) हितसंबंधाचे एकत्रीकरण

लोकांकडून राजकीय व्यवस्थेकडे पाठविलेल्या मागण्यांची यादी मोठी असते. त्या सर्व मागण्यांचे वर्गीकरण प्रथमतः करावे लागते. आवश्यक व अनावश्यक मागण्या हे स्पष्ट करून त्यांचे एकत्रीकरण करणे गरजेचे असते. सूत्रबद्धपणे हितसंबंधाची मांडणी करण्याची जबाबदारी प्रामुख्याने राजकीय पक्ष पार पाडत असतात. या एकत्रीकरणामुळे राजकीय व्यवस्थेला निर्णय घेणे सोपे जाते.

**iii) राजकीय संदेशवहन**

राजकीय संदेशवहन किंवा संसूचनामुळे लोकांच्या विविध मागण्या राजकीय व्यवस्थेच्या भिन्न संरचनेपर्यंत पोहचविणे सहज शक्य होते. तसेच राजकीय व्यवस्थेकडून मागण्यावर कोणता निर्णय घेतला गेला याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठीही राजकीय संदेशवहनाचा उपयोग होत असतो. राजकीय संदेशवहनाची कार्ये वृत्तपत्रे, दृकश्राव्य माध्यमे, सोशल मिडिया यांच्यामार्फत केले जाते. त्यासोबतच राजकीय पक्ष, दबावगट, विविध संघटना, लॉबी या देखील राजकीय संसूचनाचे कार्ये करत असतात. राजकीय संदेशवहनच राजकीय व्यवस्था व जनता यांच्यातील दुवा असते.

**ब) शासकीय स्तरावरील रुपांतर प्रक्रिया**

शासकीय पातळीवरील रुपांतर प्रक्रिया आल्मंड व पॉवेल तीन कार्यात्मक प्रवर्गात पुढीलप्रमाणे विभाजित करतात.

**i) नियम निर्मिती**

राजकीय संघटनेतील 'कायदेमंडळ' किंवा 'विधिपालिका' नियम निर्मितीचे म्हणजेच कायदे निर्मितीचे कार्य करत असते. तसेच जुन्या नियमात दुरूस्ती करण्याचे कार्यही विधिमंडळाकडून केले जाते.

**ii) नियमांची अंमलबजावणी**

नियमांची व कायद्यांची अंमलबजावणी हे कार्य राजकीय व्यवस्थेला काटेकोरपणे पार पाडावे लागते. यासाठी कार्यकारी मंडळ किंवा नोकरशाही प्रयत्नशील असते. केवळ नियम किंवा कायदे निर्माण करून चालत नाही तर त्याची अंमलबजावणी योग्यपणे झाली पाहिजे तरच लोकांना त्याचा फायदा होतो.

**iii) नियमाबाबत अधिकृत निर्णय**

सद्यस्थितीत नियमांचा अधिनिर्णय न्यायालयांशी जोडण्याची प्रथा सुरू झाली आहे. केलेले नियम किंवा कायदे योग्य आहेत का? त्यातून जनहित साधले जाते का ? याचा विचार करून त्यावर निर्णय देण्याचा न्यायालयाला अधिकार

आहे. यामुळे कायदे निर्मिती व अंमलबजावणीवर एकप्रकारे अंकुश राहतो. तसेच आज तर न्यायालयीन सक्रीयतेमुळे या प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. न्यायपालिकेकडे दंडशक्ती असल्यामुळे निर्णयाबद्दलची पारदर्शक तपासणी करून त्यासंबंधी निर्णय दिल्यास तो राजकीय व्यवस्थेतील अन्य संघटना व लोकांना मान्य करावाच लागतो.

उपरोक्त स्वरूपात शासकीय पातळीवरील संरचना कार्य करून लोक मागण्यांना योग्य स्वरूपात न्याय देण्याचा प्रयत्न करतात.

**३) राजकीय व्यवस्थेची प्रदान कार्ये**

आल्मंड व पॉवेलनी राजकीय व्यवस्थेकडून चार प्रकारची प्रदान कार्ये केली जातात, असे म्हटले आहे.

**१) निष्कर्ष प्रदान :** यामध्ये व्यक्तिगत सेवा, सहकार्य, करवसुली या गोष्टी केल्या जातात.

**२) नियमनक्षम प्रदान :** यात मानवी व्यवहारासंबंधीची प्रदान कार्ये येतात. थोडक्यात, मानवी वर्तनाचे नियमन करणे होय.

**३) वितरणात्मक प्रदान :** यामध्ये सरकारी सेवा, वस्तु, लाभ, संधी, सन्मान, अनुदान यांचे वितरण म्हणजे वाटप राजकीय व्यवस्थेकडून केले जाते.

**४) प्रतिकात्मक प्रदान :** यात मूल्यांना मान्यता, राजकीय प्रतिके, घोषणा, उद्देशपूर्ती या संदर्भातील कार्ये असतात.

चार प्रकारची प्रदान कार्ये करून राजकीय व्यवस्था मागण्यांची पूर्तता करते. आल्मंड म्हणतो, या सर्व प्रक्रियेत राजकीय व्यवस्थेत राजकीय सामाजिकीकरण व राजकीय भरती यांना विशेष महत्त्व आहे तरच संरचनात्मक कार्ये पूर्णत्वाला जातात. अशा प्रकारे आल्मंड व पॉवेल प्रणित संरचनात्मक दृष्टिकोनाचा विचार करता येतो.

**संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाच्या मर्यादा / टीका**

**(१) स्थितीवादी**

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन व्यवस्थेला स्थीर ठेवण्याचा पुरस्कार करतो, असा विचार स्थितीवादी स्वरूपाचा आहे, असे टीकाकार मानतात. परिवर्तनासाठी कोणतीच जागा हा दृष्टिकोन ठेवत नाही. परिवर्तनासाठी उदासिन असल्या कारणाने राजकीय व्यवस्थेत अनेक दोषांचा शिरकाव होवू शकतो, असे टीकाकार मानतात.

**(२) वस्तुनिष्ठतेचा अभाव**

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन व्यवस्थेबद्दल वस्तुनिष्ठ विवेचन न करता गुंतागुंतीचे विश्लेषण करायला प्राधान्य देताना दिसतो. राजकीय व्यवस्थेतील सर्व संरचना आपले कार्य योग्यच करू शकतात का ? याची वस्तुनिष्ठ मांडणी हा दृष्टिकोन कोठेच करत नाही. उलट संरचनेच्या कार्यक्षमतेवर अतिरिक्त विश्वास दाखवितो. तसेच राजकीय व्यवस्थेला स्थैर्य देणारी कोणतीच वस्तुनिष्ठ कसोटी हा दृष्टिकोन देत नाही.

**(३) तिसऱ्या जगाबद्दल उदासिन**

अमेरिकन विचारवंतांनी विद्यापीठात बसून मांडलेला दृष्टिकोन म्हणजे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन होय, अशी टीका टीकाकार या सिद्धांतावर करतात. कारण आशिया - आफ्रिकन राष्ट्रांतील प्रश्न व संघर्ष याचा विचार या दृष्टिकोनाने केलाच नाही. प्रगत जगातील राजकीय संरचनांची कार्यपद्धती सांगण्यापर्यंतच या दृष्टिकोनाची मजल गेली, असे टीकाकार मानतात.

**(४) अपूर्ण व अस्पष्ट**

आल्मंडने राजकीय व्यवस्थेची जी प्रारूपे मांडली ती फक्त पाश्चात्त्य देशांनाच लागू होतात. सर्वसमावेशक विचार करणारा हा दृष्टिकोन नाही. त्यामुळेच मिहान हा विचारवंत म्हणतो की, “संरचनात्मक कार्यात्मक प्रारूप हे एक अपूर्ण व अस्पष्ट प्रारूप (नमुना) आहे.”

**(५) संरचनावर अतिरेकी निर्भरता**

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनात संरचनावर अतिरिक्त विश्वास दाखविण्यात आला आहे. प्रत्येक कार्य करण्यासाठी एका विशिष्ट प्रक्रियेतूनच संरचना कार्य करते, असे सांगून या दृष्टिकोनाने संरचनांना अवास्तव महत्त्व प्रदान केले आहे; ज्यामुळे राजकीय व्यवस्था संरचनेवर पूर्णपणे अवलंबून राहत आहे.

**(६) कार्याची निश्चिती कठीण**

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाने राजकीय व्यवस्थेच्या आवश्यक कार्याचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला मात्र आवश्यक कार्यांची निश्चिती करण्यात हा दृष्टिकोन कमी पडला तसेच आवश्यक कार्यांची कसोटी कोणती? हे पण अस्पष्टच राहते.

अशाप्रकारे संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनावर टीका केल्या जात असल्या तरी राजकीय व्यवस्थेची सुसंगत मांडणी करण्याचा संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाने उत्तम प्रयत्न केला. राजकीय संरचनातील अन्योन्य संबंध स्पष्ट करत राजकीय व्यवस्थेची कार्यक्षमता अधोरेखित करण्यास हा दृष्टिकोन महत्त्व देतो. राजकीय सामर्थ्याचे उत्तम विश्लेषण करून संरचनाच्या विशेषीकरणाचे केलेले स्पष्टीकरण उत्तमच आहे. आधुनिक राजकीय विश्लेषणाला नवी दिशा देण्यात संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन महत्त्वाची भूमिका बजावितो.

# ३ ‖ राजकीय नेतृत्व

समाज सातत्यानेच 'नेता' व 'अनुयायी' अशा दोन गटात विभागलेला असतो. नेतृत्वाचे गुण खूप कमी व्यक्तीत असतात तर अनुयायींची संख्या लक्षणीय असते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व असतेच. मानवी समाजात तर नेतृत्व असतेच पण सूक्ष्मपणे पाहिल्यास प्राणीजगतातही नेतृत्व दिसून येते. उदाहरणच पहायचे तर मधमाशींच्या पोळ्यात एकच राणी माशी असते. याचा अर्थच असा की, नेतृत्व समुहाची गरज आहे. नेता, लिडर, पुढारी, म्होरक्या अशा भिन्न नावाने नेतृत्वाला ओळखले जाते. जो समुहाला सोबत नेतो त्याला नेता म्हटले जाते. जो समुहाला 'लिड' करतो तो लिडर. जो समुहापेक्षा पुढारलेला असतो तो पुढारी. जो समुहाच्या सर्वात पुढे असतो त्याला म्होरक्या म्हणतात. या प्रत्येक शब्दातून जो अर्थ ध्वनित होतो त्यातून एकच गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, नेतृत्व हे समुहाला सोबत नेणारे, समुहापेक्षा पुढारलेले व सर्वांच्या वतीने सामोरे असणारे असते. म्हणून तर स्प्रोट हा विचारवंत म्हणतो की, "जो दुसऱ्यांसाठी एक आदर्श आहे. साधारणपणे तो नेता म्हटला जातो." तर जॉर्ज एच. सेबाईनने आपल्या 'History of Western Political Thought' या ग्रंथात म्हटले आहे की, "कुंभार ज्याप्रमाणे मातीला वळण देतो, तसे पुढारी (नेते) लोकांना वळवितात." थोडक्यात समुहासाठी, लोकांसाठी आदर्श असणारे व लोक ज्यांचे आदेश पाळतात तेच नेतृत्व असते.

शासनप्रकार कोणताही असो नेतृत्व हेच त्या शासनाचे संचालन करण्याचे एकमात्र साधन असते आणि यातूनच पुढे अभिजन ही संकल्पना विकसित होत जाते. अभिजन व सामान्यजन असा स्पष्ट फरक लोकशाही शासनव्यवस्थेतही आढळतो. परंतु लोकशाहीतील नेतृत्व हे राजेशाही, हुकुमशाही व साम्यवादी राजवटीतील नेतृत्वासारखे असहिष्णू व एकांगी असून चालत नाही तर लोकशाहीतील नेतृत्व हे 'लोकाभिमुख' असावे लागते. लोक नेतृत्वाची क्षमता तपासतात आणि निवडणूकीतील कसोटीतून लोकशाहीतील नेतृत्व सिद्ध होते. लोकशाहीत लोक आपले नेतृत्व स्वयं निर्धारित व निश्चित करत असतात. जन्मापेक्षाही जनतेचा कौल अधिक महत्त्वाचा असतो लोकशाहीत. 'ग्रास रूट लिडर' (तळागाळातील नेतृत्व) ही संकल्पना यातूनच विकसित झाली आहे. निवडणुकीपुरतेही नेतृत्वाचा विचार करणे उथळपणाचे ठरू शकते. कारण नेतृत्व निर्मितीची प्रक्रिया अव्याहत आणि आजन्म चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या वैयक्तिक गुणांपैकी एक गुण म्हणूनही नेतृत्वाचा उल्लेख केला जातो. या गुणाला सूत्रबद्धपणे विकसित करण्यालाही महत्त्व आले आहे. थोडक्यात नेतृत्व हा उपजत असणारा आणि विकसित केला जाणाराही गुण मानला जातो.

### नेतृत्वाच्या निर्मितीचे दोन सिद्धांत

नेतृत्वाची निर्मिती कशी होते, या संबंधी दोन सिद्धांत प्रतिपादित केले जातात.

### (1) आनुवंशिक सिद्धांत

नेतृत्वाचे गुण आनुवंशिक असतात. जन्मजात स्वरूपातच ते व्यक्तीला प्राप्त होतात असे मानणारा हा सिद्धांत आहे. ग्रास्टिन या विचारवंताने या सिद्धांताचा प्रामुख्याने पुरस्कार केला आहे. काही व्यक्ती नेतृत्व करण्यासाठीच जन्माला येतात किंवा ती प्रतिभा त्यांच्यात मूळातच असते, असे या सिद्धांताचे मत आहे.

### (2) परिस्थितीजन्य सिद्धांत

परिस्थिती नेतृत्वाला आकार देते. परिस्थितीजन्य घटकामुळेच एखादा नेतृत्व करू शकतो. नेतृत्वाचे कितीही उपजत गुण असले आणि परिस्थिती अनुकूल नसेल तर एखादा व्यक्ती आपले नेतृत्व सिद्ध करू शकत नाही. जेनिंग या विचारवंताने या सिद्धांताचे समर्थन केले आहे. परिस्थितीय घटना व घटकांद्वारेच व्यक्तीला नेतृत्वाची संधी व सिद्धता प्राप्त होते, असे म्हणणारा हा सिद्धांत आहे. स्टॉगडील व गिब यांच्या मते, "नेतृत्व निर्धारणात परिस्थिती अधिक प्रभावी असते."

उपरोक्त दोन्ही सिद्धांताचे परीक्षण केल्यास हे स्पष्ट होते की, दोन्ही सिद्धांत एकांगी विचार मांडतात. नेतृत्वाच्या निर्मितीसाठी दोन्ही गोष्टी आवश्यक ठरतात. त्यामुळे दोन्ही सिद्धांताच्या एकत्रीकरणातूनच नेतृत्व आकाराला येते, हे वास्तव आहे.

### नेतृत्वाच्या व्याख्या

**लेपियर आणि फ्रैंसवर्थ** यांच्या मते,

"नेतृत्व हे एक असे वर्तन आहे जे इतर व्यक्तींच्या वर्तनाला प्रभावित करत असते."

**वेबस्टर** शब्दकोशानुसार,

"नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती की, जी समुहाला निर्देश देते, आज्ञांकित करते किंवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते."

**टेरी** यांच्या मते,

"विशिष्ट उद्दिष्टांकरिता व्यक्तींना स्वेच्छेने प्रभावित करण्याची प्रक्रिया म्हणजे नेतृत्व."

**ओ'डोनेल** च्या मते,

"सामान्य ध्येयाच्या प्राप्तीसाठी लोकांना सहयोगी करण्यासाठी समजावून सांगण्याची क्रिया म्हणजे नेतृत्व होय."

**मॅकआयव्हर आणि पेज** यांच्या मते,

"नेतृत्व म्हणजे लोकांना प्रोत्साहित किंवा निर्देशित करण्याची ती योग्यता जी पदाशिवाय व्यक्तिगत गुणातून अभिव्यक्त होते."

**मुने व रेले** यांच्या मते,

"नेतृत्व सत्तेचेच रुप आहे. हे रुप तेव्हा प्रगट होते जेव्हा सत्ता ही प्रक्रिया संलग्न होते."

**राजकीय नेतृत्वाचा अर्थ**

व्यवस्थेची किंवा संघटनेची कार्ये व्यवस्थित पार पाडली जावीत आणि निश्चित ध्येय साध्य करता यावे यासाठी नेतृत्व आवश्यक असते. नेतृत्वाचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे, जो अग्रणी असतो तो; आणि दुसरा अर्थ म्हणजे समुहाला, अनुयायांना मार्ग दाखविणे, संघटनेचा मुख्य म्हणून आदेश देणे होय. राजकीय व्यक्ती हा राजकीय व्यवस्थेच्या शिरोभागी राहून आपले नेतृत्व प्रस्थापित करतो तेव्हा ते नेतृत्व राजकीय असते. अन्यही नेतृत्व असते, जसे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक इत्यादी. मात्र राजकीय नेतृत्व हे अन्य क्षेत्रातील नेतृत्वावरही प्रभाव पाडण्याची क्षमता धारण करते, हे विशेष. राजकीय नेतृत्व हे राजकीय प्रक्रियेचा एक भाग असते.

ग्लेन डी पेग यांचे मत या ठिकाणी उधृत करता येते. ते म्हणतात, "राजकीय नेतृत्व म्हणजे राजकीय सत्ताधारी व्यक्ती, त्यांचे प्रतिस्पर्धी, देश-विदेशातील त्यांना मानणारे व न मानणारे अशा विभिन्न घटकांचे भूतकाळ, वर्तमानकाळ तथा भविष्यकाळातील परस्परावलंबी ह्यांचे सामुहिक वर्तन होय." थोडक्यात राजकीय नेतृत्व ही एक सामुहिक प्रक्रिया आहे.

बर्नस् म्हणतात की, "राजकीय नेतृत्व म्हणजे स्वतःमध्ये एक व्यापक प्रक्रिया असून शक्तीचा (Power) एक महत्त्वपूर्ण घटक होय." याचा अर्थ असा की, राजकीय नेतृत्व सत्तेशी संबंधित असणारा घटक आहे. राजकीय नेतृत्वाद्वारे आदेश, निर्देश, मार्गदर्शन व सत्तेचे संचालन या बाबी केल्या जातात. राज्याची व सत्तेची सूत्रे सांभाळतो तो राजकीय नेतृत्व म्हणून ओळखला जातो.

**राजकीय नेतृत्वाचे स्वरूप / वैशिष्ट्ये**

व्याख्या व अर्थाच्या आधारे राजकीय नेतृत्वाचे स्वरूप स्पष्ट करता येते.

**(1) नेतृत्व अनुयायांचा आदर्श**

कोणत्याही समुहात तोच व्यक्ती नेता होऊ शकतो ज्याला लोक आदर्श मानतात. आदर्श ही प्रतिमा जोपर्यंत टिकून असते तोपर्यंतच नेतृत्व हे मान्य व सन्मान्य असते. अनुयायी नेतृत्वाच्या आदेशाचे पालन केवळ त्याला आदर्श मानत असल्यामुळेच करतात.

**(2) आदेशाची शक्ती**

राजकीय नेतृत्वाचे एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे, त्याच्याकडे आदेशाची शक्ती असते. त्याच्या आज्ञांचे पालन अनुयायी व लोक करतात. त्यामागे सत्ता व घटनात्मक अधिकारही कारणीभूत असतात, हे वेगळे सांगायला नको.

**(3) नेतृत्व व अनुयायात परस्पर प्रभाव**

नेतृत्व व अनुयायी यांच्यात एक व्यापक परस्परसंबंध असतो. हे दोघेही आपल्या वर्तनातून एकमेकावर प्रभाव पाडत असतात. अनुयायांच्या समर्थन व आज्ञापालनातूनच नेतृत्वाची प्रतिमा अधिक उंचावत असते. तर राजकीय नेता आपल्या अनुयायांचे मानसशास्त्र ओळखणारा असला पाहिजे. अनुयायी व लोक यांच्या काही मानसिक व भावनिक गरजा असतात त्या राजकीय नेतृत्वाने विचारात घेऊन आपल्या वर्तनाची दिशा ठरवली पाहिजे. अनुयायांनाही योग्य नेता पाहिजे असतो. एखाद्याचा 'जय हो' म्हणताना त्या नेतृत्वाची क्षमता ते तपासत असतात. आदर व सन्मान नेतृत्वाला तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा नेतृत्व अनुयायांच्या मनावर व कृतीवर आपला प्रभाव टाकू शकेल. अनुयायी नेतृत्वाला स्थिर ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात तर नेतृत्व अनुयायांना संघटित ठेवण्यासाठी कृतीशील असते. या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून असतात.

**(4) नेतृत्वाद्वारे सामुहिक व्यवहाराचे निर्धारण**

समूह नेतृत्वाच्या सूचना व आज्ञांचे पालन करत असते. नेतृत्वाद्वारे दाखविलेल्या मार्गावर मार्गक्रमण करणे हे समुहाचे कार्य असते. त्यामुळे नेतृत्व समुहाच्या व्यवहाराची निश्चिती करते. समूह स्वतःचा विचार करत नाही आणि मांडतही नाही. समुहाला चेहराही नसतो. समुहाचा विचार, चेहरा नेतृत्वाला मानले जाते. त्यामुळे नेतृत्वाद्वारे निर्धारित निर्णयावर समूह वर्तन करत असतो.

**(5) संघटनेचा प्रेरक**

आधुनिक काळात कल्याणकारी राज्यात अनेक छोट्या मोठ्या संघटना आहेत. कोणत्याही संघटनेला नेतृत्वाची गरज असतेच. नेता संघटनेला व संघटनेतील लोकांना प्रेरित करत असतो. नेतृत्वाशिवाय संघटना म्हणजे फक्त दिशाहीन गर्दी होय. लोकशाही राष्ट्रात तर नेतृत्वच आपल्या राजकीय पक्षाद्वारे विविध योजना व कार्यक्रमाला प्रेरणा देऊन राबविताना दिसते.

**(6) राजकीय नेतृत्व सर्वसमावेशक**

राजकीय नेतृत्व केवळ समाजातील एका गटाशी, पक्षाशी संबंधित नसते तर ते सर्व जनतेशी संबंधित असते. राजकीय नेतृत्वाला जेव्हा जनतेची अधिमान्यता प्राप्त होते तेव्हा त्या नेत्याच्या सत्तेला अधिसत्तेचे स्वरूप प्राप्त होते. या अधिसत्तेमुळेच लोक सहजपणे आज्ञापालन करतात. राजकीय नेतृत्व हे संकुचित व एका समुहापुरते मर्यादित असता कामा नये.

**(7) सत्तासंपादनाचे उद्दिष्ट**

राजकीय नेतृत्वाच्या वैशिष्ट्यांचा विचार करत असताना या मुद्याला अधोरेखित करणे महत्त्वाचे ठरते की, राजकीय नेतृत्वाचे मुख्य उद्दिष्ट हे सत्ता संपादन करणे हेच असते. सत्ता प्राप्तीसाठीच राजकीय पक्षाचे कार्य करणे, लोकसंग्रह करणे, कायदेमंडळाचे प्रतिनिधीत्व मिळविणे, कार्यकारी मंडळात मंत्री होण्यासाठी प्रयत्न करणे, शासनाच्या निर्णय प्रक्रियेत स्थान मिळवून स्वतःचे नेतृत्व सिद्ध करण्यासाठीच राजकीय व्यक्ती धडपड करत असतो.

सत्तेशिवाय राजकीय नेतृत्वाला व्यापक जनाधार मिळत नाही, असेच समीकरण बनत चालले आहे.

**(8) व्यक्तीकेंद्री**

राजकीय नेतृत्वाचा विचार करताना व्यक्तीकेंद्रीत, व्यक्तिमहात्म्य, विभूतीप्रतिमा अशा गोष्टींचा विचार करावाच लागतो. राजकीय पक्ष किंवा पर्यायाने कधी कधी शासनातही व्यक्तीकेंद्री राजकीय नेतृत्वाला महत्त्व प्राप्त होताना दिसून येते. एकच राजकीय नेतृत्व नसते. लोकशाहीत तर सामुहिक राजकीय नेतृत्वाचा आविष्कार घडत असतो. मात्र राजकीय व्यक्ती स्वतःची विभूतीप्रतिमा गडद करण्याच्या प्रयत्नात असताना दिसतो. मॉरीस दुवर्जर यांनी भारतीय पक्षनेत्याचे वर्णन करताना म्हटले आहे की, "नेत्यांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द सत्य असतो, त्याची प्रत्येक इच्छा हा पक्षकायदा असतो." यावरून व्यक्तीकेंद्री राजकीय नेतृत्वाचे स्वरूप लक्षात येते.

अशा प्रकारे राजकीय नेतृत्वाची लक्षणे किंवा वैशिष्ट्ये नमूद करता येतात.

**नेतृत्वाचे घटक**

नेतृत्व म्हणजे अनेक घटकांचा समुच्चय होय. या घटकांना समजून घेतल्यासच नेतृत्वाची संकल्पना अधिक स्पष्ट होते. नेतृत्वाचे घटक पुढील प्रमाणे -

**(1) नेता**

कोणताही समूह किंवा गट तयार होण्यासाठी त्याच्या मुळाशी 'समान हित' असते. या समुहाला बांधून ठेवून त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी समुहातील आदर्श व लोकप्रिय व्यक्तीकडे दिली जाते. तो व्यक्ती म्हणजेच नेता होय. आर. बी. कॅटेल यांनी कोणत्याही क्षेत्रातील नेत्याला लागू पडेल अशी व्याख्या केली आहे. कॅटेलच्या मते, "एकूण समुहाच्या कार्यावर ज्या व्यक्तीचा निर्विवाद प्रभाव असतो, जी समुहामध्ये परिवर्तन घडवून

आणू शकते, जिच्यामुळे समुहाचे मनोबल व एकंदर समुहशक्ती टिकून राहते आणि जी समुहाच्या अभिवृत्तीमध्ये (व परिणामी वर्तनात) बदल घडवून आणू शकते, ती व्यक्ती म्हणजे त्या समुहाचा नेता होय."

नेता एकच असेल असेही नसते. गटाच्या किंवा समुहाच्या आकारावर नेत्यांची संख्या निश्चित होत असते. या नेत्यांमध्ये पदसोपान परंपरा असू शकते. नेता हा नेतृत्वाचा प्रथम घटक मानला जातो.

**(2) अनुयायी**

जे व्यक्ती समुहात सक्रीय असतात त्यांना अनुयायी म्हटले जाते. अनुयायांची संख्या जास्त असते म्हणूनच नेतृत्वाला महत्त्व असते. अनुयायांशिवाय नेत्याला वलय प्राप्त होत नसते. एकटा नेता काहीच करू शकत नाही. नेतृत्वाची जडण-घडण ही अनुयायांच्या समर्थनातूनच होत असते. नेता व अनुयायी यांच्यात अतुट सहसंबंध असतात. दोघे एकमेकांवर अवलंबून असतात. नेता व अनुयायी यांच्यातील सीमारेषा ही खूपच धुसर असते. त्यामुळेच अनुयायातून नेतृत्व आकाराला आलेली अनेक उदाहरणे आहेत. नेतृत्व व अनुयायी यांच्यात योग्य समन्वय असेल तरच संघटना किंवा समूह ईच्छित ईप्सित साध्य करू शकते; अन्यथा या दोघातील संघर्ष संघटनेला संपुष्टात आणते.

**(3) विशिष्ट परिस्थिती**

परिस्थितीची विशिष्टता नेतृत्वाचा एक घटक आहे. भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक, आर्थिक, जागतिक परिस्थिती यातून नेतृत्व निर्माण होत असते. नेतृत्वातील संक्रमण हे देखील विशिष्ट परिस्थितीचा परिणाम असतो. विशिष्ट परिस्थिती उद्‌भवण्यामागे गटाची वैशिष्ट्ये, गटातील व्यक्तींची संस्कृती, लोकांची बौद्धिक पात्रता, मूल्ये, प्रवृत्ती, पर्यावरण, विकास या गोष्टी कारणीभूत असतात. ही विशिष्ट परिस्थिती नेतृत्वाचा उदय होण्यास पोषक वातावरणच तयार करते. तसेच एखाद्या नेतृत्वाला अत्याधिक महत्त्व यायलाही विशिष्ट परिस्थितीच कारणीभूत ठरते.

**(4) उद्देश**

कोणताही समूह, संघटना किंवा गट उद्देशहीन नसतो. उद्देशाच्या पूर्ततेसाठी किंवा त्याच्या साधनातून नेतृत्व प्रक्रियेला गती प्राप्त होते. उद्देशांची व्याप्ती यावर नेतृत्वाची निश्चिती केली जाते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडच्या लोकांनी चर्चिलला निवडून दिले व युद्ध संपल्यास त्याला बाजूला केले. त्यावेळी युद्ध जिंकण्यासाठी चर्चिल सारखा नेता पाहिजे होता. शांतीच्या काळात त्याची गरज नाही असे इंग्लंडच्या जनतेने सांगितले होते. यावरून उद्दिष्टानुसार नेतृत्व निर्माण केले जाते व समर्थनही.

**(5) प्रसारमाध्यमे**

सामाजिक गतीशिलता वाढली आहे. प्रसारमाध्यमांनी समाजजीवनाला आपल्या कवेत घेतले आहे. नेतृत्त्वास आकार द्यायला व त्याला जनमाणसात पोहोचवायला प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. एखादा व्यक्ती प्रचार व जाहीरात करून आपले नेतृत्व लोकांच्या गळी उतरावू शकतो. तसेच एखाद्या नेतृत्वाला आपला कार्यक्रम लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठीही प्रसारमाध्यमांची गरज लागते. दृकश्राव्य माध्यमे, मुद्रित माध्यमे, सोशल मिडिया याद्वारे नेतृत्व लोकसंपर्क प्रस्थापित करते. प्रसारमाध्यमांना नकार देऊन कोणताही व्यक्ती आज नेतृत्व करू शकत नाही, हे वास्तव मान्यच करावे लागेल. टेनीबम या विचारवंताने संसूचन साधनांना नेतृत्वाचा आवश्यक घटक मानले आहे.

नेतृत्वाच्या घटकाची ही पंचसूत्री आहे, या घटकावरच नेतृत्व सिद्ध होते.

**नेतृत्वाचे गुण**

नेतृत्वासाठी विशिष्ट गुणसंपन्नता व्यक्तीकडे असणे आवश्यक असते. नेतृत्व करताना अनेक बिकट प्रसंग येतात. त्या प्रसंगावर मात करण्याची क्षमता नसेल तर नेतृत्व तकलादू ठरते. नेतृत्व हीच एक योग्यता आहे त्यामुळे

ती योग्यता मूळातच व्यक्तिमत्त्वात काही प्रमाणात असू शकते किंवा ती महत् प्रयासाने अनुभवाद्वारे अर्जित तरी करावी लागते. नेतृत्वाकडे लोक आशा व अपेक्षेने पहात असतात. त्यांचा अपेक्षाभंग होऊ द्यायचा नसेल तर नेतृत्वाचे समग्र गुण त्या व्यक्तीच्या अंगी असलेच पाहिजेत. खरे पाहता नेतृत्वाचे गुण हे गतिशील असतात. त्यात कालपरत्वे आमूलाग्र बदल होवू शकतात; परंतु तरीही काही गुण हे कालजयी असतात. त्याचा विचार करणे यथोचित ठरते. नेतृत्वाच्या गुणांचा किंवा गुणवैशिष्ट्यांचा किंवा क्षमतांचा विचार व्यापक स्वरूपात पुढील प्रमाणे करता येतो.

**अ) विचारवंतानी प्रतिपादित केलेले नेतृत्वाचे गुण**

**चेस्टर बर्नार्ड यांनी सांगितलेले नेतृत्व गुण**

**(1) निर्णय क्षमता**

नेतृत्वाला निर्णय घेण्याची क्षमता असली पाहिजे. योग्य वेळी योग्य निर्णय घेता आला पाहिजे. उशिरा घेतलेला निर्णय प्रभावहीन ठरण्याची शक्यता असते आणि वेळेत घेतलेला चुकीचा निर्णयही योग्य करण्याची क्षमता नेतृत्वाकडे असायला हवी. निर्णय घेण्याचा उत्तम गुण असलेला व्यक्तीच उत्तम नेता होऊ शकतो.

**(2) समज व सहकार्य वृत्ती**

एकटा नेता संपूर्ण संघटनेचे कार्य पार पाडू शकत नाही. नेतृत्वाकडे इतरांना समजून घेण्याची वृत्ती असली पाहिजे; तरच सामुहिक कार्याला गती येवू शकते. अनुयायांचे व लोकांचे मत समजून घेण्याची शक्ती नेतृत्वाकडे असली पाहिजे तसेच इतरांना सहकार्य करणे व इतरांचे सहकार्य घेणे अशा दुहेरी कार्याची दिशा असणारी वृत्ती नेतृत्वाकडे असलीच पाहिजे. कारण हा नेतृत्वासाठीचा एक गुण आहे.

**(3) उत्तरदायित्व**

नेतृत्व हे बळीचा बकरा असते. कारण कार्याची सर्वथा जबाबदारी

नेतृत्वाचीच असते. चांगले झाले तरी व चुकीचे झाले तरी त्याचे उत्तरदायित्व स्वीकारण्याची तयारी नेतृत्वाकडे असायलाच हवी. एखादा निर्णय चुकला तरी उदार मनाने त्याची जबाबदारी स्वीकारत आपला निर्णय चुकीचा कसा? हे सांगता आला पाहिजे, तरच नेतृत्वाबद्दल लोकांची विश्वासहार्यता वाढीस लागते.

**(4) बौद्धिक सामर्थ्य**

नेतृत्व हे बुद्धिमान असायला हवे, नेतृत्वाकडे बौद्धिक सामर्थ्य नसेल तर इतर गुणांची सार्थकता होतच नसते. राजकारण हा बुद्धिबळाचा पट असतो, त्यात बुद्धिहीनता ही मातच देते. बौद्धिक सामर्थ्यामुळेच नेतृत्व प्रत्येक अडथळ्याची शर्यत पार करण्यात यशस्वी ठरत असते.

**(5) शक्ती व सहनशीलता**

शक्ती आणि सहनशीलता या दोन्हींचा मिलाफ नेतृत्वाठायी असायला पाहिजे. सहनशीलतेने शक्तीचा वापर करता आला पाहिजे. उथळ व्यक्ती दीर्घकाळ नेतृत्व करू शकत नाही. सहनशीलतेने अनेक मार्ग खुले होऊ शकतात. त्यासाठी वाट पाहण्याची क्षमता असली पाहिजे नाही. तर शक्तीहीनता ही नेतृत्वाच्या स्थानावरच प्रश्नचिन्ह उभे करते. म्हणून शक्तीसंवर्धन हाही गुण नेतृत्वाने जोपासला पाहिजे.

चेस्टर बर्नार्ड या विचारवंताने वरील पाच गुण नेतृत्वाच्या अंगी असायला पाहिजेत असे म्हटले आहे.

**कॉफीन यांनी सांगितलेले नेतृत्वाचे गुण**

**(1) बुद्धी**

विवेकी, तीव्र बुद्धी, बौद्धिक प्रखरता, उत्तम माहिती असणारा व अंतःदृष्टीने युक्त असा व्यक्तीच नेतृत्व करू शकतो.

**(2) नैतिक संवेदनशीलता**

ईमानदारी, न्याय, उदार दृष्टिकोन, नैतिक दृष्टी, आदर्शवादी, इतरांबद्दल प्रेम व करुणा हे गुण म्हणजेच नैतिक संवेदनशीलता होय. ही नैतिक संवेदनशीलता नेतृत्वात असलीच पाहिजे.

**(3) कल्पकता**

जिज्ञासा, कल्पक विचार, पूर्वदृष्टी, मानसिकदृष्ट्या सक्षमता आणि कल्पकतेने दूरदृष्टीचा विचार हा नेतृत्वाचा स्थायीभाव असायला हवा.

**(4) संयम**

आत्मनियंत्रण, स्थितप्रज्ञता आणि शांतवृत्तीने प्रत्येक गोष्टीचा विचार करणारी संयमी वृत्ती नेतृत्वाचा गुण असते.

**(5) प्रेरणा आणि दृढनिश्चय**

कार्याप्रती निष्ठा, प्रेरणा देण्याची व घेण्याची इच्छाशक्ती, उत्साह, महत्त्वकांक्षा, प्रसिद्धीभिमुख, स्पष्टता, ध्येय गाठण्याची आसक्ती, एकाग्रपणे व निश्चयी वाटचाल करण्याची तयारी या गोष्टी नेतृत्वाच्या अंगी असायला पाहिजेत.

**(6) जबाबदारी**

विश्वसनीय, स्वच्छ, कर्तव्यपरायण, कर्मवीर, संघटक, चारित्र्यवान यातून नेतृत्वातील जबाबदारीची जाणीव होते. असे जबाबदार नेतृत्व असले पाहिजे.

**(7) आत्मनिर्भर**

आत्मविश्वासाने आत्मनिर्भरता येत असते. निर्णयनिर्धारण क्षमता ही आत्मनिर्भरतेनेच प्राप्त होते. अनुयायी येतात व जातात. एखाद्या व्यक्तीवर नेतृत्वाचे अतिरेकी अवलंबन घातक ठरते. नेतृत्व हे आत्मनिर्भरच असावे.

**(8) चैतन्यशाली व्यक्तिमत्त्व**

नेतृत्व हे चैतन्यशाली स्वरूपाचे असले पाहिजे. शारीरिकदृष्ट्या सुदृढ, आकर्षक, वाक्‌चातुर्य असलेले व ज्या व्यक्तिमत्त्वाच्या असण्यानेही समुहात चैतन्य निर्माण होईल, असे नेतृत्व असले पाहिजे.

**(9) अचूकता**

संतुलित स्वभाव, अचूक निर्णय, सहिष्णूता व अचूक नियोजन

करण्याची क्षमता हे गुण नेतृत्वात असतात. नेतृत्वाची एक चूकही अक्षम्य असते.

**(10) सामाजिक प्रतिसादात्मकता**

सामाजिक मागण्यांना सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे हे नेतृत्वाचे कसब असते. याशिवाय सामाजिक कार्यात सहभाग घेणे, मैत्री, प्रेम, बहिर्मुखी असणे व सामाजिक कल्याणाचा सदैव विचार करणे ही नेतृत्वाची गुणवैशिष्ट्ये आहेत.

**(11) उत्तम संबंधांचा पोशिंदा**

चतुर नेतृत्व हे गुणग्राहक असते. ते समाजातील संबंधांना उत्तमपणे जोडण्याचा व त्यांना टिकवून ठेवण्यासाठी आग्रही असते. सहकार्य, मानवतावाद, मानवी स्वभावाचे ज्ञान करून घेणे या बाबींना भक्कमपणा देण्यासाठी नेतृत्वाने पुढाकार घेतला पाहिजे कारण तो उत्तम संबंधांचा व गुणांचा पोशिंदा असतो.

कॉफीनने प्रतिपादित केलेल्या नेतृत्वाच्या गुणात शारीरिक कमी आणि बौद्धिक, भावनिक व मानसिक योग्यतेला अधिक महत्त्व दिले आहे. शारीरिक सौंदर्य व सुदृढतेपेक्षा नेतृत्वाची वैचारिक सुंदरता अधिक महत्त्वाची मानली जाते.

**ब) नेतृत्वाचे अन्य गुण**

उपरोक्त विचारवंताच्या प्रतिपादित केलेल्या नेतृत्व गुणांशिवाय काही इतरही गुणांचा विचार करणे आवश्यक ठरते.

**(1) उत्तम संघटक**

नेतृत्वाकडे उत्तम संघटनकुशलता असली पाहिजे. नेता लोकसंग्राहक असला पाहिजे. नेतृत्वाकडे लोक आकर्षित झाले पाहिजेत. जमलेल्या लोकांना एका सूत्रात बांधण्याची किमया नेतृत्वात असायला हवी. विभिन्न वर्गातील, जाती-धर्मातील व हितसंबंधाची माणसे एकत्र आणणे सोपे नसते. माणूस हा यंत्र नसतो. त्याच्यात भावनांचा कल्लोळ असतो. त्यामुळे भिन्न लोकात भावनात्मक

ऐक्य वाढविण्याची ताकद नेतृत्वाकडे असली पाहिजे. संघटित झालेला समूह रचनात्मक कार्याकडे वळविणे देखील गरजेचे असते. उत्तम संघटकच संघटनेतील लोकांना उचित ध्येयाकडे घेऊन जाण्याचा मार्ग दाखवितो व त्यासाठी कार्यक्रमही देतो. संघटनेत लोक टिकवून ठेवण्याची व नव्याने लोक भरती करण्याची जबाबदारीही नेतृत्वाचीच असते.

**(2) प्रभावी वक्ता**

शंभरात एक शूर, हजारात एक ज्ञानी, दहा हजारात एक वक्ता असतो, असा एका संस्कृत सुभाषिताचा अर्थ आहे. अमोघ वक्तृत्वाने लोकांच्या मनावर अधिराज्य गाजविता येते. लोक, अनुयायांना नेतृत्वाच्या भाषणातून प्रेरणा मिळत असते. लोक उत्तम बोलण्याकडे आपोआप आकर्षित होतात. भाषणाची कला सरावानेही प्राप्त करता येते. 'प्रभाव' पाडण्याची क्षमता भाषाशैलीत असते. म्हणून नेतृत्वाकडे वक्तृत्वाचे गुण असले पाहिजेत. प्रभावी वक्ता होण्यासाठी उत्तम वाचन आवश्यक असते. राजकारणाच्या घाईगर्दीतही वाचनाची सवय नेतृत्वाने जोपासलीच पाहिजे. प्रभावी वक्ता लोकप्रियतेची शिखरे चढतो व लोक त्याला आपला नेता मानू लागतात. हिटलर, मुसोलिनी, अटलबिहारी वाजपेयी, बापूसाहेब काळदाते, बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे अशी कितीतरी उदाहरणे देता येतील; ज्यांनी वक्तृत्वाच्या बळावर नेतृत्वाच्या पायऱ्या यशस्वीपणे चढल्या. नेतृत्व प्रभावी वक्ता असेल तर तो आपले म्हणणे, मत, तत्त्वज्ञान, कार्यक्रम लोकांच्या गळी उतरावितो, हे मात्र नक्की.

**(3) ज्ञानवंत व जाणवंत**

प्लेटो या ग्रीक विचारवंताने 'तत्त्वज्ञ राजा' ची संकल्पना मांडलेली आहे. नेतृत्व हे ज्ञानी असले पाहिजे कारण 'ज्ञान हाच सद्‌गुण' आहे. प्लेटोने तत्त्वज्ञ राजा निर्मितीसाठी एक शिक्षणपद्धतीच प्रतिपादिली आहे. परंतु राजकीय नेतृत्वासाठी भारतात कसलीच शैक्षणिक पात्रता निश्चित केली नाही. त्यामागे

मुख्य कारण हे आहे की, शिक्षणाच्या नावाखाली सत्तेपासून या देशातील सामान्य माणूस दूर राहू नये. तर प्रत्येकाला नेतृत्वाची संधी लाभावी. शेवटी राजकीय शहाणपण आणि शिक्षण यांचा सहसंबंध तो काय ? असा प्रश्न बऱ्याच वेळा विचारला जातो. लोकशाहीतील निवडणुका जिंकणे आणि प्रत्यक्ष राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास या दोन्ही गोष्टी भिन्नच मानाव्या लागतात. असे असले तरी एक गोष्ट मात्र विसरता येत नाही की, राज्यघटनेचे ज्ञान, लोकांचे प्रश्न समजून ती मांडण्याची पद्धत आणि निर्ढावलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून लोकांची कामे करून घेण्यासाठी शिक्षण गरजेचे ठरते. शिकलेल्या नेतृत्वाला प्रशासनही सन्मान देते आणि शेवटी हे मान्यच करावे लागते की, 'राजा स्वदेश पूज्ययेत, विद्वान सर्वत्र पूज्ययेत.' नेतृत्व जर विद्वान असेल तर मग सर्वत्र ते पूजनीय ठरू शकते. म्हणून ज्ञानवंत नेतृत्वाचा आग्रह धरणे यथोचित ठरते.

ज्ञानवंत नेतृत्वाची जशी गरज आहे तशीच जाणवंत नेतृत्वाची एक आवश्यकता आहे. लोकांच्या दुःखाशी एकरूपता साधण्याची ताकद नेतृत्वात असली पाहिजे. उंटावरून शेळ्या राखणारे नेतृत्व हे तकलादू व निरुपयोगी असते. ज्ञानाला जाणिवेची जोड मिळाली तर नेतृत्व अधिक प्रगल्भ होते. म्हणून नेतृत्वाने लोकांपर्यंत गेले पाहिजे. चीनच्या लाल क्रांतीचा प्रणेता माओ-त्से-तुंग म्हणतो त्याप्रमाणे, "नेत्याने लोकात गेले पाहिजे ते त्यांना शिकवायला नाही तर त्यांच्याकडून शिकायला." ही शिकण्याची उर्मी ज्याच्याकडे असते त्याला अपार ज्ञान मिळत जाते. राजकारण ही खुली प्रयोगशाळा असते, यात निव्वळ पुस्तकी ज्ञान कामी येत नाही तर लोकानुभव तुम्हाला तुमच्या प्रयोगांना यशस्वी करण्यासाठी महत्त्वाचे रसायन मानावे लागते. पुस्तकी ज्ञान तुम्हाला प्रश्नाचे गांभीर्य व त्याला सोडविण्याचे मार्ग दाखविते; तर प्रत्यक्ष लोकांच्या प्रश्नासंबंधीची तुमची जाण तुम्हाला प्रश्नाच्या मूळाशी घेऊन जाते. वास्तव किती भयावह असते हे जाणकारांनाच उमजत असते. म्हणून फक्त ज्ञानवंत नेतृत्व असूनही चालत नाही व केवळ जाणवंतही उपयोगाचे नसते. ज्ञानवंत व जाणवंत नेतृत्व

असले पाहिजे. थोडक्यात प्लेटोचा 'तत्त्वज्ञ राजा' आणि महात्मा गांधींचा 'लोकसेवक' असा संगम नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वात साधला गेला पाहिजे. ग्रामीण भागातील नेतृत्वाने या दोन्ही गोष्टी अवगत करण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

**(4) गर्दीच्या मानसशास्त्राचा माहितीगार**

नेता व गर्दी हे एक अजोड समीकरण मानावे लागते. गर्दीला नेता पाहिजे असतो आणि नेत्याला नेतेगिरी दाखवायला गर्दी हवी असते. दोन्हीही एकमेकांवर आधारलेले असतात. गर्दीला चेहरा नसतो आणि विचारही नसतो; पण त्या गर्दीचे नेतृत्व करणाऱ्या नेत्याला चेहराही असतो आणि विचारही. अस्थिर गर्दीला स्थिरत्त्व प्रदान करण्याचे आणि गर्दीचे मानसशास्त्र ओळखून त्यावर स्वार होण्याचे कसब असणारा नेताच गर्दीचा नायक बनतो. प्रभाव टाकण्यासाठी असामान्य शक्ती असणारा व्यक्ती गर्दीला हवी ती दिशा देऊ शकतो. हिटलरच्या मागेही गर्दी होती आणि गांधीजींच्या मागेही. पण या दोघांनी गर्दीला वेगवेगळ्या दिशेला नेले. एकाने युद्धज्वराने गर्दीला ग्रासवले तर दुसऱ्याने अहिंसेचा मूलमंत्र देऊन सत्याग्रह करायला लावले. गर्दीला तुम्ही जशी दिशा द्याल तशी ती क्रियान्वित होते. म्हणून नेतृत्वाने स्वतःच तो निर्णय घ्यायचा असतो की, गर्दीला दिशा कोणती द्यायची; अन्यथा दिशाहीन गर्दी प्रसंगी नेत्याचाही बळी घेऊ शकते. उदा. मुसोलिनी. गर्दीची नाडी जाणून त्या गर्दीचे मानसशास्त्र जर नेतृत्वाला ओळखता आले तर त्याला महानत्त्व ती गर्दीच प्रदान करते.

**(5) प्रभुत्त्वाची लालसा**

नेतृत्व हे सत्तेच्या लालसेने ग्रस्त असलेच पाहिजे. राजकीय क्षेत्रातील नेतृत्वाला सत्ता प्राप्तीची लालसा, अधिकाराची लालसा असायला हवी. तुम्हाला ज्या क्षेत्रातले नेतृत्व करायचे असेल त्या क्षेत्रात प्रभुत्त्व निर्माण करण्याची दुर्दम्य ईच्छाशक्ती तुमच्याकडे असायलाच हवी. प्रभुत्त्वाची लालसा नेतृत्वाकडे नसेल तर त्याचा विकास खुंटतो. अभिजन सामान्य जनात परिवर्तीत होतो. म्हणून

प्रभुत्त्वाची लालसा असणे हे नेतृत्वाचा एक गुण मानावा लागतो.

नेतृत्वाच्या गुणांच्या संदर्भाने सविस्तरपणे विश्लेषण केले आहेच. नेतृत्वाने बदलत्या काळाचा भाष्यकार होणे अपेक्षित असते. काळाने नव्याने निर्माण केलेली गरज गुण म्हणून स्वीकारणारे नेतृत्वच काळाच्या कसोटीवरही टिकते.

**नेतृत्वाचे प्रकार / वर्गीकरण**

वास्तविक पाहता मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व असल्यामुळे नेतृत्वाच्या प्रकारांचा विस्तार अवाढव्य स्वरूपात मांडता येऊ शकतो. मात्र त्याला संक्षिप्त स्वरूपात परंतु समग्रतेचा विचार करून पुढीलप्रमाणे वर्गीकृत व विश्लेषित करता येते.

**(1) शासकीय नेतृत्व**

जे नेतृत्व शासनाद्वारे नियुक्त केले जाते त्याला शासकीय नेतृत्व म्हणतात. शासनाकडून एखादे पद दिले गेल्यास या नेतृत्वाचा उदय होतो. शासकीय अधिकारी, महामंडळाचे अध्यक्ष, राज्यपाल यांचा यामध्ये अंतर्भाव होतो.

**(2) लोकनिर्वाचित नेतृत्व**

निवडणुकीद्वारे लोक आपल्या नेतृत्वाची निवड करतात त्याला लोकनिर्वाचित नेतृत्व म्हटले जाते. स्थानिक स्वराज संस्था, राज्यविधिमंडळ, लोकसभा यातील निवडलेले नेते हे लोकांकडून निवडून आल्यामुळेच नेतृत्व करत असतात.

**(3) स्वयंघोषित नेतृत्व**

आपल्या व्यक्तिगत गुणांमुळे जे समुहाचे नेतृत्व करण्यासाठी स्वतःहून पुढे येतात आणि आपले नेतृत्व घोषित करतात त्यांना स्वयंघोषित नेतृत्व म्हणतात. निवडणूक किंवा नियुक्ती याचा कसलाच आधार या नेतृत्वाला नसतो. स्वेच्छेने हे आपले नेतृत्व घोषित करतात. कालौघात लोक या नेतृत्वाला

मान्यता देतात. ही मान्यता अनौपचारिक स्वरूपाची असते. महात्मा गांधी, बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्व या प्रकारात येते.

**(4) सत्ताधारी नेतृत्व**

शासक किंवा सत्तारूढ व्यक्तींचा समावेश सत्ताधारी नेतृत्व या प्रकारात येतो. या प्रकारात गावच्या सरपंचापासून ते राष्ट्रपतीपर्यंतच्या सर्व सत्ताधाऱ्यांचा म्हणजेच सत्तात्मक पदावर असलेल्या नेतृत्वाचा समावेश करावा लागतो. सत्ताधारी नेतृत्व हे शक्तीशाली व प्रतिष्ठीत मानले जाते. कारण या नेतृत्वाच्या आदेशामागे दंडशक्ती मोठ्या प्रमाणात असते.

**(5) पक्ष नेतृत्व**

राजकीय पक्षात नेते व कार्यकर्ते असे दोन घटक लक्षणीय स्वरूपात दिसतात. पक्षपद्धती कोणतीही असो त्यात नेतृत्व अपरिहार्य असते. एकपक्ष पद्धतीत एकच नेतृत्व असते आणि त्याला पर्याय नसतो. हे नेतृत्व एकतंत्री असते. द्विपक्षपद्धती व अनेकपक्षपद्धती मध्ये मात्र नेतृत्व हे खुले असते. बहुनेतृत्वाला येथे संधी असते. विशिष्ट राजकीय पक्षाशी निष्ठा जोपासत राजकीय पक्षाचा कार्यक्रम लोकांपर्यंत पोहोचविणे व पक्षाला जनाधार प्राप्त करणे अशी कार्ये हे नेतृत्व करते. पक्षपातळीवरील नेतृत्वाला पक्षाच्या सीमेत कार्य करणे बंधनकारक असते.

**(6) संस्थात्मक नेतृत्व**

प्रत्येक संस्थेत किंवा संघटनेत सर्वोच्च पद ग्रहण करणारा एक व्यक्ती असतो. हा व्यक्तीच त्या संस्थेचे नेतृत्व करत असतो. विद्यापीठाचे नेतृत्व कुलगुरू करतात. महाविद्यालयाचे नेतृत्व प्राचार्यांकडे असते. तसेच विविध गैरशासकीय संस्था व संघटनेचा अध्यक्ष देखील या प्रकारचेच नेतृत्व असते.

**(7) कार्यक्षेत्रानुसार नेतृत्व**

नेतृत्वाच्या कार्यक्षेत्रानुसार व प्रभावानुसार त्याचे प्रकार पडतात; जसे

स्थानिक नेतृत्व, प्रादेशिक नेतृत्व, राष्ट्रीय नेतृत्व इत्यादी. गावचे राजकारण करणारा स्थानिक नेतृत्वात मोडतो. राज्याच्या राजकारणावर नियंत्रण असणारा राज्यपातळीवरचा नेता असतो व संपूर्ण राष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव निर्माण करू शकणारा राष्ट्रीय नेता ठरतो.

**(8) पारंपरिक नेतृत्व**

जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर याने या प्रकारचे विश्लेषण केले आहे. अखंड व अबाधित असलेल्या समाजात वय, लिंग, वर्ग किंवा जात, व्यवसाय, सामाजिक किंवा राजकीय स्थान इत्यादीनुसार काही व्यक्तींकडे नेतृत्व सोपविले जाते तेव्हा ते पारंपरिक किंवा वारसाप्रधान नेतृत्व असते. अशा व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वाचे आवश्यक गुण नसले तरी नेतृत्व करता करता नेतृत्वाचे गुण ते संपादन करतील, अशी धारणा असते. परंपरासिद्ध नेतृत्वापुढे लोक स्वतःहून माना तुकवतात. बदलत्या व बिकट सामाजिक परिस्थितीत या नेतृत्वाची अकार्यक्षमता उघड होते.

**(9) दिव्यवलयी / संमोहात्मक / करिष्माई नेतृत्व**

एखाद्या संबंधी दृढविश्वास व श्रद्धा या भावनेतून दिव्यवलयी किंवा करिष्माई नेतृत्वाचा उदय होतो. भक्त, शिष्य, अनुयायी यांची प्रसंगी अंधनिष्ठा नेतृत्वाप्रती या प्रकारात असते. मॅक्स वेबर म्हणतो, "दैवी गुणसंपदामुळे हे नेतृत्व निर्माण होते." सामान्यांना अवघड व अनाकलनीय वाटणारी एखादी गोष्ट एखादा व्यक्ती करतो तेव्हा या नेतृत्वाचा आविष्कार होतो. शिवाजी महाराज, शिखांचे दहा गुरू, हिटलर, पंडित नेहरू यांना या प्रकारात समाविष्ट केले जाते. सामान्य लोक जेव्हा या व्यक्तींच्या संमोहनाने प्रभावित होतात तेव्हा या नेतृत्वाला आपोआप अधिमान्यता प्रदान करतात.

**(10) सुधारणावादी किंवा चळवळप्रधान नेतृत्व**

राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक शुद्धीकरणाच्या हेतूने किंवा सुधारणेच्या उद्देशाने एखादी चळवळ केली जाते व त्या चळवळीचे नेतृत्व

जो व्यक्ती करतो त्याला सुधारणावादी किंवा चळवळीचे नेतृत्व असे म्हटले जाते. युरोपातील प्रबोधन चळवळीत अनेक व्यक्तींनी असे नेतृत्व केले. भारतात तर सुधारणावादी नेतृत्वाचा खूप मोठा इतिहास आहे. बुद्ध, बसवेश्वर, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, पेरियार रामसामी नायकर इत्यादी. मार्टीन ल्यूथर किंग ज्युनियर व नेल्सन मंडेला हेही चळवळप्रधान नेतृत्वाचीच उदाहरणे आहेत.

**(11) वैचारिक नेतृत्व**

वैचारिक किंवा विवेकी नेतृत्व याचा नेमका अर्थ स्पष्ट करणे कठीण आहे. कारण यात विचारवंताचे नेतृत्व की आदर्शवादी नेतृत्व ? हा प्रश्न उपस्थित होतो. विवेकी किंवा वैचारिक नेतृत्व केवळ आदर्शवादी व कल्पनावादी नसते. वैचारिक नेतृत्व हे सामाजिक वस्तुस्थिती व उच्च आदर्श यांच्यामध्ये समन्वय साधणारे असते. म्हणूनच जे. पी. नेटल म्हणतात की, "बौद्धिकतेचा संबंध केवळ विचाराशी नसून उत्तम समाज रचनेशी आहे." प्लेटोने जी तत्त्वज्ञ शासकाची कल्पना मांडली ती वैचारिक नेतृत्वाशी सुसंगत असणारी आहे. याशिवाय वैचारिक क्षेत्रात जी मंडळी तात्त्विक उंची गाठतात व समाज त्यांच्या विचारमार्गावर चालतो त्यांनाही वैचारिक नेतृत्व संबोधले जाते.

**(12) शहरी व ग्रामीण नेतृत्व**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये या स्वरूपाचे वर्गीकरण आढळते. ग्रामीण पातळीवर स्थानिक स्वराज संस्थांमध्ये नेतृत्व करणाऱ्यास ग्रामीण नेतृत्व मानले जाते. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेतून ग्रामीण नेतृत्वाचा खूप मोठा उदय झालेला दिसतो. नगर व महानगरातून 'कार्पोरेट लिडरशीप' चा उगम झालेला दिसतो. राजकारण हे सेवाव्रत असे मानण्याचे दिवस इतिहासजमा झालेले आहेत. नेतृत्वाकडे आज करिअर म्हणून पाहिले जात आहे. अशी वृत्ती शहरातून पहायला मिळते. शहरी नेतृत्व हे सुशिक्षित मानले जाते.

## (13) हितसंबंधी गटाचे नेतृत्व

धर्म, जात, लिंग, व्यवसाय, प्रदेश या निष्ठांना प्रमाण मानून जे हितसंबंधी गट तयार होतात त्याचे नेतृत्व करणाऱ्यांना हितसंबंधी गटाचे नेतृत्व म्हणतात. विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, महिला संघटना, जातीनिहाय संघटना, शुगर लॉबी, उद्योजकांच्या संघटनांचे जे नेतृत्व असते त्यांना या प्रकारात गृहित धरले जाते. शासनाकडून व समाजाकडून आपल्या मागण्यांची प्राप्ती व हिताचे संवर्धन व्हावे यासाठी हे नेतृत्व प्रयत्नशील असते.

## (14) विचारवंतांनी केलेले वर्गीकरण

### अ) मार्टीन कानवे यांचे प्रकार

1. जमावाला नियंत्रित करणारे नेतृत्व
2. जमावाची मानसिकता जाणणारे नेतृत्व
3. जमावाचे प्रतिनिधीत्व करणारे नेतृत्व

### ब) सार्जट यांचे प्रकार

1. दैनिक नेतृत्व
2. प्रतीक नेतृत्व
3. संस्थात्मक नेतृत्व
4. बौद्धिक नेतृत्व
5. प्रशासकीय नेतृत्व
6. प्रक्षोभक नेतृत्व
7. सुधारणावादी नेतृत्व
8. अधिकार गाजविणारे नेतृत्व
9. बळजबरीचे नेतृत्व
10. सिद्धांतवादी नेतृत्व
11. हुकुमशाही नेतृत्व

अशा प्रकारे नेतृत्वाचे विभिन्न प्रकार स्पष्ट करता येतात. एखादा व्यक्तीच अनेक प्रकारचे नेतृत्व करू शकतो. त्या व्यक्तीच्या कार्याची व्यापकता व क्षमता यावरून तो नेतृत्वाच्या अनेक भूमिका वठवू शकतो.

## नेतृत्वाची कार्ये

नेतृत्व हे त्या त्या संघटनेचा प्रमुख असल्यामुळे त्याच्यावर विविध जबाबदाऱ्या असतात. नेतृत्व हे कार्यनिष्ठ असतेच तसेच बहुविध कार्ये करण्याची कुशलता त्याच्याकडे असते. कार्य करण्याचे उत्तरदायीत्व त्याला पार पाडावेच लागते; पण त्या सोबतच नेता कार्य करवून घेण्यात चतुर असतो. या दोन्ही पैलूंच्या आधारे नेतृत्वाच्या कार्यांचे विश्लेषण करता येते.

### (1) आदेशात्मक व प्रेरणात्मक कार्ये

नेतृत्व तेच असते ज्याला आदेश देता येतात व आदेशांचे पालन करून घेता येते. समुहातील लोकांमध्ये कार्याची वाटणी करणे, ती कार्ये करण्यासाठी आदेश देणे व कार्ये योग्य पार पाडली जावीत यास्तव प्रेरणा देणे ही कामे नेतृत्व करत असते. सर्व कार्ये नेता एकटा करू शकत नाही म्हणून ती इतरांकडून करवून घेण्याचे कसब नेतृत्वाकडे असलेच पाहिजे. आदर, दंडशक्ती व स्वप्रतिमा या बळावर लोकांना नेतृत्व आदेश देत असते. लोकही त्याचे पालन करतात. केवळ आदेशात्मक भूमिका पार पाडून नेता मुक्त होवू शकत नाही तर आवश्यक उद्दिष्टांची प्राप्ती करण्यासाठी त्याला अनुयायी व कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा देण्याचे कार्य करावे लागते. ही प्रेरणा कधी शाबासकी, बक्षीस या स्वरूपात असते तर कधी शिक्षेच्या स्वरूपातही. मात्र ही कार्ये उत्तमपणे केल्यासच नेतृत्व सिद्ध होण्यास मदत होते.

### (2) उद्दिष्टांची निश्चिती व प्राप्ती

नेत्याची एक विशिष्ट कार्यपद्धती असते. त्या पद्धतीमध्ये आपल्या संघटनेची उद्दिष्ट्ये निश्चित करणे आणि उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी निरनिराळे

मार्ग किंवा धोरणे ठरविण्याचे कार्य नेतृत्वालाच करावे लागते. या धोरणांना व कार्यक्रमांना अनुयायांना समजावून सांगणेही गरजेचे असते तरच ते उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करू शकतात. म्हणून हे कार्यही नेताच करतो. समुहाच्या मदतीने निश्चित केलेली उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी नेतृत्वाला नियोजन आखावे लागते व वेळेत ते नियोजन मूर्तरूपात यशस्वीही करावे लागते.

**(3) निर्णय निर्धारण कार्ये**

नेत्याची निर्णय घेण्याची क्षमता किती आहे यावरच नेतृत्वाचे परीक्षण केले जाते. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवरूनच तो नेता सत्तावादी, लोकशाहीवादी की एकतंत्री आहे याचे दर्शन होते. निर्णय घेताना नेतृत्वाने दूरदर्शीत्व दाखविले पाहिजे. सामुहिक हिताचे संवर्धन करण्यासाठी प्रसंगी कटू निर्णयही नेतृत्वाला घ्यावे लागतात. घेतलेले निर्णय योग्यच आहेत हे सिद्ध करण्यासाठी निर्णयाची योग्य व काटेकोर अंमलबजावणीकडेही नेतृत्वाने लक्ष दिले पाहिजे. निर्णय घेताना अनुयायी व सहकाऱ्यांशी विचारविनिमय करणे हे लोकशाहीवादी नेतृत्वाचे लक्षण मानले जाते.

**(4) संघटनेचा मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ म्हणून भूमिका**

नेता हा संघटनेचा मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ म्हणून भूमिका वठवित असतो. सर्वांना सोबत घेऊन चालणे व सर्वांना समजून घेणे हे मित्र म्हणून नेतृत्वाचे कार्य असते. तर आपल्या अनुभवाद्वारे संघटनेला व अनुयायांना मार्गदर्शन करण्याचे कार्य नेतृत्व करते म्हणून ते मार्गदर्शक असते. आपल्या विचार, आचार व अभिव्यक्तीतून तो संघटनेला प्रेरित करतो व योग्य दिशा देतो. यामुळे लोक त्या नेतृत्वाच्या आज्ञांचे पालन करतात. म्हणून तत्त्वज्ञ या भूमिकेतून तो संघटनेतील लोकांची वैचारिक भूमिका पक्की करतो व मनोभूमिकाही सकारात्मक बनविण्याचे तो कार्य करत असतो.

**(5) कार्याचे प्रशासन**

राजकीय संघटनेच्या कार्याचे प्रशासन योग्य प्रकारे सांभाळणे ही

नेत्याची जबाबदारी असते. नियोजन, संघटन, निर्देशन, समन्वय, नियंत्रण आदी कार्यांशी स्वतंत्र संबंध नेतृत्वाला ठेवावा लागतो. संघटनेचा प्रशासकीय स्तर उच्च दर्जाचा व गतीमान ठेवण्याची पूर्ण जबाबदारी नेतृत्वाचीच असते.

**(6) प्रतिनिधीत्व करणे**

नेता समुहाचा किंवा संघटनेचा चेहरा असतो. तोच सर्वांच्या वतीने संघटनेचे प्रतिनिधीत्व करतो. कोणत्याही प्रकारची समस्या सोडविण्यासाठी संघटनेचे इतर सदस्य नेत्याकडे धाव घेतात. नेता संघटनेच्या हितासाठी प्रवक्ता म्हणून शासन, प्रशासन व समाजाशी संवाद प्रस्थापित करतो व संघटनेचे प्रतिनिधीत्व करतो.

**(7) मध्यस्थाची भूमिका**

संघटनेमध्ये संघर्ष होणे अपरिहार्य असते. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती व विकृती असतात. अनुयायांमध्ये श्रेयावरून व श्रेष्ठत्वावरून संघर्ष होतात. तसेच कार्य करताना एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रकारही असतात. यामुळे ताण-तणाव निर्माण होतात. अशावेळी नेतृत्वाला मध्यस्थाची भूमिका वठवावी लागते. सर्वांना सोबत घेऊन जाण्यासाठी तटस्थपणे वाद मिटविण्याचाच प्रयत्न नेत्याला करावा लागतो. नेत्याकडून उत्तम तोडगा काढल्यास संघटनेतील कार्ये पूर्ववत होण्यास मदत होते.

**(8) अपयशाचा पिता**

नेत्याला एक वेगळे कार्यही करावे लागते. ते म्हणजे अपयशाची, चुकीची जबाबदारी घ्यावी लागते. "यशाचे हजारो बाप असतात, पण अपयश अनाथ असते," असे म्हटले जाते. संघटनेतील यशावर सर्व श्रेयवादी भूमिका घेतात पण एखाद्या कार्यात अपयश आले तर त्याचे खापर नेतृत्वावर फोडले जाते. अशावेळी नेतृत्वाने अपयशाचे पालकत्व स्वीकारत त्यातून धडा घेण्याचे व पुढील दिशा निश्चित करण्याचे कार्य ठामपणे करणे आवश्यक असते.

**(9) नेतृत्व टिकविणे**

अमेरिकेतील ओहियो राज्याच्या विद्यापीठात एक संशोधन करण्यात आले. त्यात नेतृत्वाचे एक कार्य स्पष्ट करण्यात आले ते म्हणजे, स्वतःचे नेतृत्व टिकवणे होय. अनुयायांशी परस्परसंबंध वाढविणे, लोकांकडून सातत्याने मान्यता मिळविणे, आपल्याला पर्याय निर्माण न होवू देणे ही कार्ये नेतृत्व टिकविण्यासाठी नेतृत्वाला करावी लागतात.

**(10) मूल्यांकनाची कार्ये**

नेतृत्वाने राजकीय संघटनेच्या सभासदांच्या कार्यांचे वेळोवेळी मूल्यांकन केले पाहिजे. एखादा व्यक्ती ज्या पदावर काम करतो त्याचे कार्य कसे चालू आहे ? की त्याला इतर पदावर नेमल्यास उत्तम कार्य करू शकेल याचे निरीक्षण, परीक्षण नेतृत्वाने करायचे असते. तसेच उत्तम कार्यकर्त्याला प्रबलन देवून त्याची बढतीही नेत्याने केली पाहिजे. मूल्यांकनामुळे संघटनेच्या कार्यात गुणात्मक वाढ होते.

नेतृत्वाला याशिवाय काही आपातकालीन कार्येही करावी लागतात. नेतृत्वाची कार्यशैली ही स्वतंत्र असली पाहिजे म्हणजे त्याचा प्रभाव अमीट राहतो.

# ४ राजकीय पक्ष

पक्षविरहीत राजकीय व्यवस्था जगातील कोणत्याच राष्ट्रात दिसत नाही. पक्षविरहीत राजकारणाचा विचार महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय, जयप्रकाश नारायण यांनी मांडला असला तरी प्रत्यक्षात असा विचार वास्तवात उतरणे अशक्यच आहे. राजकीय पक्ष हे आधुनिक राजकीय व्यवस्थेचा व प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. म्हणून तर लॉर्ड ब्राईस हा विचारवंत म्हणतो की, "राजकीय पक्ष हे अपरिहार्य आहेत. पक्ष नाही असा कोणताही देश नाही. पक्षाशिवाय प्रातिनिधिक शासनसंस्था कशी कार्य करू शकेल, हे कोणीही दाखवून दिलेले नाही." त्यामुळे पक्षविरहीत व्यवस्था हे निव्वळ स्वप्नरंजनच आहे. राजकीय पक्षांच्या बाबतीत इंग्रजीत एक म्हणच आहे ती म्हणजे, 'Party is King.' लोकशाही शासनव्यवस्थेत तर राजकीय पक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. समुद्रावर जितक्या लाटा नैसर्गिक मानल्या जातात तितकेच लोकशाहीत राजकीय पक्ष स्वाभाविक मानले जातात. म्हणूनच मुन्रो म्हणतो की, "स्वतंत्र राजकीय पक्ष हे लोकशाहीचे दुसरे नाव आहे."

### पक्ष शब्दाची उत्पत्ती व अर्थ

'Party' या इंग्रजी शब्दाला मराठीत 'पक्ष' असे म्हणतात. Party हा इंग्रजी शब्द मुळात लॅटीन भाषेतील Partire या शब्दापासून तयार झाला आहे. लॅटीन भाषेतील शब्दाचा अर्थ विभाजन किंवा 'भाग' होतो. त्यातील

Part हा शब्द 'भाग' अर्थानेच वापरला जातो. संपूर्ण व्यवस्थेचा भाग असणारा व इतरांना सहभागी करून घेणारा गट म्हणजे पक्ष होय, असे शब्दोत्पत्तीनुसार म्हणता येते. राजकीय पक्षासंबधीचे पहिले लिखाण इ.स. १८ व्या सर ह्युम बर्क या विचारवंताने केले. बोलिंग ब्रोक यानेही १८ व्या शतकातच राजकीय पक्षासंबंधी लेखन केलेले आढळते.

**राजकीय पक्षाच्या व्याख्या**

**गिलख्रिस्त च्या मते,** "राजकीय पक्ष म्हणजे विशिष्ट राजकीय विचारसरणी असलेला, राज्यकारभारात सक्रीय भाग घेणारा, सरकारवर नियंत्रण ठेवू इच्छिणारा व स्वतःचे उद्देश साध्य करण्यासाठी सत्तेवर येऊ इच्छिणारा नागरिकांचा संघ किंवा समूह होय."

**एडमंड बर्क च्या मते,** "राजकीय तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मतैक्य असलेला व संघटित रितीने राष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक करणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय."

**लिकॉक च्या मते,** "राजकीय पक्ष म्हणजे राजकीय घटक, यादृष्टीने काम करणारा आणि कमी - अधिक प्रमाणात संघटित असलेला नागरिकांचा समूह होय."

**रिग्ज च्या मते,** "विधिमंडळातील सभासदत्वासाठी होणाऱ्या निवडणूकांसाठी उमेदवार उभी करणारी संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय."

**गेटेल च्या मते,** "अधिक व्यापक व समावेशक स्वरूपात लोकमत तयार करून शासकीय पातळीवर ते प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करणारा गट म्हणजे राजकीय पक्ष होय."

**मदन गोपाल गुप्ता च्या मते,** "राजकीय पक्ष संघटित सहकार्याचे नाव आहे."

**लॉस्वेल व काप्लान च्या मते,** "सर्वसमावेशक धोरणे तयार करणारा व निवडणूकीत उमेदवार उभे करणारा गट म्हणजे राजकीय पक्ष होय."

**सिग्मंड न्यूमन च्या मते,** "भिन्न मते धारण करणाऱ्या दुसऱ्या गटांशी स्पर्धा करून शासकीय सत्तेवर स्वतःचे नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी राजकीयदृष्ट्या क्रियाशील असणारा व्यक्तींचा गट म्हणजे राजकीय पक्ष होय."

**मॅकआयव्हर च्या मते,** "राजकीय पक्ष म्हणजे एखाद्या विशिष्ट तत्त्वाला व उद्दिष्टाला पाठिंबा देण्यासाठी संघटित झालेली संस्था जी संवैधानिक मार्गाने शासनाचा आधार बनू इच्छिते."

**जोसेफ शुंपीटर च्या मते,** "सत्ता प्राप्त करण्यासाठी आणि मिळालेली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी तथा इतरांवर प्रभाव पाडण्यासाठी संघटित झालेला लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय."

**राजकीय पक्षाचा अर्थ**

सर्व व्याख्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यातून राजकीय पक्षाचा अर्थ स्पष्ट होतो. या अर्थाला पुढील मुद्यांतून मांडता येते.

१) राजकीय पक्ष हा लोकांचा समूह असतो.

२) राजकीय पक्षातील सदस्य विशिष्ट तत्त्व व विचारसरणीने एकत्रित आलेले व बांधलेले असतात.

३) राजकीय पक्ष राजकीय सत्ता हस्तगत करून आपल्या पक्षाच्या तत्त्वज्ञानानुसार व धोरणानुसार लोककल्याण करण्याचा प्रयत्न करतात.

४) निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय सत्तेची प्राप्ती राजकीय पक्ष करतात. त्यासाठी इतरांशी स्पर्धा करतात.

५) राजकीय पक्षांचा सनदशीर मार्गावर विश्वास असतो.

६) राजकीय पक्षांसाठी आपले हितसंबंध महत्त्वाचे असतात.

अशा प्रकारे राजकीय पक्ष ही संकल्पना स्पष्ट करता येते.

**राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये**

राजकीय गट हे तसे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात असलेले दिसतात. मात्र त्या पूर्वीच्या गटाचे स्वरूप आजच्या आधुनिक राजकीय पक्षाप्रमाणे निश्चितच नव्हते. लोकशाही जीवनशैली नसलेल्या समाजात राजकीय गटांना मर्यादेतच राहावे लागत असे. परंतु आधुनिक काळात राजकीय पक्षांनी संपूर्ण समाजजीवन व्यापून टाकले आहे. राजकारणाची कल्पना तर राजकीय पक्षाशिवाय करताच येत नाही. त्यामुळे तर एस. न्यूमन हा विचारवंत म्हणतो की, ''राजकीय पक्ष आधुनिक राजकारणाचे आधारस्तंभ आहेत.'' अशा राजकीय पक्षांची वैशिष्ट्ये जाणून घेतल्याशिवाय राजकारणाचे यथायोग्य विश्लेषण शक्यच नाही. राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे पाहता येतात.

**(१) सत्ताप्राप्तीची अभिलाषा**

राजकीय पक्षाची निर्मितीच मुळात सत्ता प्राप्त करण्यासाठीच झालेली असते. सत्ता प्राप्तीची शर्यत कोणत्याही परिस्थितीत जिंकण्यासाठीच राजकीय पक्षात स्पर्धा सुरू असते. सत्ताविहीन राजकारण ही राजकीय पक्षाची वृत्ती असूच शकत नाही. ती दबावगटाची असते. सत्ताप्राप्तीचे ध्येय समोर ठेवून निवडणूकांचे व्यवस्थापन करण्यास राजकीय पक्ष अग्रक्रम देतात. राजकीय कार्यक्रम, विचारसरणी, निवडणूक घोषणा हे सर्व सत्ताप्राप्तीसाठीच केले जाते. सत्तेभोवती राजकीय पक्ष फिरत असतात म्हणूनच इंग्लंडच्या महिला प्रधानमंत्री मार्गारेट थ्रेचर म्हणतात की, ''प्रत्येक राजकीय पक्षाची ही मुख्य अभिलाषा असते की, तो सत्तेमध्ये यावा.''

**(२) संघटित समूह**

राजकीय पक्ष हा संघटित समूह असतो. यातील सर्व सदस्य हे पक्षशिस्तीने बांधलेले असतात. पक्षाकडून दिलेल्या निर्देशांना पाळणे व आपले वर्तन पक्षाभिमुख ठेवणे हे राजकीय पक्षाच्या सदस्यांचे कर्तव्य मानले जाते. राजकीय पक्षाचे सदस्य हे एका समान उद्देशपूर्तीसाठी प्रयत्नशील असतात.

**(३) मूलतत्त्वांची एकता**

प्रत्येक राजकीय पक्ष काही मूलतत्त्वावर आधारलेला असतो. हे आवश्यक मानले जाते की, राजकीय पक्षातील सर्व सदस्यात त्या मूलतत्त्वांबद्दल व विचारांबद्दल एकमत असले पाहिजे. पक्षांतर्गत मूलतत्त्वावर सर्वांचा विश्वास असेल व त्या सिध्दांतांची दिशा घेवून जर प्रत्येकजण मार्गक्रमण असेल तर राजकीय पक्षाचे मजबुतीकरण होते. पक्ष सदस्यात परस्परसंबंध दृढ करण्यासाठीही पक्षाची मूलतत्त्वे उपयोगी पडतात.

**(४) सनदशीर मार्गांवर विश्वास**

प्रत्येक राजकीय पक्षाची ध्येय - धोरणे व विचारसरणी भिन्न - भिन्न असू शकतात. परंतु आपल्या राजकीय ध्येयाला प्राप्त करण्यासाठी राजकीय पक्ष असनदशीर म्हणजेच घटनाबाह्य साधनांचा वापर करीत नाहीत. राज्यघटनेने निर्धारित केलेला मार्गच चालण्याचा निर्धार राजकीय पक्षांचा असतो. मतदान व निवडणूका यावर विश्वास ठेवून आपले राजकीय कार्य पक्ष करत असतात. आपल्या ध्येय प्राप्तीसाठी गुप्त कारवाया किंवा सशस्त्र क्रांती करणारे राजकीय पक्ष नसतात. सत्तेचा जन्म बंदुकीच्या नळीतून नाही तर लोकांच्या मनातून होतो, ही धारणा राजकीय पक्षाची असते.

**(५) राष्ट्रीय हिताचे संवर्धन**

राजकीय पक्षासाठी हे महत्त्वपूर्ण मानावे लागते की, त्यांनी धर्म, जात, वर्ग, प्रदेश, भाषा यासारख्या संकुचित निष्ठांना प्राधान्य न देता समग्र राष्ट्रीय हिताचा विचार केला पाहिजे. राष्ट्रवादाचा पुरस्कार करून राष्ट्रउन्नतीसाठी प्रत्येक राजकीय पक्ष प्रयत्नशील असतो. सत्ताधारी पक्ष असो वा विरोधी पक्ष दोन्हीही राष्ट्रहितासाठीच कटिबध्द असतात. एकमेकांना विरोध हा ही राष्ट्रहितासाठीच केला जातो. एडमंड बर्क या अनुषंगाने म्हणतो की, ''राजकीय पक्ष राष्ट्रीय हितासाठी संघटित झालेले राजकीय समुदाय असतात.''

**(६) सर्वसमावेशक**

राजकीय पक्ष हे सर्वसमावेशक असतात. समाजातील सर्व घटकांना आपल्या सोबत समाविष्ट करून प्रत्येक घटकाचे हितसंबंध लक्षात घेवून त्याचे संरक्षण करण्याची भूमिका राजकीय पक्ष घेतात. समाजातील परस्परविरोधी गटांना सांधण्याचे व त्यांना एका सूत्रात बांधून एका छत्राखाली आणतात ते राजकीय पक्ष. कोणत्याच व्यक्ती व घटकाबद्दल पूर्वग्रह न ठेवता ज्याला राजकीय पक्षाची विचारसरणी मान्य आहे, अशा प्रत्येकाला सामावून घेण्यासाठी राजकीय पक्ष तत्पर असलेले दिसतात.

**(७) पक्षीय अस्मिता**

राजकीय पक्षाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक राजकीय पक्ष आपली स्वतंत्र अस्मिता (ओळख) जपण्याचा प्रयत्न करत असतो. पक्षाची विचारसरणी, निवडणूक चिन्ह, ध्वज, नेतृत्व, स्वीकारलेली प्रतिके यातून ही अस्मिता निर्माण होते. या अस्मितेवरच एक राजकीय पक्ष दुसऱ्या पक्षापेक्षा वेगळा ठरतो. पक्षीय अस्मिता हीच लोकांवर प्रभाव टाकण्याचे एक माध्यम मानले जाते व लोकमत मिळविण्याचेही पक्षीय अस्मितेला छेद जाणार नाही याकडे प्रत्येक राजकीय पक्ष विशेष लक्ष देतात.

अशाप्रकारे राजकीय पक्षांची वैशिष्ट्ये नमूद करता येतात.

**राजकीय पक्षाची कार्ये / भूमिका**

प्रत्येक राजकीय व्यवस्थेत पक्षांची कार्ये किंवा भूमिका कमी - अधिक प्रमाणात परिवर्तनशील असली तरी राजकीय पक्ष स्थल - काल व शासन परत्वे काही समांतर कार्ये करत असतात. ही कार्ये राजकीय पक्ष म्हणून एक वा अनेक पक्ष त्याच पध्दतीने पार पाडतात. लोकशाही व हुकुमशाही या दोन्ही प्रकारच्या शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांचे कार्य त्याच साच्यात

चालत असते. म्हणून लॉवेल हा विचारवंत म्हणतो की, ‘‘सर्व लोकांचे सरकार म्हणजे लोकशाही ही केवळ कल्पनाच असते. शेवटी सरकार हे बहुमतवाल्या पक्षाचेच असते. हुकुमशाहीत एका पक्षाची हुकुमशाही असते.’’ राजकीय पक्षांच्या कार्यातील समान सूत्र लक्षात घेवून कार्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येतो.

**(१) पक्ष प्रचार व प्रसार**

राजकीय पक्षाची स्थापना करणे व त्याचे नेतृत्व उदात्त असणे इतकेच राजकीय पक्षासाठी पुरेसे असत नाही. राजकीय पक्षाला जनमाणसापर्यंत घेवून जाणे आणि राजकीय पक्ष लोकप्रिय बनविणे हे प्र-प्रथम कार्य राजकीय पक्षाला करावे लागते. उत्तम कार्यक्रम व घोषणांचा तेव्हाच उपयोग होतो जेव्हा राजकीय पक्षाला जनपाठिंबा मिळतो. प्रसिध्दीतंत्रांचा वापर करून राजकीय पक्षाला देशाच्या कोनाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी कृती कार्यक्रम राजकीय पक्ष आखतात. राजकीय पक्षासंबंधी प्राथमिक माहिती तरी सामान्य लोकांना असली पाहिजे तरच राजकारणाची गणिते मांडता येतात. म्हणून राजकीय पक्षाचे एक प्रमुख व पहिले कार्य असते की, पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह, कार्यक्रम, विचारसरणी, नेतृत्व यांचा प्रचार व प्रसार करणे. आपल्या राजकीय पक्षाचीच विचारधारा कशी श्रेष्ठ आहे याचाही प्रचार राजकीय पक्षांना करावा लागतो. म्हणून तर लॉवेल म्हणतो की, ‘‘राजकीय पक्ष हे विचारांचे दलाल असतात.’’

राजकीय पक्षाच्या प्रचार व प्रसाराचे कार्य जितके उत्तम तितका पक्ष मोठा आणि लोकप्रिय हे समीकरणच असते.

**(२) राजकीय भरतीचे कार्य**

राजकीय पक्ष हा कार्यकर्त्यांनीच तयार होतो व मजबूत बनतो. पक्ष संघटना ही जाळे विणल्यासारखी विणावीच लागते. उत्तम, निष्ठावान, कार्यक्षम कार्यकर्त्यांना पक्षात आणण्यासाठी राजकीय पक्षांना कार्य करावेच लागते.

कधी निवडीच्या माध्यमातून तर कधी स्वेच्छेने सदस्य होण्यासाठी आवाहन करून राजकीय पक्ष कार्यकर्त्यांची पक्षात भरती करतात. कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्षाची प्रतिमा उंचावत असते. म्हणून कार्यकर्ता भरतीचे कार्य राजकीय पक्ष काळजीने करतात.

कार्यकर्त्यांचा खूप मोठा वर्ग असतो त्यातून ज्या कार्यकर्त्यांची क्षमता उत्तम आहे आणि जे पक्ष वाढीसाठी पुरक ठरू शकतात अशा निवडक कार्यकर्त्यांना राजकीय पक्ष संघटनेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, संघटक, महिला प्रमुख, प्रचार प्रमुख अशी पदे बहाल करते. याशिवाय विद्यार्थी, महिला, कामगार, उद्योजक, व्यापारी, शेतकरी, ॲटो, मनोरंजन अशा क्षेत्राशी निगडीत आघाड्या तयार करून कार्यकर्त्यांच्या समावेशनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे कार्य पक्ष करतात. यामुळे राजकीय पक्षाचा परीघ वाढत जातो.

राजकीय भारतीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष अजून एक कार्य करतात हे म्हणजे निवडणूका लढविण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यातून योग्य उमेदवाराची निवड करून त्याला निवडून आणण्यासाठी राजकीय पक्ष पूर्ण ताकद लावते. निवडून आलेल्या उमेदवारातून पुढे विधिमंडळात गटनेता नेमण्याची भूमिकाही राजकीय पक्षालाच पार पाडावी लागते. याशिवाय सरकार स्थापन करण्याची संधी मिळाल्यास कार्यकारी मंडळातील (मंत्रिमंडळ) सदस्यांची निवडही राजकीय पक्षाद्वारेच होते. भारत, अमेरिका, रशिया या देशात पक्षीय राजकारणाद्वारेच कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाचे निर्माण होते.

**३) राजकीय सामाजिकीकरण**

लोकांची राजकीय मानसिकता तयार करणे, राजकीय व्यवस्थेचे व प्रक्रियेचे ज्ञान सामान्यांना करून देणे, राजकीय जागृती निर्माण व्हावी यासाठी राजकीय शिक्षण देणे, लोकांमध्ये राजकीय मूल्ये रूजविणे, राज्यघटनेचे तत्त्वज्ञान व उद्देश लोकांपर्यंत पोहचविणे अशी विविध कार्ये राजकीय पक्ष करत असतात.

ही कार्ये म्हणजेच राजकीय सामाजिकीकरण होय. राजकीय पक्ष सदासर्वकाळ राजकारण करत असल्यामुळे त्यांना राजकीय प्रक्रियेशी अतुट नाते प्रस्थापित करावेच लागते. परंतु केवळ पक्षा - पक्षांमध्ये सत्तास्पर्धा करून किंवा टीका करून राजकीय हेतू साध्य होवू शकत नाहीत. लोकांना राजकीय प्रक्रियेशी व व्यवस्थेशी जोडून त्यांचे राजकीय शहाणपण वाढवितात. राजकीय सामाजिकीकरण करण्याचे कारण म्हणजे लोकात राजकीय जागृती व चेतना निर्माण झाली तरच ते राजकीय पक्षाच्या भूमिकेला समजू शकतील आणि राजकीय पक्षाला आपल्या बाजूने लोकमत संघटित करणे सहज शक्य होईल. थोडक्यात राजकीय सामाजिकीकरणाचे कार्य करून राजकीय पक्ष समाज संधारणाचे व सामर्थ्य संपादनाचेच कार्य करत असतात.

**४) समस्यांचे वहन**

सामान्य माणसांना राजकीय, आर्थिक, सामाजिक समस्यांचे आकलन तितक्या प्रमाणात नसते. या समस्यांना समजून घेवून त्याच्या सोडवणूकीसाठी राजकीय पक्ष पुढाकार घेतात. पक्षाचे कार्यकर्ते समाजघटकांशी संबंधित असतात. ते लोकांच्या मागण्या समजत असतात. मागण्या अनेकविध असतात परंतु त्या मागण्यातून योग्य मागण्यांचे सूसूत्रीकरण करून त्या राजकीय व्यवस्थेपर्यंत पोहचविण्याचे कार्य राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडूनच होते. आपल्या राजकीय अनुभवाचा व राजकीय शक्तीचा वापर करून समस्यांना राजकीय संरचनेपर्यंत पोहचविण्याचे कार्य राजकीय पक्षाकडून केले जात असल्यामुळे त्यांना 'समस्यांचे वाहक' अशी उपमा देता येते.

**(५) जनता व शासनातील दुवा**

राजकीय पक्ष हे लोकांच्या मागण्या (आदान) शासनासमोर विधिमंडळ पटलावर किंवा मंत्रीस्तरावर किंवा प्रशासकीय स्तरावर स्पष्टपणे मांडत असतात. शासनाच्या योजना व कार्यक्रम लोकांपर्यत पोहंचविणे, सरकारच्या योजनांचा

लाभ लोकांना मिळावा यासाठी राजकीय व्यवस्थापन करणे, यागोष्टी राजकीय पक्ष करत असतात. लोक व शासन यांच्यात मध्यस्थ म्हणून पक्षांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. ही भूमिका प्रामुख्याने सत्ताधारी राजकीय पक्षांकडून वठविली जाते. तर विरोधी पक्ष जे असतात ते सरकारने चुकीचे घेतलेले निर्णय, योजनांची सदोष अंमलबजावणी, सरकारी भ्रष्टाचार याबद्दल आवाज उठविण्याचे व सरकारच्या लोकविरोधी भूमिकांवर टीका करण्याचे कार्य करते. विरोधी राजकीय पक्ष सरकारच्या दोषांना लोकांपर्यंत पोहंचवून लोकमत तयार करण्याचे कार्य करते. राजकीय पक्षांची ही दुहेरी भूमिका अंतिमतः जनता व सरकार यांना जोडण्यासाठी उपयुक्तच ठरते.

**(६) निवडणूकविषयक कार्ये**

डॉ. फायनर यांच्या मते, ''राजकीय पक्षाशिवाय निवडणूका एक तर कुचकामी ठरतील किंवा त्यांच्याद्वारे अशक्य धोरणांना स्विकारून राजकीय प्रक्रियेलाच संपुष्टात आणले जाईल.'' निवडणूका व राजकीय पक्ष यांचा परस्परसंबंध खूपच दृढ आहे. प्रौढमताधिकाराचा स्वीकार केल्यानंतर निवडणूकीतील राजकीय पक्षाच्या भूमिकेला केंद्रीय स्थान प्राप्त झाले. राष्ट्रीय पातळीवरील निवडणूकापासून स्थानिक निवडणूकांपर्यंत राजकीय पक्ष निवडणूकीत सहभाग नोंदवत असतात. राजकीय पक्षांकडून प्रत्येक निवडणूकीची पूर्वतयारी केली जाते. निवडणूकीत उमेदवार उभे करणे, प्रचार मोहीम राबविणे, मतदान जास्तीत जास्त व्हावे यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे, आपला उमेदवार निवडून आणणे, या सर्व बाबींना व्यवस्थित व वेळेवर करण्याला राजकीय पक्ष प्राधान्य देतात. केवळ निवडणूका लढविणे हेच उद्दिष्ट राजकीय पक्षांचे असत नाही तर त्या जिंकणे यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जातात. प्रत्येक राजकीय पक्षाचे भवितव्य हे निवडणूकाद्वारेच निश्चित होत असते. म्हणून निवडणूकीच्या काळात राजकीय पक्ष खूप सक्रीय होतात. हुकुमशाही किंवा साम्यवादी राजवटीत

जो राजकीय पक्ष असतो, तो केवळ दिखाव्यासाठी निवडणूकात सहभाग घेतो कारण एकच पक्ष असल्यामुळे सत्ता निर्विवाद त्याच्याकडेच असणार असते. निवडणूकीचे फक्त सोपस्कार पूर्ण केले जातात. लोकशाहीमध्ये मात्र राजकीय पक्षांना निवडणूकीत तारेवरची कसरत करावी लागते. कारण केवळ उमेदवार उभे करून काम संपत नसते तर पक्ष यंत्रना व्यवस्थित संचालित करून, डावपेच आखून विजयापर्यंतची घोडदौड करत असताना आर्थिक गणितेही घालावी लागतातच. केवळ कार्यक्रम विचारसरणी व नेतृत्वाचा करिष्मा यावर निवडणूका जिंकण्याचे दिवस इतिहासजमा झाले आहेत.

**(७) नेतृत्वाची प्रतिमा उंचावणे**

निवडणूका लढविण्या इतकेच महत्त्वाचे कार्य म्हणजे राजकीय पक्षांना आपल्या नेतृत्वाची प्रतिमा लोकांमध्ये उंच करावी लागते आपल्या राजकीय पक्षाचे नेतृत्व हे कसे महान, त्यागी, वैचारिक, जाणकार, लोकहितवादी व राष्ट्रप्रेमी आहे हे वारंवार पक्षांकडून पटवून दिले जाते याचे कारण म्हणजे लोक विभूती प्रतिमांचे चाहते असतात. व्यक्तीच्या प्रेमात पडलेल्या लोकांना विचारसरणी, कार्यक्रम व योजना यांचे फारसे देणे - घेणे असत नाही. इटालीत फॅसिस्ट पक्षाने 'मुसोलिनी कधीच चुकत नाही,' या वाक्याला लोकांच्या मनावर इतके बिंबवले की, लोक मुसोलिनीचे अंधभक्त झाले. लोकशाहीत नेतृत्वाची प्रतिमा उंचाविण्याचे कार्य राजकीय पक्ष सर्रासपणे करताना दिसतात. भारतात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांची प्रतिमा उंचावली तर भारतीय जनता पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांचे व्यक्तीमहात्म्य प्रसारित केले. शिवसेना-बाळासाहेब ठाकरे, अण्णा द्रमुक-जयललिता अशी कितीतरी उदाहरणे देता येतात. नेतृत्वाच्या प्रतिमांचे उंच होणे म्हणजे निवडणूकात यश मिळविणे होय, असे समीकरण असते.

## (८) विधिमंडळ व कार्यकारी मंडळात समन्वय प्रस्थापणे

सत्तेत गेलेला राजकीय पक्ष एक वेगळे कार्य बजावत असतो ते म्हणजे विधिमंडळात जे सदस्य असतात त्यांच्यात व कार्यकारी मंडळात (मंत्रिमंडळात) जे आपल्या पक्षाचेच सदस्य मंत्री झालेले असतात. त्यांच्यात समन्वय प्रस्थापित करण्याची भूमिका राजकीय पक्षाला वठवावी लागते. विधिमंडळातील पक्षाचे सर्व सदस्य मंत्री होवू शकत नसतात त्यामुळे असंतुष्टीची दलदल तयार होण्याची शक्यता असते. याला वेळीच पायबंद घालणे गरजेचे असते. म्हणून राजकीय पक्षाकडून विधिमंडळ व कार्यकारी मंडळाच्या सदस्यात समन्वय प्रस्थापित करण्यास महत्त्व दिले जाते. अध्यक्षीय लोकशाही शासनपध्दतीत सत्ताविभाजनाचे तत्त्व काटेकोर पाळले जात असल्यामुळे विधिमंडळाचे सदस्य व कार्यकारी मंडळाचे सदस्य भिन्न - भिन्न असतात. त्यामुळे याठिकाणी असे कार्य करणे आवश्यकच नसते. परंतु संसदीय लोकशाही पध्दतीत विधिमंडळाच्या सदस्यातूनच कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवड होत असल्यामुळे या दोन्ही मंडळातील आपल्या पक्षाच्या सदस्यात सामंजस्य व सहकार्य प्रस्थापित करणे राजकीय पक्षाचेच कार्य असते.

## (९) शासनाचे संचालन करणे

लोकशाही, हुकुमशाही, साम्यवादी अशा कोणत्याही राजकीय व्यवस्थेत शासनाचे संचालन करण्याची जबाबदारी राजकीय पक्षावरच असते. लोकशाहीत बहुमतवाला पक्ष शासनाची सूत्रे स्विकारतो तर साम्यवादी शासनपध्दतीत एकच कम्युनिस्ट पक्ष सत्ता नियंत्रित करतो. हुकुमशाहीत तर एकाच राजकीय पक्षाची सरकारवर मक्तेदारी असते. शासनाचे संचालन करताना आपल्या निवडून आलेल्या योग्य व्यक्तींची मंत्री म्हणून नेमणूक करणे, निवडणूकीत लोकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे, राजकीय संरचनेत क्रियाशीलता निर्माण करणे, प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे, ही कार्य शासन करणाऱ्या राजकीय

पक्षाला करावी लागतात. मॅरियटच्या मते, ''सत्तारूढ पक्षाचे कार्य पदाधिकाऱ्यांची निवड करणे, सार्वजनिक धोरण निश्चित करणे, सरकारचे संचालन करणे, वेळ पडल्यास किंवा आवश्यक वाटल्यास त्यावर टीका करणे तसेच साधारण नागरिक आणि सरकार यांच्यात मध्यस्थ म्हणून कार्य करणे हे असते.''

**(१०) विरोधी पक्ष म्हणून भूमिका**

हुकुमशाहीत व साम्यवादी राजवटीत विरोधी पक्ष अस्तित्वातच नसतो. विरोधी पक्ष असतो तो, लोकशाहीत. बहुमत प्राप्त करून जो शासनाचे संचालन करतो तो सत्ताधारी पक्ष असतो पण जो अल्पमतात आहे त्याला विरोधी पक्ष म्हणूनच भूमिका वठवावी लागते. लोकशाहीत विरोधी पक्षाला 'प्रतिछाया मंत्रिमंडळ' संबोधतात. सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्ष गरजेचा असतो. विरोधातून विकास हे विरोधी पक्षाचे धोरण असते. सत्तारूढ पक्षाला जाब विचारून, शासनाच्या चुकीच्या धोरणावर टीका करण्याचे कार्य विरोधी पक्ष करतो. सत्तारूढ पक्षाला विरोधी पक्षाच्या सूचनेकडे लक्ष द्यावेच लागते. विरोधी पक्ष हा विधिमंडळात लक्षवेधी, स्थगन प्रस्ताव, कामकाजावर बहिष्कार, प्रश्न विचारणे, अविश्वासाचा ठराव मांडणे आदि संसदीय आयुधांचा वापर करून सरकारवर अंकुश ठेवते. तर सभागृहाबाहेर लोकांचे प्रबोधन करत व लोकांना जागृत करत सनदशीर आंदोलन करून सरकारला चांगले कार्य करण्यासाठी दबाव निर्माण करतो.

**(११) लोकमत निर्माण करणे**

आधुनिक काळात राज्याच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत. लोकमत निर्माण होण्यात अनेक मार्गाने अडचणी निर्माण होत आहेत. मूलभूत प्रश्नापासून दिशाभूल व्हावी यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत. अशा स्थितीत लोकमताला योग्य दिशा देण्याचे कार्य राजकीय पक्षाला पार पाडावे लागते. उथळ व एकांगी लोकमत अराजकतेला निमंत्रण असते. म्हणून

लोकमतास आकार देण्यासाठी राजकीय पक्ष पुढाकार घेतात. संवैधानिक मूल्य हा लोकमताचा आधार असावा या दृष्टीने पाऊल उचलतात. मॅकआयव्हर यासंदर्भात म्हणतो की, ‘‘राजकीय पक्ष एक साधन आहे ज्याद्वारे सार्वजनिक मताला सार्वजनिक धोरणात रूपांतरित केले जाते.’’

अशाप्रकारे राजकीय पक्ष व्यापक कार्ये करतात. मॅक्रेडीस व वार्ड हे विचारवंत म्हणतात की, ‘‘राजकीय पक्ष एक आगगाडी आहे. मागण्या व पाठिंबा ही तिची अश्वशक्ती (Horse Power) आहे. त्यातून निघणाऱ्या वाफेवरच राजकीय पक्षाच्या कार्याला चालना मिळते आणि ही आगगाडी आपला पुढील प्रवास करते.’’

**राजकीय पक्षाची रचना**

विखुरलेल्या समाज घटकांना एक संघटित रूप देण्याचा प्रयत्न राजकीय पक्षाच्या माध्यमातून होत असतो. फक्त हुकुमशाही व साम्यवादी देशात एकच पक्ष असतो. इतर कोणत्याही देशामध्ये एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष असतात. राजकीय पक्षांची संस्था देशपरत्वे भिन्न असते तसेच राजकीय पक्षांची रचनाही सर्व ठिकाणी सारखी असेलच असे नाही. मात्र रचनेतील किमान स्तर प्रत्येक राजकीय पक्षात आढळून येतातच त्या सामायिक घटकांचा व स्तरांचा पक्षाच्या रचनेच्या अनुषंगाने विचार करता येईल. मॉरीस दुवर्जर याने आपल्या ‘Political Parties’ या ग्रंथात राजकीय पक्षाची रचना किंवा संरचना स्पष्ट केली आहे. ही रचना एखाद्या मनोऱ्यासारखी आहे. दुवर्जर प्रणित राजकीय पक्षाच्या रचनेचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

**(१) अंतर्वर्तुळातील सूत्रधार (Caucus)**

राजकीय पक्षाच्या सर्वश्रेष्ठस्थानी पक्षनियंत्रक, पक्षसत्ता असणारा अंतर्वर्तुळातील सूत्रधारांचा गट असतो. हा गट सर्वोच्च असतो आणि संख्येने कमीही असतो. पक्षकार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या निष्ठावान व्यक्तींचीच

निवड या समितीत केली जाते. सूत्रधारांच्या हाती पक्षाची मोठी सत्ता असते. निवडणूक काळात सूत्रधारांना अधिक कार्य करावे लागते. हा गट पक्षश्रेष्ठींचा असतो.

अंतर्वर्तुळातील सूत्रधार दोन प्रकारचे असतात.

**अ) प्रत्यक्ष सूत्रधार :-** या सूत्रधारांची निवड गुण व प्रभाव या आधारावर केली जाते. हे कोणाचेही प्रतिनिधी नसतात किंवा समाजातील कोणत्याही हितसंबंधाची पाठराखण प्रत्यक्ष सूत्रधार करत नसतात.

**ब) अप्रत्यक्ष सूत्रधार :-** हे सूत्रधार कोणत्यातरी हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे असतात. उदा. व्यापारी, कायदेपंडित, जमीनदार, उद्योजक इत्यादी. थोडक्यात राजकीय पक्षाशी संबंधित असणाऱ्या विविध संघटना व दबावगटाचे प्रतिनिधी अप्रत्यक्ष सूत्रधार असतात. निवडणूका जिंकण्यासाठी व त्याबाबतचे डावपेच आखण्यासाठी या सूत्रधारांचा उपयोग होत असतो.

**(२) पक्षशाखा (Branch)**

पक्षशाखा हा राजकीय पक्षाच्या रचनेतील एक महत्त्वाचा घटक. पक्ष शाखा व्याप्तीने व संख्येने मोठ्या असतात. पक्ष शाखांमध्ये सर्वांना मुक्त प्रवेश असतो. दरवर्षी पक्ष शाखेतील सदस्यांची संख्या वाढविण्यासाठी राजकीय पक्ष विशेष मोहीम आखतात. पक्षाचे प्राथमिक सदस्यत्त्व मिळविण्यासाठी काही नियम प्रत्येक पक्ष वेगवेगळ्या स्वरूपात तयार करतात. पक्ष शाखांचा अधिकाधिक विस्तार करण्यामागे बहुसंख्य लोकांना पक्षाशी जोडणे हा मूळ उद्देश असतो. निवडणूक प्रसंगी लोक संपर्कासाठी या शाखांचा उत्तम उपयोग होत असतो. निवडणूक निधी उभा करणे, प्रचार करणे, डावपेच आखणे, लोकसंपर्क प्रस्थापित करणे आणि निवडणूकीचे मतदान ज्यादिवशी आहे त्यादिवशीचे मतदान केंद्राबाहेरील व्यवस्थापन पक्ष शाखांद्वारेच लावले जाते. पक्षशाखा उत्तमपणे क्रियाशील रहाव्यात यासाठी राजकीय पक्षांकडून त्यांचे मेळावे,

प्रशिक्षण शिबीरे आयोजित केली जातात. पक्षशाखांची मजबूत बांधणी करणारा राजकीय पक्ष प्रबल मानला जातो. पक्षशाखा या भौगोलिक स्वरूपाची रचना आहे.

**(३) पक्ष कोश (Cell)**

क्रांतीकारी समाजवादी पक्षाची निर्मिती म्हणजे पक्ष कोश होय. याचे संघटनात्मक प्रारूप कार्यक्षेत्राशी जोडले गेले आहे. पक्षकोश हा पक्षाच्या गुप्त कारवायाशी संबंधित असतो. पक्ष कोश व्यावसायिक रचना आहे. उदा. कारखान्यातील मजूर संघटना म्हणजे पक्षाचा कोश किंवा महाविद्यालयातील पक्ष पुरस्कृत विद्यार्थी संघटना हा पक्ष कोश होय. पक्षकोश मर्यादित असतात. पक्ष कोशात १०० पेक्षा अधिक सदस्य नसतात. पक्ष कोशातील सदस्य संख्या कमी असल्यामुळे त्यांच्यातील नेत्यांची सदस्यांवर त्वरीत छाप पडते. नियंत्रणाच्यादृष्टीने सुलभ असतात पक्षकोश. मानवी शरीरात जे कार्य पेशींचे असते तेच कार्य राजकीय पक्षात पक्ष कोशाचे असते. पक्षकोशातील सदस्य परस्परांशी संबंधित असतात. नित्य भेटी, विचारविनिमय व एकमेकांच्या अडचणी सोडविणे ही पक्षकोशाची लक्षणे असतात. प्रत्येक व्यवसायात काम करणाऱ्या लोकांचा पक्ष कोश तयार केला जातो.

**(४) पक्ष सैनिक (सक्रीय कार्यकर्ते) (Militia)**

पक्ष रचनेतील शेवटचा परंतु सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे पक्ष सैनिक किंवा पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते होय. प्रत्येक राजकीय पक्षात पक्षकार्यासाठी निष्ठावंत, धडपड करणाऱ्या पूर्णवेळ सक्रीय लढाऊ कार्यकर्त्यांची एक फौजच तयार केली जाते. हिटलर व मुसोलिनीने या पक्ष सैनिकांची शिस्तबध्द बांधणी केली होती. पक्षाचे आदेश शिरसावंद्य मानून प्रत्येक पक्षकार्यात हिरीरीने भाग घेणारा पक्ष सैनिक असतो. पक्षाच्या सभांचे नियोजन लावणे, पक्ष नेतृत्वाला संरक्षण देणे, आपल्या पक्षाच्या ध्येय - धोरणाचा प्रसार करणे ही कार्य पक्ष

सैनिक करत असतात. सर्वच कार्यकर्ते म्हणजे पक्ष सैनिक नव्हेत. जे पक्ष कार्यात झोकून देवून कार्य करतात त्यांनाच पक्षसैनिक म्हटले जाते.

चार घटकातून राजकीय पक्षाची संरचना स्पष्ट करता येते.

## राजकीय पक्षांचे वर्गीकरण

राजकीय पक्षांचे वर्गीकरण निश्चित व काटेकोरपणे करणे तसे कठीण कार्य आहे. कारण राजकीय पक्षात एकाचवेळी अनेक वर्गांचे गुण विद्यमान असू शकतात. त्यामुळे स्पष्ट सीमारेषा ओढून राजकीय पक्षाला विशिष्ट वर्गात समाविष्ट करणे सोपे नाही. तरी देखील राजकीय पक्षांच्या वर्गीकरणासाठी काही निकष आहेत, ज्याद्वारे राजकीय पक्षांचे वर्गीकरण करता येते. हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे.

### (१) लोकसत्तावादी व अधिनायकवादी राजकीय पक्ष

घटनात्मक चौकटीमध्ये राहून जे राजकीय पक्ष राज्यसंस्था व राज्यघटना यांना प्रमाण मानतात त्यांना लोकशाहीत्मक राजकीय पक्ष या वर्गात समाविष्ट केले जाते. लोकसत्तावादी पक्षांचा विश्वास सहअस्तित्व व सहकार्यावर असतो. लोकशाही मार्गाने सत्तास्पर्धा करण्याला महत्त्व देणारे लोकसत्तावादी पक्ष लोकमताचा सन्मान करतात. लोकपाठिंब्यावरच आपले अस्तित्त्व सिध्द करण्याला लोकसत्तावादी पक्ष पसंती देतात. लोकशाही राजवटीत असे पक्ष असतात.

अधिनायकवादी राजकीय पक्ष हे लोकसत्तावादी राजकीय पक्षाच्या एकदम विरूध्द असतात. एका व्यक्तीच्या भोवती फिरणाऱ्या या राजकीय पक्षांना हुकुमशाही राजवटीचे आकर्षण असते. अधिनायकवादी राजकीय पक्ष या धाटणीचे असतात. राज्यसंस्था व राज्यघटनेला दुय्यम मानत दुसऱ्या पक्षाचे अस्तित्त्वच अमान्य करणारे हे पक्ष असतात. इटालीत फॅसिस्ट पक्ष व जर्मनीत नाझी पक्ष या स्वरूपाचे होते. अधिनायकवादी राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या नेतृत्वाच्या मतालाच सर्वस्व मानून मार्गक्रमण करत असतात.

### (२) विचारसरणीप्रधान व व्यवहारवादी पक्ष

विशिष्ट विचारधारेचा पुरस्कार करून आपल्या राजकीय पक्षाचे तत्त्वज्ञान समाजात रूजविण्यासाठी जे राजकीय पक्ष अस्तित्त्वात येतात त्यांना विचारसरणीप्रधान राजकीय पक्ष म्हटले जाते. साम्यवादी पक्ष याचे उत्तम उदाहरण आहे. हिटलरने नाझी पक्षाची रचनात्मक बांधणी विचारप्रणालीला महत्त्व देऊनच केली होती. तात्त्विक बैठकीला व तत्त्वांना महत्त्व देणारे राजकीय पक्ष आपले तत्त्वज्ञान लोकांच्या गळी उतरविण्यासाठी टोकाचे प्रयत्न करतात. यासाठी कोणत्याही साधनाचा वापर करण्याची त्यांची तयारी असते.

व्यवहारवादी पक्ष व्यावहारिक धोरणांचा पुरस्कार करतात. केवळ सत्ता प्राप्त करणे व ती टिकविणे यासाठी वास्तववादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करणे याला अग्रक्रम देणारे हे पक्ष असतात. तत्त्वज्ञानाचा प्रचार - प्रसार याला येथे महत्त्व नसते. प्रसंगी धर्म, जात, प्रदेश यांचा आधार घेवून सत्तेपर्यंत जाणे हे उद्दिष्ट असे पक्ष ठेवतात.

खरे पाहता असे वर्गीकरण हे अप्रस्तूत मानावे लागते कारण प्रत्येक राजकीय पक्ष तत्त्वज्ञान, विचारसरणी व व्यवहार यांचा मेळ घालूनच राजकारण करत असतो.

### (३) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संरचनेचे पक्ष

नील मॅकडोनॉल्ड व मॉरिस दुवर्जर यांनी अशा प्रकारचे वर्गीकरण केले आहे. अशा वर्गीकरणाचा आधार संघटना हा असतो. प्रत्यक्ष रचनेतील राजकीय पक्षात व्यक्ती सरळरेषेत प्रत्यक्षपणे राजकीय पक्षाशी संबंधीत असते. तर अप्रत्यक्ष संरचनेचे राजकीय पक्ष इतर संघटनांवर अवलंबलेले असतात. जसे बहुजन समाज पक्ष पूर्वी बामसेफ या संघटनेवर आधारलेला होता.

### (४) समग्र समाजाधारित पक्ष व प्रशिक्षित लोकांचा पक्ष

राजकीय पक्षाची रचना व सदस्यांचे स्वरूप यावर आधारित हे

वर्गीकरण आहे. समग्र समाजाधारित पक्षात सदस्यसंख्या वाढविण्यावर भर दिला जात असतो. सदस्य वर्गणीतून पक्ष खर्च केला जातो. सदस्यांची संख्या ज्या पक्षात ज्यास्त तो अधिक लोकप्रिय व समाजाधारित पक्ष मानला जातो. सदस्यांच्या प्रवेशाची कसलीच मर्यादा समग्र समाजाधारित पक्षात नसते. संख्यात्मक स्थितीला या प्रकारात महत्त्व असते.

प्रशिक्षित लोकांचा राजकीय पक्ष हा 'केडर (Cadre) बेस पार्टी' या नावाने अधिक प्रचलित आहे. सर्वसामान्य लोकांमधून या पक्षाचे सदस्य नसतात तर विशिष्ट व नियोजनबध्दरितीने निवडक व्यक्तींना प्रशिक्षित करून हा पक्ष आपले सदस्य तयार करत असतो. शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक स्थिती, आर्थिक दर्जा यांचा विचार करून सदस्यांची निवड केली जाते. 'सब घोडे बारा टक्के' हा न्याय याठिकाणी नसतो. यामुळे बुध्दिवंत, प्रज्ञावंत, तज्ज्ञ लोकांची भरती करून पक्षाची प्रतिमा उंचावली जाते. गुणात्मकतेला महत्त्व देणारे केडर बेस पक्ष असतात.

**(५) उदारमतवादी तथा संकुचित पक्ष**

खुल्या विचारांचे, सर्वसमावेशक, कायद्याचे राज्य मानणारे व विकासाला प्राधान्य देणारे पक्ष हे उदारमतवादी स्वरूपाचे पक्ष असतात. तर संकुचित पाया असणारे पक्ष जात, धर्म, प्रदेशवाद, वंशवाद, भाषा या आधारावर निर्माण होत असतात. उदारमतवादी राजकीय पक्षांना राष्ट्रीय राजकारण करता येते. मात्र संकुचित राजकीय पक्षांना विविध मर्यादा व सीमांमध्ये अडकून पडावे लागते.

**(६) डावे व उजवे पक्ष**

डावे व उजवे पक्ष असे वर्गीकरण सुरू झाले ते फ्रेंच क्रांतीच्या प्रारंभीच्या झालेल्या एका बैठकीपासून राजा लुईने क्रांतीच्या पार्श्वभूमीवर एक बैठक बोलावली तेव्हा जे लोक आले त्यातील काही लोक राजाच्या डाव्या बाजूला व काही लोक राजाच्या उजव्या बाजूला बसले. डाव्या बाजूला जे लोक

बसले ते व्यवस्थेला विरोध करणारे, क्रांतीचा पुरस्कार करणारे, परिवर्तनाचे समर्थन करणारे होते. व्यवस्थेत परिवर्तन करणाऱ्या क्रांती समर्थकांना डावे म्हटले गेले. तर जे प्रस्थापित व्यवस्था कायम ठेवण्याच्या बाजूचे व क्रांतीला विरोध करणारे होते ते राजाच्या उजव्या बाजूला बसले होते. 'जैसे थे' वादी किंवा मूठभरांचे कल्याण करण्याचा विचार मांडणारे पक्ष हे उजवे असतात. 'नाही रे' वर्गाच्या हक्कांचा पुरस्कार करणारे डावे व 'आहे रे' वर्गाला सांभाळणारे उजवे असेही म्हटले जाते. भारतात साम्यवादी पक्ष हा डावा पक्ष तर भारतीय जनता पक्ष उजवा पक्ष आहे. याशिवाय अजून एक प्रकार पडतो. तो म्हणजे, मध्यममार्गी पक्ष. जो पूर्ण डावाही नसतो व उजवाही नसतो. भारतात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला यात समाविष्ट करता येते. हे डावे, उजवेपण निष्ठेने जपताना राजकीय पक्ष दिसतात.

**(७) मानवी स्वभावावरून केले जाणारे पक्ष वर्गीकरण**

मानवी मनोवृत्तीतून राजकीय पक्षांची विभागणी झालेली दिसून येते. असे वर्गीकरण चार प्रकारचे आहे.

**अ) क्रांतीकारी पक्ष :-** अन्यायाच्या विरोधात बंड करण्यासाठी व प्रचलित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी काही लोक एकत्रित येऊन जेव्हा पक्षाची स्थापना करतात तेव्हा तो क्रांतीकारी पक्ष असतो. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग यांनी हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक पार्टी ची स्थापना याच धर्तीवर केली होती.

**ब) जुनाट प्रतिगामी पक्ष :-** भूतकाळातील कल्पनारम्य समाजातील आदर्श राज्य, संस्कृती व समाजाचे पुनरूज्जीवन करण्याच्या मनोवृत्तीने जेव्हा लोक एकत्रित येतात व पक्ष निर्माण करतात तेव्हा तो जुनाट प्रतिगाम्यांचा पक्ष असतो. भ्रामक कल्पनेवर हे पक्ष आधारलेले असतात.

**क) गतीशील पक्ष :-** समाज गतीमान असतो. बदलत्या समाजातील

मूल्येही बदलत असतात. या मूल्यांचा विचार करून समाजाला गती देण्यासाठी व सामाजिक मूल्य जपण्यासाठी जे लोक आग्रही असतात. ते जेव्हा एकत्र येऊन राजकीय पक्ष स्थापन करतात व समाजाला गती देतात तेव्हा त्याला गतीशील राजकीय म्हटले जाते.

**ड) स्थितीवादी राजकीय पक्ष :-** सद्यास्थितीतील समाजरचना, व्यवस्था कायम रहावी यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या लोकांचा समूह जेव्हा पक्षाची निर्मिती करतो तेव्हा त्याला स्थितीवादी राजकीय पक्ष संबोधतात.

**(८) निर्वाचन आयोगाच्या निकषाधारे वर्गीकरण**

भारतासारख्या बहुपक्षपध्दती असणाऱ्या देशात निवडणूक आयोगाद्वारे काही निकषांच्या आधारे वर्गीकरण केले जाते. ते म्हणजे, राष्ट्रीय पक्ष प्रादेशिक पक्ष व नोंदणीकृत परंतु मान्यताप्राप्त नसलेले पक्ष हे तीन होय.

राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी राजकीय पक्षाला किमान चार घटकराज्यात लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत सहभाग घ्यावा लागतो. या घटकराज्यातून ६ टक्के मते प्राप्त केलेली असली पाहिजेत. तसेच त्या राजकीय पक्षाचे चार उमेदवार लोकसभेसाठी खासदार म्हणून निवडून आले पाहिजेत. किंवा लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत किमान तीन घटकराज्यातून किमान २ टक्के सदस्य त्या राजकीय पक्षाचे निवडून आले पाहिजेत.

प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी लोकसभा किंवा विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत त्या राजकीय पक्षाला घटकराज्यातील एकूण वैध मतांपैकी ६ टक्के मते मिळणे आवश्यक आहे. तसेच त्या राजकीय पक्षाचे किमान दोन सदस्य निवडून आले पाहिजेत. किंवा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत त्या राजकीय पक्षाचे विधानसभेतील सदस्य संख्येच्या प्रमाणत ३ टक्के तरी सदस्य असले पाहिजेत किंवा किमान ३ सदस्य विधानसभेत त्या पक्षाचे असले

पाहिजेत. यापैकी जी संख्या जास्त असेल तितके सदस्य त्या पक्षाचे असतील तरच त्या पक्षास प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळते.

निवडणूक आयोगाकडे जे पक्ष म्हणून नोंदविलेले असतात मात्र राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षाचे निकष जे पूर्ण करू शकत नाहीत. त्यांना बिगरमान्यताप्राप्त पक्ष म्हटले जाते.

**(९) संख्येनुसार पक्षीय वर्गीकरण**

राजकीय पक्षांची संख्या किती आहे यावरून तिचे सर्रास वर्गीकरण करण्याची पध्दत रूढ आहे. यातून तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते. ते म्हणजे, एकपक्षपध्दती, द्विपक्षपध्दती व अनेकपक्षपध्दती (बहुपक्ष पध्दती) हे होय.

**अ) एकपक्ष पध्दती**

ज्या राष्ट्रात एकच राजकीय पक्ष असतो आणि दुसऱ्या पक्षाचे अस्तित्त्वच अमान्य केलेले असते त्याला एकपक्ष पध्दती म्हटले जाते. याठिकाणी विरोधी पक्ष तर असूच शकत नाही. जो एक पक्ष असतो तोच सर्वेसर्वा व सत्तारूढ पक्ष असतो. साम्यवादी राष्ट्रे रशिया, चीन, हंगेरी, स्पेन, पूर्व जर्मनी या ठिकाणी एकपक्षपध्दती दिसून येते. तर पहिल्या महायुध्दानंतर व दुसऱ्या महायुध्दापूर्वी जर्मनीत नाझी पक्ष व इटालीत फॅसिस्ट पक्ष एकमेवच होते. स्थीर शासन देण्यासाठी, लोकांना शिस्तीत ठेवण्यासाठी आर्थिक विकासास गती देण्यासाठी व पक्षसंघर्षातून निर्माण होणाऱ्या समस्यांना प्रतिबंध घालण्यासाठी एकपक्ष पध्दती उपयुक्त मानली जाते. राष्ट्राला एकसंघ ठेवण्यात एक पक्षच उपयोगी पडतो असे मानले जाते. मात्र या पध्दतीमुळे एका पक्षाचीच हुकुमशाही निर्माण होते. लोकशाहीला विरोध करणारी व विभूतीपूजेचे स्तोम माजवून शिस्तीच्या नावाने लोकांच्या स्वातंत्र्याला हिरावून घेणारी एकपक्ष पध्दती असते. अशी टीका यावर केली जाते. बार्कर यासंदर्भात म्हणतो की, "एकपक्षीय राज्य एका विचाराचे राज्य असते." म्हणजे येथे मतभिन्नतेला वाव नसतो.

**ब) द्विपक्ष पध्दती**

ज्या देशात दोन पक्ष क्रियाशील असतात त्याला द्विपक्ष पध्दती असे म्हणतात. याचा अर्थ असा नव्हे की, त्या राष्ट्रात इतर पक्ष नसतात किंवा अन्य पक्षाची स्थापना करता येत नाही. इतर पक्ष असतात मात्र लोकच आलटून पालटून दोन पक्षांच्या हातात सत्ता प्रदान करतात. तिसरा पक्ष उदयाला आला व त्याचा प्रभाव वाढू लागला तर पूर्वीच्या दोनपैकी एका पक्षाला क्षीण अवस्था प्राप्त होते. शेवटी दोनच पक्ष प्रभावशाली राहतात. इंग्लंड मध्ये हुजूर पक्ष व मजूर पक्ष तर अमेरिकेत डेमॉक्रॅटिक व रिपब्लिकन असे दोन पक्ष असलेले दिसतात.

द्विपक्षपध्दती जनतेसाठी सोयीची व शासन संचालनासाठी उपयुक्त पध्दती मानली जाते. लोक स्पष्ट स्वरूपात एकाच पक्षाला बहुमत देतात त्यामुळे शासन स्थीर व लोकशाहीनिष्ठ स्वरूपात चालते. प्रभावी विरोधी पक्ष याठिकाणी असतो आणि त्याला 'प्रतिमंत्रिमंडळ' मानले जाते. जबाबदार शासनपध्दतीचे निर्माण द्विपक्षपध्दतीतून होत असते, हे गुण सांगितले जातात द्विपक्षपध्दतीचे. तर मतदारांना दोनच पर्याय असतात. दोनपैकी एकाचीच निवड करावी लागते. बहुमतप्राप्त पक्षाची हुकुमशाही निर्माण होण्याची भीती असते. विरोधी पक्षाचे सामर्थ्यही जास्त असल्याने बऱ्याचवेळा विरोधासाठी विरोध केला जातो व त्यातून राष्ट्रहिताला बाधा पोहंचविली जाते, हे सर्व दोष द्विपक्ष पध्दतीचे सांगितले जातात.

**क) अनेकपक्ष पद्धती / बहुपक्ष पध्दती**

ज्या देशात दोनपेक्षा अधिक राजकीय पक्षांचे अस्तित्त्व असते त्याठिकाणी अनेकपक्ष पध्दती प्रचलित असते. सरकार स्थापण्यासाठी एकापेक्षा अधिक पक्षांना एकत्रित यावे लागते तेथे अनेकपक्ष पध्दतीचा प्रादुर्भाव दिसतो. वैविध्यता असलेल्या राष्ट्रात ही पध्दती प्रामुख्याने स्वीकारली जाते. भारत, फ्रान्स, स्वित्झर्लंड या देशात बहुपक्षपध्दती दिसून येते.

राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक, प्रादेशिक, सांप्रदायिक, भाषिक, वैचारिक अशा विविध आधारावर पक्ष निर्माण करण्यासाठी अनेकपक्ष पध्दती उपयुक्त ठरते. मतदारांना मत देण्यासाठी विविध पर्याय देणारी, कोणत्याही एका राजकीय पक्षाला हुकुमशाही प्रस्थापित करण्यापासून रोखणारी मंत्रिमंडळाच्या अरेरावीला प्रतिबंध घालणारी सर्वांना संधी देणारी व खरी लोकशाहीत्मक पक्ष पध्दती म्हणून अनेकपक्ष पध्दतीकडे पाहिले जाते.

परंतु अनेकपक्ष पध्दतीत वरील गुण असले तरी दोषही बरेच आहेत. या बहुपक्ष पध्दतीमुळे शासन सदैव अस्थिर राहते. परकीय आक्रमणावेळी पक्षा - पक्षात मतभेद होतात व राष्ट्राचे अहित होण्याची संभावना असते. जबाबदारीची अनिश्चितता व स्वार्थी नेतृत्वाला संधी देणारी ही पक्षपध्दती आहे. तद्वतच संकुचित गोष्टीतून जन्माला येणारे पक्ष मोठ्या प्रमाणात असतात. ब्राईस च्या मते, "जिथे पक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात असते त्याठिकाणी पक्षांना वेगवेगळी नावे देणे चुकीचे आहे. कारण वास्तविकदृष्ट्या ते फक्त राजकीय समूह आहेत."

राजकीय पक्षांची आवश्यकता कोणत्याही स्वरूपात असतेच. राजकीय पक्षांमुळेच प्रत्येक राजकीय व्यवस्थेचे व्यवस्थितपणे क्रियान्वयन होत असते. लास्की म्हणतो की, "राजकीय पक्षांमुळेच लोकांच्या भावनोन्मेषाला क्रांतीचे रूप प्राप्त होत नाही." थोडक्यात राजकीय पक्ष राजकारणाचे, राजकीय संरचनांचे व मानवी भावनांचे उत्तमपणे व्यवस्थापन करण्यात पटाईत असतात.

# संदर्भ सूची


### इंग्रजी ग्रंथ

1) David Easton, A Framework of Political Analysis
2) Robert Dahl, Modern Political Analysis
3) Appadorai A, The Substatnce of Politics
4) S. P. Varma, Modern Political Theory
5) J. C. Johari, Contemporary Political Theory
6) B. N. Ray (Ed.) Contemparary Political Theory
7) W. Buckley, Modern Systems Analysis

### हिंदी ग्रंथ

१) एस. एल. वर्मा, उच्चतर आधुनिक राजनतिक सिध्दान्त
२) सुरेश चंन्द्र सिंहल, पाश्चात्त्य राजनीतिक सिद्धान्त
३) बी. एल. फडिया, पाश्चात्य राजनीतिक सिद्धान्त
४) सी. बी. गेना, तुलनात्मक राजनीति एवं राजनीतिक संस्थाएं
५) एस. सी. सिंहल, तुलनात्मक राजनीति
६) चन्द्रदेव प्रसाद, तुलनात्मक राजनीति
७) राजेन्द्र कुमार शर्मा, राजनैतिक समाजशास्त्र
८) ओम प्रकाश गावा, राजनीति सिद्धांन्त की रूपरेखा

### मराठी ग्रंथ

१) ना. रा. खेकाळे, राजकीय नेतृत्व
२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश

३) राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर (संपा), राज्यशास्त्र कोश
४) भास्कर भोळे, राजकीय सिध्दान्त आणि विश्लेषण
५) रा. अं. तिजारे, चिं. ग. घांग्रेकर, आधुनिक राजकीय विश्लेषण
६) कृ. दि. बोराळकर, आधुनिक राजकीय विश्लेषण
७) ना. र. इनामदार, सु. ना. पुराणिक, राजकीय समाजशास्त्र
८) चिं. ग. घांग्रेकर, श्रुती मेहता, राजकीय समाजशास्त्र
९) शं. ना. नवलगुंदकर, आधुनिक राजकीय विश्लेषण
१०) विलास आवारी, सुरेश देवरे, आधुनिक राजकीय विश्लेषण
११) एस. बी. फड, उच्चतर आधुनिक राजकीय सिध्दांत
१२) दिगंबर खेडेकर, राजकीय सिध्दांतातील मूलभूत संकल्पना
१३) राजशेखर सोलापुरे (संपा), राजकीय सिद्धांताची रूपरेषा
१४) राजशेखर सोलापुरे, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया
१५) शांताराम भोगले, आधुनिक शासनसंस्था (तत्त्व आणि व्यवहार)
१६) विजय देव, राजकीय विश्लेषण कोश
१७) प्रदीप आगलावे, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे

**नियतकालिके**

१) समाजप्रबोधन पत्रिका, संपा. अशोक चौसाळकर
२) शोध संपदा, संपा. राजशेखर सोलापुरे
३) नवभारत, संपा. श्री. मा. भावे